15 TO 21 MAY 2023 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 5/13/2023 9:16 PM Page 1

CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : २१ सोमवार दि. १५ मे २०२३ ते रविवार दि. २१ मे २०२३ पाने : ८ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## राजन दास खरोखरच चुकला शरीरसुख मागताच जीवाला मुकला

मुंबई/क्राईम रिपोर्टर

आपल्या पत्नीकडे एखादा माणूस वाईट नजरेने पाहत असेल तर तो पती त्या माणसाचा जीव घ्यायलाही मागे पुढे पाहत नाही, असाच काहीसा प्रकार वरळीमध्ये घडला आहे. राजन दास नावाच्या इसमाने एका महिलेकडे शरीरसुखाची मागणी केली होती. मात्र तुने हा प्रकार तिच्या पतीला सांगताच पती भयंकर चिडला आणि त्याने आपला भाऊ व भाचा यांच्या मदतीने राजन दास याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. ...पान ६ वर

# पंतप्रधान मोदींचे हिंदुत्व उतरले नाही लोकांच्या गळी ‘जय बजरंग बली’ कर्नाटकने तोडली भाजपची नली









मुंबई/वरिष्ठ प्रतिनिधी

राजकारणात कुणीही सत्तेचा ताम्रपट घेऊन आलेला नसतो. त्यामुळे सत्ता आज आहे तर उद्या नाही. कारण सत्तेच्या चाव्या जनतेच्या हातात असतात. त्यामुळे जनता कधी कोणाला सत्तेवर बसवील आणि कोणाला धुळीला मिळवील याचा नेम नाही आणि हे ठाऊक असतानाही काही लोकांना सत्तेचा माज आलेला असतो. त्यामुळे सत्तेच्या बळावर त्यांची मुजोरी सुरु असते. कर्नाटकात भाजपने तेच केले. कोणत्याही कामात ४० टक्के कमिशनचा हिशोब लावणारे बोम्माई आणि त्यांच्या कानडी दलालांना कर्नाटकातील जनतेने असा काही दणका दिला कि त्यांना तोंड दाखवायला जागा राहिलेली नाही. या निवडणुकीतून आणखी एक गोष्ट स्पष्ट झाली ती म्हणजे मोदींचा करिष्मा आता राहिलेला नाही. कारण मोदींच्या शिन्केवरही देशवासियांचा विश्वास राहिलेला नाही. त्यामुळे कर्नाटकात महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार यासारखे लोकांच्या जीवन मरणाचे प्रश्न असताना मोदिंनी बजरंग बलीला खांद्यावर घेऊन अनेक सभा केल्या, रोड शो केले. पण शेवटी बजरंग बलीनेच त्यांना खाली आपटले. कारण बजरंग बली सत्याचा वाली आहे. ‘मुह्मे राम आणि बगलमे छुरी’ घेऊन फिरणाऱ्यांच्या डोक्यावर नेहमीच बजरंग बलीने आपल्या गदेचे प्रहार करून त्यांना मातीत गाडले आहे.



काँग्रेसने बजरंग दलावर बंदी घालण्याची घोषणा करताच बजरंग दल म्हणजे जणू काही सर्व हिंदूंचा राष्ट्रीय आवाज असल्याप्रमाणे भाजपवाले छात्या बडवू लागले आणि बजरंग दलावरील बंदीचा त्यांनी थेट बजरंग बलीच्या अस्तित्वाशी संबंध जोडून बजरंग दलावरील बंदी म्हणजे बजरंग बलीवरील बंदी असा खोटा प्रचार सुरु केला. पंतप्रधान पदासारख्या मोठ्या पदावर बसलेला माणूस जेंव्हा असा खोटा प्रचार करू लागतो तेंव्हा त्याला जनता कशी अद्दल घडवते हेच कर्नाटक विधानसभेच्या निकालाने दाखवून दिले आहे. कर्नाटकात काँग्रेसने २२४ पैकी १३० जागा जिंकून निर्विवाद बहुमत मिळवले आणि ६२ जागा जिंकणाऱ्या भाजपला सत्तेतून हद्दपार कर्नाटकातील सत्तांतर हे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीचा ट्रेलर आहे. कारण लोकांना जात, धर्म, आस्था यापेक्षा महागाई बेरोजगारी भ्रष्टाचार या मुद्यांमध्ये जास्त इंन्ट्रेस्ट आहे. जातीधर्माचे राजकारण करणाऱ्या भाजप सारख्या पक्षांना आणि मोदींना हि एक सणसणीत चपराक आहे. कर्नाटक विधानसभेच्या २२४ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत खरी लढत काँग्रेस आणि भाजपातच होती. भाजपने कर्नाटकातील आपली सत्ता टिकवण्यासाठी प्रचंड पैसा ओतला होता. भाजपा शाषित सर्व राज्यांचे मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री तसेच पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या केंद्रीय मंत्रिमंडळातील सर्व मंत्री कर्नाटकात ...पान ६ वर

## नुकतीच उमलत होती एक निरागस कळी मूर्ख भावाने घेतला निष्पाप बहिणीचा बळी






उल्हासनगर/क्राईम रिपोर्टर

**माणसाच्या मनातील गैरसमज त्याला कोणत्या थराला घेऊन जातात याच भयंकर आणि तितकेच संतापजनक उदाहरण उल्हास नगरमध्ये समोर आले आहे. १२ वर्षांच्या बहिणीच्या कपड्यावर तिला प्रथमच आलेल्या मासिक पाळीच्या रक्ताचे डाग बघून भावाला तिचे प्रेमसंबंध असल्याचा आणि तिने काहीतरी चुकीचे केल्यानेच तिच्या कपड्यांना रक्त लागल्याचा गैरसमज भावाने करून घेतला आणि त्यामुळे तो इतका चिडला कि त्याने बहिणीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

बहिणीच्या काड्यावर रक्ताचे डाग दिसल्याने संशयित भावाने आपल्या बहिणीचे प्रेमसंबंध असल्याच्या गैरसमज होऊन आपल्या १२ वर्षाच्या बहिणीची हत्या केल्याची घटना घडल्याने एकच खळबळ माळी आहे. हा धक्कादायक प्रकार ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर येथे घडला आहे. माया (बदललेले नाव) ही तिचा मोठा भाऊ आणि वहिनीसोबत उल्हासनगर येथे राहते. तिचा भाऊ सुरेश (नाव बदललेले) हा सुरक्षा रक्षक म्हणून काम करतो. काही दिवसांपूर्वी या मुलीला पहिल्यांदा पाळी आली. सुरेशने तिच्या कपड्यांना लागलेले रक्ताचे डाग पाहिले आणि त्याला तिच्यावर संशय आला. मायाचे तमी प्रेमप्रकरण असावं आणि त्यातून तिचे शरीरसंबंध निर्माण झाले असावेत, या संशयाने सुरेशला पछाडलं. त्याने तिच्याकडे कडक शब्दांत याबद्दल विचारणा केली. त्यावेळी मासिक पाळीच्या चक्राविषयी संपूर्णतः अनभिज्ञ असलेल्या मायाला याविषयी काहीही सांगता आलं नाही. त्यामुळे सुरेशचा संशय बळावला. त्याने रागाच्या भरात तिला गरम चिमट्यांनी चटके दिले. त्यामुळे ती गंभीररित्या भाजली. तिला उल्हासनगर येतील रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, तिला दाखल करण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचं डॉक्टरांनी सांगितलं. तिच्या चेहऱ्यावर, पाठीवर आणि शरीरावर अनेक ठिकाणी भाजल्याच्या खुणा होत्या. पोलिसांनी सुरेशवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे. मायाचा मृतदेह शव विच्छेदनासाठी पाठवला असून पुढील तपास सुरू आहे.

## मित्राचा खून करून चैन्नईतून पळाला वालीव पोलिसांना ५ वर्षांनी मिळाला



वसई/क्राईम रिपोर्टर

**कोणत्याही गुन्ह्यातील आरोपी किती जरी शातीर दिमाग असला तरी ‘कानून के हाथ बडे लंबे होते है’ फरारी आरोपी कधीना कधी पोलिसांच्या जाळ्यात सापडतोच असाच काहीसा प्रकार रघु मंडल यांच्या बाबतीत घडला. चेन्नई जवळच्या तांबरम शहरातून मित्राचा खून करून पळलेला रघु मंडल अखेर वसईतील वालीव पोलिसांना तब्बल ५ वर्षांनी सापडला. त्यानंतर या आरोपीला तामिळनाडू पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.**

चेन्नई नजिकच्या तांबरम शहरात रघु मंडल आणि अनिल चौधरी हे दोन मित्र एकत्र राहायचे. बफिंगचे कारागीर असलेल्या अनिल आणि रघुमध्ये काहीतरी कारणावरून वाद झाला. ...पान ६ वर

## दारुड्यांनी ध्वनीक्षेपकाचा आवाज मोठा केला जाब विचारणाऱ्याचा भाऊ विनाकारण मेला



मयत अक्षय



जखमी दिपक





जळगाव/क्राईम रिपोर्टर

**ध्वनी प्रदूषण विरोधी कायदा अस्तित्वात असतानाही काही लोक हा कायदा धाब्यावर बसवून मोठमोठ्याने लाऊड स्पीकर लावतात, अशावेळी त्यांना कोणी विरोध केला कि वाद घालतात. अमळनेरमध्ये अशाच एका घटनेत गच्चीवर मोठ्या आवाजात स्पीकर लावून धिंगाणा करणाऱ्यांना गेलेल्याला मारहाण करण्यावरून झालेल्या वादात एकाला जीव गमवावा लागला.**



आजकाल तरुणाईच्या अंगी सळसळते रक्त असते. त्यामुळे कुणी एखाद्याला समजावण्यासाठी वा सांगण्यासाठी आला तरी त्याच्या अंगावर काही तरुण धावून जातात आणि वाद वाढवून घेतात. काही तरुणांच्या बाबतीत असे म्हटले जाते. ऐकून घेण्याच्या मनस्थितीत काही तरुण नसतात. त्यामुळे एखादा अनुचीत प्रकार देखील घडतो. अशा सळसळत्या रक्ताच्या तरुण मंडळींना साथसंगत देणारे घरातील इतर सदस्य असले म्हणजे एखादा गुन्हा नक्कीच घडतो. स्पिकरचा मोठा ...पान २ वर

## प्रेमातील अडथळ्याला संपवून टाकले प्रेयसीच्याच मुलाला विहिरीत फेकले



विटा/क्राईम रिपोर्टर

**एखाद्या बाईला संसारात मनासारखे सुख मिळाले नाही आणि पतीकडून छळवाद सुरु झाला कि मग ती दुसऱ्याचा आधार शोधते. जोंधळखिंड येथील ज्योतीचे तसेच झालेलं होते. नवऱ्यासोबत पटेना म्हणून ती माहेरी राहु लागली. सोबत आपल्या लहान मुलालाही आणले. याच दरम्यान तिची रुपेश बरोबर ओळख झाली. तरणाताठा रुपेश तिची पैशाची आणि शरीराची गरज भागवत होता. तो तिच्याशी लग्नालाही तयार होता. पण तिच्या मुलाला स्वीकारत नव्हता. अखेर दोघांनी तिच्या मुलाचा हा अडसर मार्गातून हटवण्याचा निर्णय घेतला आणि एकेदिवशी रूपेशने त्याला खाऊचे आमिष दाखवून बाहेर नेले आणि विहिरीत फेकून त्याचा जीव घेतला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

खानापूर तालुक्यातील लेंगरे आणि जोंधळखिंड ही दोन्ही गावे पाच कि.मीच्या अंतरावर आहेत. जोंधळखिंड येथील ...पान २ वर

## अनैतिक संबंध अखेर जीवघेणे ठरले मित्राच्या मदतीने पत्नीला ठार मारले

दोडामार्ग (गोवा)/क्राईम रिपोर्टर



मयत विशिता

**विवाहित महिला जेंव्हा दुसऱ्याच्या प्रेमात पडते, तेंव्हा ती संसाराचा आणि मुला–बाळांचाही विचार करीत नाही. तिला फक्त प्रियकराचा सहवास हवा असतो. एका मुलाची आई असलेली विशिता हि दुसऱ्याच्या प्रेमात पडली आणि पतीला सोडून प्रियकरासोबत राहू लागली. पतीने तिला आणि तिच्या प्रियकरालाही समजावून सांगून पहिले, पण ती दोघेही ऐकायला तयार नव्हती. अखेर त्याने पत्नीला कायमचे संपवण्याचा निर्णय घेतला आणि एके रात्री तिला जेवायला नेण्याच्या निमित्ताने निर्जन स्थळी नेवून तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.**



मंगळवार दि.९ मे रोजी दोडामार्गावरील घाटात घोटगेवाडी–भटवाडी येथील जंगलातील नदीच्या पुलाच्या कठडयाजवळ एका ३५ वर्षीय महिलेचा मृतदेह मिळून आला. भटवाडी येथील एक पुरोहित आपल्या सायंकाळी ५ वाजणेच्या सुमारास आपल्या गुरांना चारविण्यासाठी त्या ठिकाणी गेला असता त्याला त्या ठिकाणी त्या महिलेचा गळा आवळलेल्या व चेहऱ्यावर दगडाने मारलेल्या अवस्थेतील मृतदेह दिसला. त्याने ही माहिती सामाजिक कार्येकर्ते लोबो यांना दिली. लोबो यांनी ही माहिती ...पान २ वर

## ब्लॅकमेलर प्रेयसीचा खूप त्रास वाढला गोड बोलून प्रियकराने काटा काढला

आटपाडी/क्राईम रिपोर्टर



**शरीरसुखाची चटक खूप वाईट असते. एकदा का ती लागली कि माणसाची त्याच्यापासून सुटका नसते. अगदी दारू आणि अमली पदार्थांच्या व्यसनासारखीच शरीर सुखाची चटक असते. आटपाडी येथील छायाला सुद्धा अशीच शरीरसुखाची चटक लागली होती. त्या कामात पती कमी पडत असल्याने तिने चुलत दिराला जवळ केले आणि त्याच्याकडून सुख घेऊ लागली. पण नंतर तिने त्याला ब्लॅकमेल करायला सुरुवात केली. अखेर एके दिवशी त्याने तिला लॉजवर नेवून तिचा कायमचा काटा काढला. मात्र पोलिसांनी नंतर त्याला अटक केली.**

आटपाडी येथील मधुकर महादेव देवडकर याचा विवाह गेल्या काही वर्षापूर्वी छायाबरोबर समाजाच्या रितीरवाजानुसार झाला. मधुकर हा मेंढपाळचा व्यवसाय करीत होता. शिवाय त्याची थोडी फार शेतजमीन ही होती त्यावरच त्याच्या कुंटूबाचा उदरनिर्वाह चालत होता. त्या दोघांचा संसार सुखी समाधानी चालू असताना छायाचा पाय घसरला. निबंवडे येथील नानासो देवडकर याचे ...पान ६ वर

## लघुशंकेचा झालेला वाद विकोपाला गेला जाब विचारायला गेलेला फुटकचा मेला






धुळे/क्राईम रिपोर्टर

**अस्वच्छता ही विविध विकाराची जननी असल्याने आपले घर, आपल्या घराचा परिसर, आपले गाव, आपले शहर स्वच्छ ठेवावे म्हणून राष्ट्रसंत गाडगेबाबा, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी वेळोवेळी स्वच्छता अभियान राबवून जनतेला स्वच्छतेचे धडे देण्याचा प्रयत्न केला होता. आजही आरोग्य रक्षणार्थ देशपातळीपासून ते गाव पातळीपर्यत शासकीय स्तरावरून स्वच्छता अभियान राबवले जात असते. विशेष करून महात्मा गांधी आणि राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून विशेष बाब म्हणून स्वच्छता अभियान राबवून सर्वसामान्य जनतेला स्वतःच्या शरीराबरोबरच आपला परिसर, आपले गाव, आपले शहर स्वच्छ ठेवण्यासाठी आवाहन केले जाते.**

मध्यप्रदेशातील इंदोर शहराने केवळ मध्यप्रदेशालाच नव्हे तर संपूर्ण भारताला पथदर्शी अभियान राबवून शहर स्वच्छतेचा धडा दिला आहे. लोकांनी अर्थात जनतेने ठरवले तर काय होवू शकते? याचे इंदोर हे ज्वलंत उदाहरण म्हणावे लागेल. इंदोरमधील लोकांनी ...पान ६ वर

CMYK

15 TO 21 MAY 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 5/13/2023 9:17 PM Page 1



पान १ वरून...

## दारुड्यांनी ध्वनीक्षेपकाचा आवाज...

आवाज कमी करण्यास सांगितल्याचा राग आल्यामुळे झालेल्या मारहाणीत एकाचा मृत्यू तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना जळगाव जिल्ह्यातील अमळनेर या तालुक्याच्या ठिकाणी घडली. याप्रकरणी खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. दिपक राजू भिल हा तरुण अमळनेर येथील दाजीबा नगर परिसरात आपल्या परिवारासह राहतो. सेंट्रींग काम करुन तो आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह चालवतो. २४ एप्रिल रोजी रात्री आठ ते नऊ वाजेच्या दरम्यान आपल्या घराच्या गच्चीवर कुणीतरी मोठमोठ्याने स्पिकरवर गाणे वाजवत असल्याचे दिपकला समजले. कर्णकर्कश आवाज असह्य झाल्याने दिपक घराच्या गच्चीवर नेमका काय प्रकार सुरु आहे ते बघण्यास गेला. त्यावेळी गल्लीतील अर्जुन पारधी हा मद्यप्राशन करुन घराच्या गच्चीवर मोठ्या आवाजात स्पिकरवर गाणे वाजवत होता. त्याठिकाणी अर्जुन पारधी याच्यासह राहुल नाना सरोदे, रोहीत चेतन सरोदे, क्रिष्णा चेतन सरोदे असे सर्वजण मोठमोठ्याने स्पिकरवर गाणे वाजवून मद्याच्या नशेत धांगडधिंगा करत होते. आपल्या घराच्या गच्चीवर सुरु असलेला हा प्रकार दिपकला असह्य झाला. रागाच्या सुरात दिपकने मद्याच्या नशेतील सर्वांना गाणे एवढ्या मोठ्या आवाजात का वाजवत आहात असे विचारुन गाणे बंद करण्यास सांगितले. आपल्याला जाब विचारल्याचा चौघांना राग आला. ऐकून घेण्याच्या मनस्थितीत कुणीही नव्हते. त्यामुळे शब्दामागे शब्द वाढत गेला. त्यातील राहुल सरोदे आणि रोहीत सरोदे अशा दोघांनी दिपकला शिवीगाळ सुरु केली. दोघांकडून सुरु झालेली शिवीगाळ दिपकला असह्य झाली. त्यामुळे आपल्याला शिवीगाळ करु नका असे दिपकने दोघांना समजावण्यास सुरुवात केली. मात्र मद्याच्या धुंदीत असलेल्या राहुल आणि रोहित या दोघांनी दिपकला मारहाण देखील सुरु केली. सुरुवातीला शिवीगाळ आणि नंतर मारहाण सुरु झाल्याने दिपक अडचणीत आला. दोघांच्या तावडीत सापडलेल्या दिपकला मारहाण सुरु झाली. दिपकने महत प्रयासाने तेथून आपली सुटका करत पळ काढला. घाबरलेल्या अवस्थेत दिपक घरी आला. घरी आल्याआल्या त्याने लहान भाऊ अक्षयला बोलावून घेतले. दिपकने लहान भाऊ अक्षयला सर्व प्रकार कथन केला. आपल्या भावाला झालेल्या मारहाणीचा जाब विचारण्यासाठी अक्षय राहुल आणि रोहीत यांच्याकडे गेला. त्याच्या पाठोपाठ दिपक देखील गेला. दोघा भावांच्या मागेमागे त्यांची मावशी भुराबाई कालु भिल, मावस बहिण शालु अक्षय भिल हे देखील आले. बघता बघता त्याठिकाणी दोन गट निर्माण होण्यास वेळ लागला नाही. आपला भाऊ दिपक याला झालेल्या मारहाणीचा जाब अक्षय राहुल आणि रोहीत या दोघांना विचारत होता. त्याचवेळी राहुल आणि रोहित यांच्या बाजूने समर्थन करणारे अर्जुन नाना सरोदे व कृष्णा चेतन सरोदे हे समोर आले. अर्जुन नाना सरोदे व कृष्णा चेतन सरोदे या दोघांनी मिळून जाब विचारण्यास आलेल्या अक्षयला पकडून ठेवले. काही समजण्याच्या आत रोहीत चेतन सरोदे याने त्याच्या कमरेला लावलेला चाकू बाहेर काढला. रोहीतने तो चाकू अक्षयच्या छातीत व पोटात मारला. अक्षयवर चाकूचे वार झाल्याचे बघून दिपक त्याला वाचवण्यासाठी धावला. त्याचवेळी रोहीतची आई निता चेतन सरोदे हिने दिपकच्या डोक्यात बांबूने मारहाण केली. राहुलची आई आरती नाना सरोदे हिने पुढच्याच क्षणी दिपकच्या पाठीवर लोखंडी रॉडने मारहाण सुरु केली. एवढे कमी झाले की काय म्हणून राहुल सरोदे याने त्याच्याकडे असलेल्या चाकूने दिपकच्या छातीच्या डाव्या बाजूला वार केला. घटनेने हिंसक वळण घेतल्याचे बघून दिपकने रोहितच्या हातातील चाकू हिसकावण्याचा प्रयत्न केला. या झटापटीत दिपकच्या डाव्या हाताच्या बोटाला दुखापत झाली. आपल्या भाच्यांवर होत असलेला जीवघेणा हल्ला बघून दोघांचे मामा अनिल वसंत भिल, नाना वसंत भिल असे दोघे जण घटनास्थळी धावून आले. अनिल भिल आणि नाना भिल या दोघा मामांनी आपल्या दोघा भाच्यांची सुटका केली. दोघा जखमी भावांना वैद्यकीय उपचार कामी अमळनेर येथील सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आले. चाकू हल्ल्यात अक्षय मोठ्या प्रमाणात जखमी झाला होता. अति रक्तस्त्रावामुळे त्याची प्रकृती खालावली होती. त्यामुळे अधिकचा उपचार मिळवण्याकामी त्याला धुळे येथील हिरे रुग्णालयात हलवण्यात आले. औषधोपचारादरम्यान अक्षय यास तेथील डॉक्टरांनी मयत घोषित केले. जखमी दिपक भिल याने या सर्व घटने प्रकरणी अमळनेर पोलिस स्टेशनला कायदेशीर फिर्याद दाखल केली. पारोळा पोलिस स्टेशनचे प्रभारी पोलिस निरीक्षक रामदास वाकोडे यांच्याकडे यावेळी अमळनेर पोलिस स्टेशनचा चार्ज होता. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कारवाईला सुरुवात झाली. दिपक राजु भिल याने दिलेल्या फिर्यादीनुसार अमळनेर पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न. १४२/२३ भा.द.वि. ३०२, ३०७, १४१, १४२, १४३, १४७, १४९ तसेच शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४/२५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. रोहीत चेतन सरोदे, राहुल नाना सरोदे, क्रिष्णा चेतन सरोदे, अर्जुन नाना सरोदे, निता चेतन सरोदे, आरती नाना सरोदे अशा सर्व संशयीतांविरुद्ध हा गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, मारहाण करणारे संशयित रोहित चेतन सरोदे, राहुल नाना सरोदे, अर्जुन नाना सरोदे, नीता चेतन सरोदे हे सर्व जण अक्षय मयत झाल्याचे कळताच धुळ्याला पळून गेले होते. प्रभारी पोलिस निरीक्षक रामदास वाकोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक राकेशसिंग परदेशी, शरद पाटील, रवी पाटील, दीपक माळी, सूर्यकांत साळुंखे, सिद्धांत शिसोदे यांनी धुळ्यात सापळा रचून धुळ्याच्या चितोडगड परिसरातून संशयितांना ताब्यात घेत अटक केली. संशयित आरती नाना सरोदे ही महिला अमळनेर येथे असल्याची माहिती मिळताच महिला पोलिस उप-निरीक्षक अक्षदा इंगळे यांच्यासह सुनील हटकर, कपिल पाटील आदींनी तिला ताब्यात घेत अटक केली. उपविभागीय पोलिस अधिकारी राकेश जाधव यांच्यासह पोलिस निरीक्षक रामदास वाकोडे यांनी या गुन्ह्याच्या तपासाची चक्रे वेगाने फिरवली. अक्षय भिल याच्या मृत्यूच्या निषेधार्थ मंगळवार २५ एप्रिल २०२३ रोजी अमळनेर शहरातील महाराणा प्रताप चौकात भिल समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनकर्ते मोठ्या प्रमाणात आक्रमक झाले होते. या आंदोलनामुळे सामान्य जनतेला वेठीस धरणे, एका समुहाला अश्लील शिवीगाळ करणे यासह सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या २६ जणांसह अज्ञात सुमारे दिडशे लोकांवर दंगल, सरकारी कामात अडथळा केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. अक्षय भिल याच्या खुनाच्या निषेधार्थ एका गटाने अमळनेर शहरातील महाराणा प्रताप चौकात रास्ता रोको करून किरकोळ दगडफेकीसह टायर जाळण्याचा प्रकार केला. या आंदोलनात धुळे, शिंदखेडा, पारोळा, चाळीसगाव, अमळनेरसह ग्रामीण भागातून भिल समाज एकवटला होता. यावेळी महिलांचाही मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. पोलिस प्रशासनाच्या वतीने पोलिस नाईक दीपक माळी यांनी या आंदोलनाला अनुसरुन सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी फिर्याद दाखल केली. विकास भिल, गणेश त्र्यंबक भिल, त्र्यंबक राजाराम भिल (रा. पाइप फॅक्ट्रीजवळ अमळनेर), भैय्या भिल (रा. हिवरखेडा, ता. पारोळा), विजय दादा भिल (रा. बंगाली फाइल), विनोद भिल (रा. अवधान, ता. धुळे), रवींद्र भिल (धुळे), लक्ष्मण भिल (डांगरी) आदींविरुद्ध हा गुन्हा दाखल करण्यात आला. पो.नि. विजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

## प्रेमातील अडथळ्याला संपवून...

ज्योती हिचा विवाह गेल्या सात वर्षापूर्वी लेंगरे येथील प्रकाश लोंढे याच्याशी झाला.प्रकाश याची घरची परिस्थीती ही तशी बेताचीच असल्याने तो रोजगार हमी योजनेच्या कामावर मजुरी करीत होता.त्यातून तो आपला प्रपंच चालवित होता. त्याचा संसार सुखासमाधानाने चालत असताना त्यांना एक मुलगा झाला. त्यांनी त्याचे नाव लाडाने शौर्य असे ठेवले. तो ही लहानाचा मोठा होत असताना घराचा खर्च वाढला होता. तो खर्च प्रकाश याच्या हातून होत नव्हता. त्यातच प्रकाश हा दारूच्या आहारी गेला.तो कामावरून घरी येताना दारू पिऊन येऊ लागला. त्यामुळे ज्योती त्याचेबरोबर वाद घालून भांडण काढू लागली. या भांडणात तो तिला जबर मारहाण ही करीत होता.त्यामुळे त्याची भांडणे विकोपाला गेली.ज्योती ही त्याचेबरोबर भांडण काढून सारखी आपल्या माहेरी जोंधळखिंड येथे जावू लागली. तेथे तिची ओळख गावातील रूपेश घाडगे याच्याबरोबर झाली. रुपेश हा एमपीएसीचे शिक्षण घेत होता. त्याच्या घरची परिस्थीती चांगली होती. तो बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे ठेका ही घेत असल्याने त्याच्याकडे पैशाची कमतरता नव्हती. त्याच्या खिशात नेहमी पैसे खुळखुळत असायचे हे ज्योतीने ओळखले होते. म्हणून ती त्याच्याशी जवळीक साधत होती. रुपेशला ही तेच पाहिजे असल्याने ती जवळीक साधत असताना त्याने ही तिच्यासाठी आपला हात पुढे केला. ती नवऱ्याबरोबर भांडण काढून माहेरी येत असते. तसेच तिला तिचा नवरा पाहिजे ते सुख देत नाही हे त्याला माहित होते. नेमके याचा संधीचा फायदा घेत रूपेशने ज्योतीला जवळ केले. ज्योतीला नवऱ्याकडून जे सुख पैसे पाहिजे होते ते मिळत नसल्याने तिने रूपेशबरोबर मैत्री जुळविली. देखणी गोरी पान ज्योती ही रूपेशच्या गळाला लागल्यावर तो ही काही कमी नव्हता. तो तिला आता बाहेर घेऊन फिरत होता. तिला काय पाहिजे काय नको हे तो पाहत होता. ती मागेल ती वस्तु तो तिला घेऊन देत असल्याने ज्योती त्याच्याबरोबर गलछर्रे उडवित फिरत होती. तो ही तिला पैसे देऊन तिच्याकडून शरीरसुख घेऊ लागल्याने त्या दोघांचे संबंध वाढीस लागले. ती त्याला पाहिजे त्यावेळी शरीरसुख देऊ लागल्याने तो तिची हौस मौज मजा पुरवू लागला. यातून पुढे घडायचे ते घडले. त्या दोघांच्या संबंधाची चर्चा ही जोंधळखिंड आणि लेंगरे गावात होऊ लागली. ती चर्चा तिचा नवरा प्रकाश याच्या कानावर गेल्यावर त्याने तिला या गोष्टीचा जाब विचारला असता ती त्याच्याबरोबर भांडण काढत तु मला पाहिजे ते सुख देत नाहीस, माझी हौस काही पुरवत नाहीस मला तुझ्याबरोबर राहयचे नाही असे म्हणून ती त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवू लागली. ती त्याच्याकडे घटस्फोट मागू लागली. त्या दोघांची भांडणे विकोपाला गेल्यावर त्याचेत पै पाहुण्यांनी मध्यस्थी करून त्याचे भांडण मिटविण्याचा प्रयत्न केला. परंतु ज्योती ही बाहेरख्यालीपणाने वागत असल्याने ती कोणाचेच काही ऐकत नव्हती. तिला आता नवरा नकोच होता. त्यातच रूपेश घाडगे याच्याबरोबर तिला लग्न करायचे होते. त्यामुळे ती नवऱ्याला सोडायला एका पायावर तयार होती. पण प्रकाश याला आपला संसार सावरायचा होता. आपल्या मुलाकडे बघून तो गप्प होता. ज्योती कसे का वागेना मुलगा आपला आहे त्याच्याकडे बघून ती एक ना एक दिवस माघारी फिरेल असे त्याला वाटत होते. पण ज्योची काही त्याचे ऐकत नव्हती. तिला फक्त त्या कामासाठी रुपेश पाहिजे असल्याने ती प्रकाशला घटस्फोट दे म्हणून मागे लागली. रुपेश हा तिच्या जवानीवर भाळला असल्याने त्याने ही तिला लग्नाचे वचन दिले होते. पण त्याने त्यासाठी एक अट घातली होती. तिला त्याने स्पष्ट सांगितले होते की मी तुझ्याशी लग्न करेन पण तुझा मुलगा मला नको आहे. त्याला तुझ्या नवऱ्याकडे सोड असे सांगितले. इकडे आता प्रकाशने ही आता कायद्यावर बोट ठेवीत तुला घटस्फोट पाहिजे तर मुलगा सज्ञान होईपर्यंत तुझ्याजवळच ठेव. त्याला चांगले शिक्षण दे मोठा माणुस कर असे सांगितले. त्यामुळे तिला आता रुपेशबरोबर लग्न करण्यासाठी मुलगा शौर्यची अडचण वाटू लागली. रूपेश तर शौर्यला स्विकाऱ्याला तयार नव्हता. त्याला दुसऱ्याचे मुल नको होते. त्याला तिच्याकडून आपले मुल हवे होते. तो तरूण आणि सुशिक्षित असल्याने त्याला दुसऱ्याच्या मुलाची कटकट नको होती. इकडे ज्योती आणि रूपेश दोघेजण बाहेर मजा मारण्यासाठी हॉटेलवर गेल्यावर ती त्याला आपल्या अंगावर घेतल्यावर लग्नाचा विषय काढत होती. तो तिला फक्त त्यावेळी म्हणायचा मला तुझ्याकडून माझ्या रक्ताचे मुल पाहिजे. तरच मी तुझ्याशी लग्न करेन. ज्योती तर त्याच्या बरोबरच्या संबंधात वाहवत गेली असल्याने तिला ही आता आपल्या पोटच्या मुलाचा अडसर वाटत होता. काही ही करून तिला त्याच्याबरोबर लग्न करायचे होते. त्यासाठी तिची काहीही करण्याची तयारी होती हे रुपेशने ही ओळखले होते. तिने लग्नाचा विषय काढला की तो मुलाचा विषय काढत होता. त्यामुळे ती ही वैतागलेली होती. नवराही मुलाला ठेवून घेत नव्हता. ती नवऱ्याच्या मर्दानगीवर बोट ठेवीत असताना तो ही हे मुल माझे नाही असे म्हणत होता. त्यामुळे ज्योतीची अवस्था ही इकडे आड तिकडे विहिर अशी झाली होती. त्या संबंधात तिला नवऱ्यापेक्षा रुपेश जास्त सुख देत असल्याने तिला त्याच्याशी लग्न करायचे होते. शौर्यचा विषय कसा मिटवायचा याचा विचार तिच्या मनात सतत येत होता. त्याला आपल्या मार्गातून बाजुला केले तरच रूपेशबरोबर तिला लग्न करता येणार होते. म्हणून ती आता खालच्या पातळीवर ही जायला तयार होती. तिने रुपेशला विश्वासात घेऊन मुलगा शौर्यला संपविण्याचा घाट घातला. त्याला ही तिच्या राणीची चटक लागल्याने तो ही तिच्या विचाराची सहमत झाला. त्या दोघांनी शौर्यला संपविण्याचा प्लॅन केला. त्याला मारायचे पण आपल्या अंगावर काही घ्यायचे नाही असा त्यांनी प्लॅन केला. शनिवार दि.६ मे रोजी रूपेशने शौर्यला खाऊचे अमिष दाखवून आपल्या दुचाकी गाडीवर घेतले. लहानगा शौर्य हा खाऊ मिळणार म्हणून त्याच्या गाडीवर बसला. तो आपल्या मुलाला कशासाठी घेऊन जात आहे हे ज्योतीला माहित होते तिने ही त्यावेळी मुलगा शौर्य याला लाडी गोडीने त्याच्या गाडीवर बसविले. त्याला त्याने लेंगरे गावातून काही अंतरावर असलेल्या शफी पिरजादे याच्या विहिरीजवळ आणले. तेथे त्याला गाडीवरून त्याने खाली उतरविले. आजुबाजुला कुणी नाही हे पाहून रुपेशने त्याला उचलून धरले. त्याचे खाली डोके पाय वर करून कोणाला काही समजण्याच्या आतच त्याने विहिरीतील पाण्यात टाकले. विहिरीत पाणी ही जास्त असल्याने तो पाण्यात पडत असताना विहिरीतील एका दगडावर पडला. त्याच्या डोक्याला मार लागल्याने तो विहिरीत पडला. पाण्यात बुडून त्याचा लगेच मृत्यू झाला. तो पाण्यात बुडत असल्याचे बघून रुपेशने तेथून काढता पाय काढला. इकडे घरी येऊन रूपेशने ज्योतीला आपण शौर्यला विहिरीत टाकल्याचे सांगून त्यात त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले. इकडे शनिवारी लगेच त्या दोघांनी विटा पोलीस स्टेशन गाठून सहा वर्षीय शौर्य हरविल्याचे सांगून तशी लेखी फिर्याद ज्योतीने दिली. त्याचप्रमाणे त्या दोघांनी सोशल मिडियावर शौर्य हरविला असल्याचा मेसेज टाकला. लेंगरे गावातून शौर्य बेपत्ता झाल्याची माहिती लोकांना समजताच अनेकजण त्याचा शोध ही घेऊ लागले. पण त्याचा शोध काही लागत नव्हता. यात दोन दिवस गेले. या दरम्यान ज्योती ही सारखे पोलीस स्टेशनला येवून पोलीसांना शौर्य बद्दल विचारू लागली होती. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना पोलीसांना गावातील लोकांकडून ज्योतीचे आणि रूपेशचे विवाहबाहय संबंध असल्याची माहिती मिळाली होती. त्यामुळे या संबंधातून तिनेच शौर्यचे काही तरी बरे वाईट केल्याचा संशय पोलीसांना येत होता. पोलीस तिच्याकडे चौकशी करीत असताना तिच्या बोलण्यात ही पोलीसांना विसगंती जाणवत होती. इकडे पोलीसांनी रूपेश घाडगे याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे शौर्यची चौकशी केली असता तो ही पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे देत होता. पोलीसांचा त्याचेवर संशय बळावल्याने त्यांनी त्याला पोलीसी खाक्या दाखविला असता त्याने शौर्यला आपणच विहिरीत टाकून त्याचा खून केल्याचे पोलीसांना सांगितले. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर या घटनेतील ज्योती हिला ही पोलीसांनी ताब्यात घेतले. तिने ही आपल्या गुन्हयाची कबुली दिली तसेच आपले व रूपेशचे विवाहबाहय संबंध असल्याने त्याच्याबरोबर आपल्याला लग्न करायचे होते पण आमच्या संबंधात मुलगा शौर्यचा अडसर ठरत असल्याने आम्ही दोघांनी त्याला विहिरीत ढकलून दिल्याचे तिने पोलीसांना सांगितले. त्यांनी सांगितलेल्या माहिती प्रमाणे विटा शहर पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत मंगळवार दि.९ मे रोजी शौर्यचा मृतदेह त्या विहिरीतून काढला. त्यावेळी घटनास्थळी बघ्यांची गर्दी झाली होती आया बायाच्या डोळ्यातून शौर्यचा मृतदेह पाहून डोळ्यातून पाणी येत होते. काही वयोवृध्द महिलांनी तर ज्योतीला घाणेरडया शिव्या देत आपली बोटे मोडली होती. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मयत शौर्यचा मृतदेह शवविच्छेदनासाठी विटा येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची लेखी फिर्याद विटा पोलीसांत प्रकाश लोंढे यांनी दिल्याने शौर्य प्रकाश लोंढे (६)याच्या खून प्रकरणी ज्योती प्रकाश लोंढे (२७) तिचा प्रियकर रूपेश नामदेव घाडगे (२५) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याना कोर्टासमोर उभे केले असता कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी रूपेशकडून गुन्हयात वापरलेली दुचाकी गाडी जप्त केली. या घटनेचा तपास पो.निरी.संतोष डोके याच्या मार्गदर्शनाखाली हवा. अमोल पाटील, सोमनाथ कोळी यांनी केला.

## अनैतिक संबंध अखेर जीवघेणे ...

पोलीस पाटलांना दिली. त्यांनी ही माहिती दोडामार्ग पोलीसाना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी त्या महिलेच्या अंगावर लाल रंगाचा कुर्ता आणि एका हातात सोन्याची बांगडी, तर दुसऱ्या हाताच्या बोटात सोन्याची अंगठी दिसत असल्याने ही महिला सधन कुंटूंबातील दिसत होती. तिच्या गळयाभोवती ओंढणी होती. त्या ओढणीनेच तिचा गळा आवळलेला दिसत होता. शिवाय तिचा चेहरा ओळखू नये म्हणून तिच्या चेहरा दगडाने ठेचलेला होता. त्यामुळे त्या महिलेची ओळख पटविणे पोलीसांना गरजेचे होते. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून तपासाला सुरूवात केल्यानंतर ही महिला कोण आहे याचा शोध घेत असताना तिच्या पेहऱ्यावरून ही महिला दोडामार्ग किंवा असापासच्या परिसरातील नाही याची खात्री पोलीसांना पटली. सदर महिला ही परराज्यातील असावी असा कयास बांधून पोलीसांनी जवळच्या आणि गोवा राज्यातील पोलीस स्टेशनमध्ये या वर्णनाची कुणी महिला बेपत्ता आहे का? याचा शोध घेत असताना गोव्यातील म्हपसा पोलीस स्टेशमध्ये एक महिला बेपत्ता असल्याची तक्रार नोंदविण्यात आली असल्याची माहिती पोलीसांना मिळाली.ही महिला बेपत्ता असल्याची तक्रार तिच्या प्रियकराने पोलीसात देवून संशय म्हणून तिच्या नवऱ्याचे नाव पोलीसात दिले होते. दोडामार्ग पोलीसांनी म्हापसा पोलीसाशी संपर्क साधून या मयत महिलेची ओळख पटवली.ही महिला विशिता विनोद नाईक ही असल्याची माहिती मिळाली. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना तो, ती आणि तिचा प्रियकर अशी त्रिकोणी प्रेमाची कहाणी पुढे आली आणि त्यातूनच ही खूनाची घटना घडली असल्याची माहिती मिळाली. विशिता हिचे विनोद नाईक याच्या बरोबर २०१५ साली लग्न झाले होते. विनोद हा गोवा इलेक्ट्रीकल बोर्डात वायरमन म्हणून काम करीत होता. त्यांना एक सहा वर्षाची मुलगी आहे. लग्न झाल्यापासूनच विनोद आणि विशिताचे पटत नव्हते. त्याचेत नेहमी भांडण तंटा होत होता. ते दोघे ही वास्को येथील बेलबाय येथे राहयला असताना विशिताचे एका तरूणाबरोबर सुत जुळले. ती त्याचेबरोबर मौज मजा करीत हिंडू फिरू लागली. तशी ती मार्डन विचारांची असल्याने तिला नवऱ्याच्या बंधनात अडकायचे नव्हते. नवऱ्यापेक्षा तिला तिचा प्रियकरच त्या कामासाठी पाहिजे असल्याने ती त्याचेबरोबरच गुलछर्रे उडवित मौज मजा करीत होती. आपली पत्नी विशिता ही आपल्या मित्राला चिकटली आहे. ती त्याचेबरोबर संबंध ठेवून आहे याची माहिती विनोदला समजल्यावर तो तिच्यावर जास्तच चिडला. रोज तो तिच्याशी भांडण काढून तिला मारहाण करू लागला. या गोष्टीचा विशिताला राग येत होता. त्यातच तो दारू पिऊन आला की सैतानच बनत होता. तिला त्याच्याशी संबंध तोडून टाक घराकडे आणि मुलीकडे लक्ष दे म्हणून सांगत होता. पण ती त्याच्या प्रेमात इतकी आकंठ बुडाली होती की तिला आता नवरा नकोच होता. म्हणून तिने मुलगीला त्याच्याजवळच सोडून प्रियकराबरोबर गेल्या तीन वर्षापासून राहू लागली होती. त्यामुळे विनोद हा जास्तच अस्वस्थ झाला होता. पत्नी सोडून गेल्यावर तो म्हापसा येथील पिंटो अपार्टमेंटमध्ये राहयला आला. त्याने आपल्या सहा वर्षाच्या मुलीला आपल्या आई वडिलाजवल सोडले. विशिताच्या बाहेरख्याली वागण्याने त्याची मित्रात अब्रु तर गेलीच होती. तरी ही त्याला आपला संसार मोडयाचा नव्हता. तो अधून मधून पत्नी विशिताला भेटायचा. तिची समजूत काढून झाले गेले विसरून जावू तु मी मुलगी असे परत राहू असे सांगत होता. पण ती त्याचे काही ऐकत नव्हती. उलट ती त्याला मला तुझ्यापासून घटस्फोट हवा आहे मला तुझ्या बंधनात राहयला आवडत नाही मला माझ्या प्रियकराबरोबरच राहयचे आहे असे सांगून त्याचा हिरमोड करीत होती. तो हल्ली रोज दारू पित होता.त्याला त्याचे जीवनच नको होते. पत्नीने बाहेरख्याली वागून त्याचे जीवन बरबाद केले होते. तिला तिच्या प्रियकरापासून वेगळे करण्याचा त्याने बराच प्रयत्न केला. त्याने तिच्या प्रियकराची म्हणजे आपल्या मित्राची ही भेट घेऊन त्याला ही आपल्या पत्नीचा नाद सोड नाही तर याचे परिणाम गंभीर होतील अशी धमकी दिली होती. तो ही विशिताच्या जवानीला भुलला असल्याने त्याला ती कामासाठी पाहिजेच होती. मित्राची बायको उपभोगायला मिळत असल्याने तो ही खुश होता.तो ही तिला सोडयला तयार नव्हता. इकडे विनोद हा जाम वैतागलेला होता. त्याचे कामावर ही लक्ष लागत नव्हते. तो सारखे पत्नीला भेटायला बोलवित होता. तिच्या मनात त्याच्यापासून घटस्फोट घ्यायचा असल्याने ती ही त्याला भेटत होती. दोघे ही आपआपल्या मातावर ठाम होते. तिला पतीबरोबर राहयचे नव्हते. ती त्याला विरोध करीत होती. गेल्या तीन वर्षापासून तिने त्याला शारीरिक सुख ही दिले नव्हते. तो तिच्या त्या सुखापासून वंचितच होता. पत्नी आपल्याला सोडून प्रियकराला पाहिजे ते सुख देते आपल्याला जवळ ही येवू देत नाही त्यामुळे तो जास्तच तिच्यावर चिडला होता. ती सांगून ही ऐकत नाही तिचा आता कायमचा काटा काढायचा म्हणजे आपल्याला समाधान मिळेल. त्या शिवाय आपल्या जीवाला चैन पडणार नाही असा त्याने विचार केला. त्याने आपल्या मनातील ही गोष्ट आपला दुसरा मित्र ऋतुराज श्रावण इंगवले याला सांगितली.तो मुळचा कोल्हापूर जिल्हयातील चंदगड येथील असल्याने त्याला दोडामार्ग परिसरातील चांगली माहिती होती.तो गोव्यात टॅक्सी चालक म्हणून काम करीत असतो.राहयला तो म्हापसा येथील चारीवाडा येथे पत्नी आणि सासू सोबत राहत आहे.विनोदची आणि त्याची मैत्री ही गेल्या दोन वर्षापासूनची असून दोघे ही नेहमी दारू प्यायला आणि पार्टीला एकत्र बसत होते. विनोदने ज्यावेळी त्याला आपल्या पत्नी विषयी सांगितले आणि तिचा कायमचा काटा काढायचा हे सांगितले त्यावेळी त्याने मित्राची मैत्री म्हणून लगेच या गोष्टीला होकार दिला.विशिताचा काटा काढायचा तर विनोदच्या एकटच्या हातून होणार नव्हते.कारण ती शरीरयष्टीने धष्टपुष्ट होती.म्हणून त्याने मदतीला ऋतुराजला घेतले.त्या दोघांनी तिला मारण्याचा प्लॅन केला. सोमवार दि.८ मे रोजी विनोदने पत्नी विशिताला फोन करून रात्री ८च्या सुमारास एका हॉटेलमध्ये भेटण्यास बोलविले. ती त्याला भेटायला आल्यावर नेहमीप्रमाणे त्याने आपली कॅसेट ढकलली.तिला तो तिच्या प्रियकराचा नाद सोड म्हणून सांगत होता. त्यावेळी ती त्याला म्हणाली तू मला हे गेल्या तीन वर्षापासून हेच सांगत आहेस. मी काही त्याला सोडणार नाही,उलट तूच माझ्या मार्गातून बाजूला हो. यावेळी ही ती काही ऐकत नसल्याने तिची समजूत काढण्यासाठी त्याने तिला आपण बाहेर जेवायला जावू असे सांगितले. ती ही तयार झाली. त्यावेळी हॉटेलच्या बाहेर विनोदचा मित्र ऋतुराज हा कार घेऊन उभा होता. त्या कारमध्ये ते दोघे बसले.विनोदने ठरल्याप्रमाणे ऋतुराजला कार दोडमार्ग येथे घेण्यास सांगितले. यावेळी त्याने विशिताला ऋतुराजची ओळख आपला मित्र म्हणून करून दिली.दोडामार्ग येथील एका हॉटेलात त्यांनी जेवण करून रात्री उशिरा परत गोव्याला जात असताना विनोदने विशिताला सांगितले की,जवळच एका ठिकाणी त्याचा मित्र त्याचे पैसे देणार आहे तो पैसे घेऊ आणि आपण परत जावू म्हणून त्यांनी त्या कारमधून घोटगेवाडीच्या दिशेने प्रवास करू लागले. कार ऋतुराज चालवित असल्याने ते दोघे ही पाठीमागील सीटवर बसले होते.कार घोटगेवाडी-भटवाडी येथे आली असता ऋतुराजने ठरलेल्या प्लॅनप्रमाणे कार थांबवली. त्यावेळी विशिताने कार का थांबवली अशी विचारणा केली असता त्याने लघुशंकेचे कारण सांगितले. त्यावेळी कारमध्येच विनोदने तिच्या गळ्याभोवती असलेल्या ओढणीने गळा आवळायला सुरूवात केली. ती ओरडत त्याला बाजुला ढकलत होती. तेवढयाच ऋतुराजने येऊन तिचे हातपाय धरले. एव्हान तिच्या लक्षात हा सगळा प्रकार आला असल्याने ती त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत होती पण त्या दोघांनी ताकद लावली असल्याने तिची काही क्षणातच हालचाल मंदावली. तिचा जागीच मृत्यू झाला. तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी म्हणून त्या दोघांनी तिचा मृतदेह कारमधून बाहेर काढला. रात्रीच्या अंधारात त्यावेळी तेथे कुणी असण्याचा प्रश्नच नव्हता.त्या दोघांनी तिचा मृतदेह ओढून नदीच्या कठडयाजवळ आणला. कठडयावरून मृतदेह टाकायचा असा विचार त्यांनी केला. पण तिची शरीर यष्टी मजबूत असल्याने त्यांना तिला काही टाकता शक्य झाले नाही म्हणून त्यांनी तिचा मृतदेह परत कठडयापासून जवळच असलेल्या शेतात नेला. तेथे त्यांनी तिचा मृतदेह ओळखू नये म्हणून विनोदने तिच्या चेहऱ्यावर दगड घातला.जेणे करून तिचा चेहरा विद्रपु होईल आणि मृतदेह कोणाला ओळखता येणार नाही. तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावून ते दोघे ही सुक्षकी बलोनो कारने गोवा गाठले. दुसऱ्या दिवशी संध्याकाळच्या सुमारास भटवाडी येथील पुरोहित संध्याकाळच्या सुमारास आपल्या गुरांना चारविण्यासाठी गेला असता त्याला कठडयाजवळील झाडाझुडपात एका महिलेचा मृतदेह दिसला.त्याने या घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते मायकल लोबो यांना दिली त्यांनी ही माहिती पोलीस पाटील रामचंद्र नाईक यांना दिली.त्यांनी ही माहिती दोडामार्ग पोलीसांना दिली.घटनास्थळी दोडामार्ग पोलीस स्टेशनेचे पो.निरी.ऋषीकेष अधिकारी, स.पो.नी.जयेश ठाकूर, रामचंद्र मळगावकर, अनिल पाटील, संजय गवस, बाबी देसाई, दीप सुतार, तनजा हरमलकर, बाळकृष्ण जाधव हे आले. मयत महिलेच्या अगांवर लाल रंगाचा कुर्ता, एका हातात सोन्याची बांगडी तर दुसऱ्या हाताच्या बोटात सोन्याची अंगठी, बाजुलाच तिचे सॅन्डल पडलेले होते. तिचा चेहरा दगडाने ठेचून विद्रुप करण्यात आला होता.तर गळ्या भोवती तिच्याच ओढणीने गळा आवळ्याचे दिसत होते. घटनास्थळी सावंतवाडीच्या डीवायएसपी. डॉ.रोहिनी सांळुखे यांनी भेट देऊन घटनेची माहिती घेऊन पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. पोलीसांनी मयताचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सिधुंदुर्ग येथील सरकारी रूग्णालयात पाठवून दिला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना मयत महिलेची ओळख पटवून तांत्रिक दृष्टया तपास करीत या घटनेतील संशयीत आरोपी मयत विशिता नाईक हिचा पती विनोद मनोहर नाईक याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे या घटनेची चौकशी करीत असताना तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. त्याच्या बोलण्यात पोलीसांना विसंगती जाणवत होती.त्यातच ती बेपत्ता असल्याची तक्रार म्हपसा पोलीस स्टेशनमध्ये विशिताच्या प्रियकराने देऊन संशयीत म्हणून विनोद नाईक याचे नाव घेतले होते.पोलीसांनी त्याला पोलीसी खाक्या दाखवून बोलते केले असता त्याने आपला गुन्हा कबुल करीत या घटनेत आपला मित्र ऋतुराज इंगवले याने मदत केल्याची माहिती पोलीसांना दिली. लागलीच पोलीसांनी त्याला ही ताब्यात घेऊन त्याच्याकडे या गुन्हयाची चौकशी केली असता त्याने ही आपला गुन्हा कबुल केला. या घटनेची फिर्याद मयत विशिता नाईक हिच्या प्रियकराने दिल्याने पोलीसांनी दोडामार्ग पोलीस स्टेशनमध्ये विशिता विनोद नाईक (३०) रा.गोवा हिचा खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी तिचा पती विनोद मनोहर नाईक (४०) आणि त्याचा मित्र ऋतराज श्रावण इंगवले (२५) रा.दोघे ही गोवा याच्या विरोधात दोडामार्ग पोलीसात गुन्हा दाखल करून त्यांना सावंतवाडी येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी गुन्हयात वापरलेला दगड,ओंढणी आणि सुत्रकी बलोनो कार जप्त केली. या घटनेचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेषनचे पोलीसा बरोबर दोडामार्ग पोलीसांनी करून संशयीतांना ताब्यात घेतले.

# सफाळे परिसर समितीचे ग्रामीण रुग्णालयासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन!






**सफाळे/एच.लोखंडे**

सफाळे ता. जि. पालघर येथे सर्व सोयीने युक्त असे सुसज्ज ग्रामीण रुग्णालयासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक ११ मे २०२३ रोजी सफाळे परिसर संघर्ष समितीचे धरणे आंदोलन सुरू करण्यात आले होते. सफाळे परिसरात सुसज्ज सर्व सोईउपयुक्त ग्रामीण रुग्णालय नसल्याने उपचारा अभावी अनेक रूग्णांनाचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. या अनुषंगाने सफाळे परिसर संघर्ष समिती मागील ३ वर्षापासून पाठपुरावा करीत असुन, आक्रमक भूमिका घेत जिल्हाधिकारी कार्यालय समोर धरणे आंदोलन करण्यात आले. सफाळे पुर्व पश्चिम भागातील परिसरात अंदाजे ४०- ते ५ ० छोटी मोठी गावे पाडे वस्त्या असुन अंदाजे एक ते दिड लाख लोकसंख्येचा भार असलेल्या सफाळे प्राथमिक आरोग्य केंद्र पडत असून वेळोवर उपचार मिळत नाही. शासनाकडून होणारा अपूर्ण औषध पुरवठा, ऑक्सिजनची सेवा नसणे,या अभावामुळे रूग्णांनाचे हाल होत आहेत. यासाठी सफाळे येथे सुसज्ज रुग्णालय होणे ही काळाची गरज असुन, सफाळे परिसरात ग्रामीण रुग्णालयासाठी सफाळे परिसर संघर्ष समिती व्दारा जिल्हा अधिकारी कार्यालया समोर धरणे आंदोलन करण्यात आले असताना, आंदोलनच्या ठिकाणी सौ. भारती कामडी- माजी जिल्हा परिषद अध्यक्षा व सदस्या भारती कामडी, शिवसेना ठाकरे गटाचे पदाधिकारी तसेच श्री.जतिन कदमसर - सामाजिक कार्यकर्ते - सफाळे, यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन पाठिंबा दर्शविला होता. आरोग्य विभागामार्फत जिल्हा शल्य चिकित्सक डॉ संजय बोदाडे यांनी आंदोलन कर्त्यांची भेट देऊन शासन दरबारी पाठपुरावा करु असे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर उपजिल्हाधिकारी डॉ किरण महाजन यांची शिष्टमंडळाने भेट देऊन, त्यांना मागण्या संदर्भात लेखी निवेद देण्यात आले. या वेळी संघर्ष समितीचे अध्यक्ष भरत काळे, पदाधिकारी मंगेश घरत, नचिकेत पाटील, अंजली कुडु, कार्तिकी चुरी, सुनील निमकर, रामकृष्ण पाटील, आदी पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, हितचिंतक, मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते. संजय बोदाडे जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांनी आंदोलन कर्ते यांना शासन दरबारी आपल्या मागण्यासाठी पाठपुरावा करू असे आश्वासन दिले असताना, आंदोलन स्थगित करण्यात आले.

**शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळा मार्फत**

## थकीत मुद्दल व व्याज एकरक्कमी भरून योजनेचा लाभ ३१ मे पर्यंत घ्यावा!

**पालघर/प्रतिनिधी**

शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ मर्या. मुंबई यांच्या जिल्हा कार्यालय पालघर मार्फत विविध कर्ज योजनेंतर्गत जिल्ह्यातील इतर मागस प्रवर्गातील लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराकरिता अल्प व्याज दराने कर्ज वितरीत करण्यात आले आहे. जिल्ह्यातील थकीत कर्ज रक्कम असलेल्या लाभार्थ्यांना जाहिर आवाहन करण्यात येते की, महामंडळाकडून घेतलेल्या कर्जाची मुदत संपलेल्या लाभार्थींना महामंडळाकडून घेतलेल्या कर्जावर संपूर्ण थकीत व्याज रक्कमेवर लाभार्थ्यांना ५०% सवलत देण्यात येणार आहे. त्याचा लाभ घेऊन सर्व संबंधित लाभार्थ्यांनी थकीत मुद्दल व व्याज एकरकमी परतावा (One Time Settlement) योजनेचा दि. ३१ मे पर्यंत लाभ घेऊन कर्ज खाती बंद करुन कर्जमुक्त व्हावे तसेच कायदेशीर कार्यवाही टाळावी. याबाबत शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक, आर.एम. मेश्राम, यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ जिल्हा पालघर यांनी केले आहे.

## सीबीएसी परीक्षेत राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलचे यश

**लातूर/प्रतिनिधी**

दहावी च्या परीक्षेत राजा नारायणलाल लाहोटी (CBSE) इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सलग अकराव्या वर्षी १००% निकालासह घवघवीत यश प्राप्त केले असून अथर्व रमेश रेड्डी व समर्थ तुकाराम गित्ते या विद्यर्थ्यांनी ९८.२०% सह विद्यालयात सर्वप्रथम येण्याचा मान पटकावला. यासह तब्बल १४ विद्यार्थ्यांनी ९५% पेक्षा जास्त तर १८ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त, २८ विद्यर्थ्यांनी ८०% पेक्षा जास्त तर २१ विद्यार्थ्यांनी ७० टे ८०% गुणांसह आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम राखली.या विद्यालयातून एकूण १०९ विद्यार्थ्यांनी शालांत परीक्षा दिली पैकी ९५% पेक्षा अधिक गुणांसह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये कु प्राची मनीष तोष्णीवाल ९७.४०%, अक्षत गोपाल दरक ९७.२०%, श्लोक घनश्याम धूत ९७%, आर्या महेश तापडिया ९६.४०%, केवली रवींद्र पांगल ९६.४०%, अथर्व रमेश कुलकर्णी ९५.६०%, मुग्धा किरणकुमार किटेकर ९५.६०%, विश्र्ववर्धन वसंत चव्हाण ९५.४०%, अद्वैत अभिजित मुगळीकर, वेदांत दीपक जाधव, शिवम सुनील विश्र्वेकर, क्षात्रतेज राजाभाऊ वडने ९५% यांचा समावेश आहे. तर ९०% पेक्षा अधिक गुणांसह सर्वेश सिद्धेश्वर अर्केरी ९४.२०%, सत्यजित चंद्रकांत तोडकर ९४.००%, श्रुतिका शशिकांत बट्टवार ९३.४०%, सौम्य सौदागर काटे ९३.२०%, मिताली विनय भुतडा ९३%, आर्यन शैलेश लाहोटी ९३%, गणेश रणजीत निंबाळकर ९२.६%, निशिता महेश कदम ९२.२०%, प्रीशा अभिजित गिलाडा ९२.२०%, सार्थक सतीश शेळके ९१.८०%, श्लोक केशवराज बाहेती ९१.८०%, पायल सचिन पाटील क्षीरसागर ९१.४०, धनश्री विजय तापडिया ९१.४०%, जिया महेश भानुशाली ९१.४०%, अभिषेक किशोर कुलकर्णी, तनुजा नरेंद्र भागवत, अवनी धीरज बेम्बडे, इशिता विपिन अग्रवाल ९०% आदी उत्तीर्ण झाले. तर ८० ते ९० % घेणाऱ्या विद्यार्थांमध्ये २२ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. CBSEच्या -ISSCE - २०२३ या इ. बारावी बोर्ड परीक्षेत राजा नारायणलाल लाहोटी (CBSE) इंग्लिश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी सलग आठव्या वर्षी १००% निकालासह उज्वल यश संपादन केले. प्रसाद उमाकांत बिराजदार या विद्यार्थ्याने ४०३ गुण घेऊन विद्यालयात सर्वप्रथम तर ३ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह यश संपादन केले. सर्व विद्यार्थी तथा शिक्षकांचे श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री शैलेशकुमार लाहोटी, विश्र्वस्त अध्यक्ष श्री लक्ष्मिरमणजी लाहोटी, सचिव श्री आशिष जी बाजपाई, विद्यालयाचे चेअरमन श्री आनंद जी लाहोटी, उपाध्यक्ष दिनेश इंनानी, श्री राजेंद्रकुमार मालपाणी, सचिव श्री आशिष बाजपाई, कोषाध्यक्ष श्री ईश्र्वरप्रसाद डागा, सहसचिव श्री शरदकुमार नावंदर, श्री हुकुमचंद कलंत्री, डॉ श्री अनिल जी राठी, श्री चैतन्य भार्गव, श्री आशिष अग्रवाल, श्री स्नेहल उटगे, श्री आशिष सोमाणी, श्री रवींद्र वोरा, श्री निखील राठी प्राचार्य कर्नल एस श्रीनिवासुलू यांनी अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## भिवंडीत गुन्हे शाखेने जवळपास साडेचार लाखांचे ४५ मोबाईल नागरिकांना केले सुपूर्द



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरात मोबाईल हिसकावण्याच्या गुन्हे वाढत असताना भिवंडी गुन्हे शाखेने मागील पंधरा दिवसात केलेल्या कामगिरीत चोरीस व गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध लावण्यात यश मिळविले असून तब्बल ४ लाख ४८ हजार रुपये किमतीचे ४५ मोबाईल नागरिकांना गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त निलेश सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत परत करण्यात आले. मागील काही दिवसात शहरात मोबाईल हिसकावून चोरीचे गुन्हे वाढले असताना गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि विजय मोरे, सपोनि धनराज केदार, पोलिस नाईक पोना सचिन जाधव, पोलीस शिपाई भावेश घरत, अमोल इंगळे, महिला पोलिस नाईक माया डोंगरे, श्रेया खताळ या पोलिस पथकाने सी.ई. आय. आर. प्रणालीचा वापर करून तसेच मोबाईल नंबरचे आय.एम.ई.आय.नंबर वरून गहाळ मोबाईलचा शोध घेत यशस्वी तपास करीत मागील काही दिवसात विविध गुन्हेगारांना ताब्यात घेत त्यांच्या जवळून हे चोरीचे मोबाईल जप्त केले आहेत .नागरिकांना त्यांचे चोरीस गेलेले मोबाईल परत मिळाल्याने त्यांच्या आनंदाला पारावार उरला नव्हता त्यांनी पोलिस प्रशासनाच्या कामगिरी बद्दल समाधान व्यक्त केले आहे.

## गृहयुद्धात अडकलेले महाराष्ट्रातील ३४ नागरिक भारतात दाखल



**मुंबई/प्रतिनिधी**

सुदानमधील गृहयुद्धात अडकून पडलेल्या भारतीयांची सुटका करण्यासाठी परराष्ट्र मंत्रालयातर्फे ऑपरेशन कावेरी' सुरू करण्यात आले आहे. या मोहिमेअंतर्गत रात्री १२.०० वाजता दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर लष्कराच्या विशेष विमानाने ३२८ भारतीय नागरिकांची विसावी तुकडी भारतात परतली. यात महाराष्ट्रातील ३४ नागरिकांचा समावेश आहे. सुदान येथुन परत आणलेल्या नागरिकांना राज्य शासनाच्या दिल्लीस्थित महाराष्ट्र सदनाद्वारे स्थापन सहकार्य कक्षाच्या माध्यमातून सुखरूप स्वगृही पाठविण्यात येणार आहे. यासाठी महाराष्ट्र सदनाच्या प्रभारी निवासी आयुक्त नीवा जैन यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर महाराष्ट्र सदनाचा सहकार्य कक्ष सुरु करण्यात आला आहे. सदनाचे अपर निवासी आयुक्त डॉ. राजेश अडपावार हे या कक्षाच्या पर्यवेक्षणाची आणि केंद्र सरकारसमवेत समन्वयाची जबाबदारी पार पाडत आहेत. दिल्लीत दाखल होणाऱ्या महाराष्ट्रातील नागरिकांना आवश्यकतेनुसार राज्यातील त्यांच्या घरापासून नजीकच्या गंतव्यस्थळी पोहचविण्यासाठी कक्षाद्वारे समन्वयाचे कार्य होत आहे. विमानतळावर स्थापन करण्यात आलेल्या कक्षाच्या माध्यमातून नागरिकांना महाराष्ट्र सदनात ने-आण करण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. या नागरिकांची निवासाची व भोजनाची व्यवस्था महाराष्ट्र सदनात करण्यात आली आहे. सुदानमधून दिल्लीत परतणाऱ्या भारतातील विविध राज्यातील नागरिकांना आप-आपल्या राज्यात सुखरुप पोहचता यावे यासाठी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने दिल्लीस्थित विविध राज्यांच्या निवासी आयुक्त कार्यालयांना मदत कक्ष स्थापन करण्याच्या सूचना केल्या आहेत. यानुसार इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर महाराष्ट्रासह अन्य राज्यांचे मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

## भारतीय शिक्षण पद्धती उपयुक्त - दीपक केसरकर



**मुंबई/प्रतिनिधी**

भारतीय शिक्षण पद्धती उपयुक्त आहे. जगातील ज्या चांगल्या शिक्षण पद्धती अथवा चांगले अभ्यासक्रम असतील त्यांचा अवश्य स्वीकार करा. तथापि प्राथमिक स्तरावर भारतीय शिक्षण पद्धती योग्य असल्यास ती विनाकारण बदलू नका, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिले. तसेच इंग्रजीच्या अट्टाहासातून बाहेर पडण्याचे आवाहनही त्यांनी केले. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या (बालभारती) नियामक मंडळाची २५१ वी सभा आज शालेय शिक्षण मंत्री तथा मंडळाचे अध्यक्ष श्री. केसरकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे झाली. यावेळी प्रधान सचिव रणजित सिंह देओल, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक कैलास पगारे, शालेय शिक्षण आयुक्त सुरज मांढरे, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाचे अध्यक्ष तथा प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाचे संचालक तथा माध्यमिक शिक्षण संचालक आणि नियामक मंडळाचे सदस्य सचिव कृष्णकुमार पाटील तसेच संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते. मंत्री श्री. केसरकर म्हणाले की, भारतीय संस्कृती आणि शिक्षण पद्धती पुरातन आहे. विद्यार्थ्यांना हसत-खेळत शिकवताना झालेला अभ्यास कायम लक्षात राहतो. त्यामुळे जे चांगले आहे ते स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी केले. ते म्हणाले की, बालभारतीची पुस्तके आणि त्यासाठी साठवायचा पेपर खराब होणार नाही याची दक्षता घेताना राज्यातील गोडाऊन सुस्थितीत ठेवावेत. पावसाळ्यापूर्वी ही कामे पूर्ण करावीत. जगात ज्या चांगल्या शिक्षण पद्धती आहेत त्या सर्व एकाच ठिकाणी जाणून घेता याव्यात याअनुषंगाने एक संग्रहालय तयार करावे, असे सांगून हे संग्रहालय संशोधनासाठी उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सर्व शाळा इंटरनेटशी जोडल्या जाणार आहेत. यासाठी दुर्गम भागातील ज्या शाळांमध्ये नेटवर्क नाही, त्यांची माहिती घेऊन त्या उपग्रहाद्वारे जोडण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याची सूचना मंत्री श्री. केसरकर यांनी केली.

येत्या शैक्षणिक वर्षापासून उपलब्ध करून देण्यात येणारी पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना वेळेत मिळतील, याची दक्षता घेण्याचे निर्देश देऊन लहान मुलांना वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर आवडीची पुस्तके देखील शाळेत उपलब्ध करून द्या, असेही त्यांनी सांगितले.

## थोडक्यात वृत्तांत

### एकरकमी कर्ज परतावा योजनेस मुदतवाढ

लातूर : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाकडून कर्ज घेतलेल्या लाभार्थ्यांणा थकीत कर्ज रक्कमेचा व्याजासह एकरकमी कर्ज परतावा योजेला ३१ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाकडून कर्ज वाटप झालेल्या लाभार्थ्यांना संपूर्ण थकीत कर्ज रक्कम व्याजासह एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याज रक्कमेत ५० टक्के सवलत देण्यासाठी एकरकमी परतावा (ओटीएस) योजना महामंडळाने लागू केली आहे. या योजनेस ३१ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. या योजनेचा लाभार्थ्यांनी लाभ घेवून कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे.

### महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या सदस्यपदी नितीन शेटे

लातूर : महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. मुंबईच्या निमंत्रित सदस्यपदी लातूर येथील अर्थभारती नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष नितीन शेटे यांची निवड करण्यात आली आहे. फेडरेशनच्या संचालक मंडळाच्या नुकत्याच संपन्न झालेल्या सभेत ही निवड करण्यात आली. फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश कोयटे यांनी या आशयाचे पत्र नितीन शेटे यांना दिले आहे. अर्थभारती नागरी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या कार्याची दखल घेत ही निवड करण्यात आली आहे. मागील ३२ वर्षांपासून राज्यातील १६ हजार पतसंस्थांचे नेतृत्व करणारी संस्था अशी महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. मुंबईची ओळख आहे. या संस्थेचे सदस्य म्हणून नितीन शेटे यांना राज्य पातळीवर काम करण्याची संधी प्राप्त झाली आहे. या निवडीबद्दल नितीन शेटे यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### दक्ष अकॅडमी संचालकाचा सत्कार

लातूर : येथील पोलिस प्रशिक्षण दक्ष अकॅडमीचे संस्थापक राजकुमार अंबुलगे यांच्या मार्गदर्शनाखाली २८ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य पोलीस भरती यशस्वीरित्या यश मिळविले आहे.आई- वडील यांचे स्वप्नं साकारण्यासाठी पोलिस प्रशिक्षण घेऊन महाराष्ट्र राज्य शासनाच्या सेवेत दक्ष अकॅडमीचे २८ विद्यार्थी दाखल झाले आहेत. दक्ष अकॅडमीचे राजकुमार अंबुलगे यांच्या मार्गदर्शनाखाली या विद्यार्थ्यांनी हे यश मिळवले. त्याबद्दल अंबुलगे यांचा पालकांच्या वतीने पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला. तसेच अंबुलगे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी अ‍ॅड. राजेंद्र लोंढे, अ‍ॅड. लालासाहेब शेख, अजय आडगळे, अब्दुल समद शेख, सय्यद इलियास, अजहर सय्यद, नबी नळेगावकर, शंकर कांबळे, विकास कांबळे आदी उपस्थित होते.

### शिष्यवृत्तीचे नवीन अर्ज करण्याचे आवाहन

लातूर : अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०२१-२२ साठी री-अप्लाय करण्यासाठी आणि २०२२-२३ या वर्षासाठी भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक पाठ्यक्रमांशी संलग्न असलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता योजनेसाठी अर्ज भरण्यास महाडिबीटी पोर्टल २२ सप्टेंबर,२०२२ पासून सुरु करण्यात आलेले आहे. शासन मान्यताप्राप्त अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना या योजनांसाठी अर्ज करण्याचे आवाहन समाज कल्याण विभागाने केले आहे.प्राचार्य, कर्मचारी व विद्यार्थी यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज अचूक भरून मंजूरीसाठी समाज कल्याण कार्यालयास ३० मे २०२३ पूर्वी सादर करावेत. ३० मे २०२३ नंतर महाविद्यालय स्तरावर अथवा विद्यार्थी लॉगीनवर अर्ज प्रलंबित राहिल्यास त्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांची राहील, असे समाज कल्याण सहायक आयुक्त यांनी कळविले आहे.

### स्व. रंगकर्मी बंकट पुरी पुरस्काराने अ‍ॅड शैलेश गोजमगुंडे सन्मानित!

लातूर : लातूरच्या साहित्य व नाट्य चळवळीत अतिशय महत्त्वाचे योगदान दिलेल्या स्वर्गीय साहित्यिक जेष्ट रंगकर्मी बंकट पुरी यांच्या स्मरणार्थात या वर्षी पासून रंगकर्मी बंकट पुरी या पुरस्काराची सुरवात करण्यात आली आहे.अशी माहिती पुरस्कार समितीचे प्रमुख अनिल पुरी यांनी दिली. २०२३ या वर्षीतील हा पुरस्कार प्रसिध्द नाट्य लेखक दिग्दर्शक रंगकर्मी महाराष्ट्रातील नाट्य चळवळीत मोलाचे योगदान देणारे लातूर नाट्य परिषदेचे अध्यक्ष अ‍ॅड शैलेश गोजमगुंडे यांना दगडोजीराव देशमुख सांस्कृतिक सभागृहात लायन्स क्लबच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार नुकताच प्रधान करण्यात आला.नाट्य क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्तिना याही पुढे दरवर्षी रंगकर्मी बंकट पुरी हा पुरस्कार लातूर नाट्य परिषदेच्या वतीने दिला जाणार आहे.या पुरस्कारा बदल अ‍ॅड शैलेश गोजमगुंडे यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन केले जात आहे.

### उत्कृष्ट सूक्ष्म, लघु उद्योग पुरस्कारांसाठी आवाहन

लातूर : राज्य शासनाच्या उद्योग संचालनालयामार्फत जिल्ह्यात असामान्य कामगिरी करणाऱ्या लघु उद्योग घटकांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी दरवर्षी जिल्हास्तरावर उत्कृष्ट सूक्ष्म व लघु उद्योगांना पुरस्कार दिले जातात. प्रथम व द्वितीय क्रमांकासाठी अनुक्रमे १५ हजार रुपये व १० हजार रुपये रोख, गौरवचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. तरी सन २०२०, २०२१ व २०२२ या वर्षाच्या जिल्हास्तरीय पुरस्कारासाठी सूक्ष्म व लघु उद्योग घटकांनी १५ जून २०२३ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उद्योग घटक मागील तीन वर्षापूर्वी उद्यम नोंदणी असणे आवश्यक आहे, तसेच कमीत कमी मागील सलग दोन वर्षांपासून उत्पादनात असणे आवश्यक आहे. उद्योग घटकाने बँकेचे कर्ज घेतले असल्यास त्या कर्जाची नियमितपणे परतफेड केलेली असावी, हा उद्योग घटक थकबाकीदार असू नये. उद्योग घटकास यापूर्वी कोणताही जिल्हास्तरीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार मिळालेला नसावा. महिला व मागासवर्गीय उद्योजकांना प्राधान्य देण्यात येईल. जिल्हा उद्योग केंद्राने विहीत केलेल्या नमुन्यात अर्ज करणे अनिवार्य आहे. तरी पात्र लघुउद्योजकांनी १५ जून, २०२३ पूर्वी जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांचेकडे विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत. अधिक माहितीसाठी जिल्हा उद्योग केंद्राकडे संपर्क साधावा.

# हिंदुत्वामुळे अनिवासी भारतीय मोठ्या संकटात!

धर्म ही अफूची गोळी आहे. धर्मामुळे माणूस कर्तव्य आणि माणुसकी विसरतो. त्याचबरोबर नवेनवे शत्रू तयार करतो. धर्माच्या नावाने निर्माण झालेल्या पाकिस्तानची आज काय अवस्था आहे हे समोर दिसत असताना भारतात हिंदुत्वाच्या मुद्यावरून जे द्वेषाचे राजकारण सुरू झाले आहे, त्याचे दुष्परिणाम इथल्या लोकांना तर भोगावे लागणार आहेतच, पण परदेशात जे भारतीय वंशाचे लोक राहतात त्यांच्या समोरही मोठे संकट उभे राहिले आहे. कारण भारतात आज ज्या पद्धतीने मुस्लिमांना त्रास दिला जात आहे. त्यामुळे अनेक मुस्लिम राष्ट्र नाराज आहेत. बहरीन सारख्या देशाच्या संसदेत तर भारताविरोधी ठराव मांडण्यात आला आणि मोदी-शहांवर तिथल्या खासदारांनी कडाडून टीका केली. विषय होता पोलिसांच्या ताब्यात असलेल्या अतीक आणि त्याचा भाऊ अश्रफ यांच्या हत्येचा! अत्तिक आणि त्याचा भाऊ माफिया होते. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई व्हायलाच हवी होती यात शंकाच नाही. पण कायदेशीर मार्गाने कारवाई व्हायला हवी होती. पोलिसांच्या ताब्यात असताना त्यांची हत्या होणे ही गंभीर बाब आहे. ते केवळ मुसलमान होते म्हणून त्यांची हत्या करण्यात आली असा आरोप बहरीन मधील खासदारांनी केला आहे. इतकेच नव्हे तर भारतात ज्या पद्धतीने मुस्लिमांना त्रास दिला जात आहे त्याची दखल सर्व मुस्लिम राष्ट्रांनी घ्यावी असे पत्र बेहरींन कडून आखाती देशातील सर्व मुस्लिम राष्ट्रांना देण्यात आले आहे. इतकेच नव्हे तर भारतातील मुस्लिमांचा छळवाद थांबला नाही तर आखाती देशातील नागरिकांमध्ये त्याचे तीव्र पडसाद उमटतील असा इशारा सुद्धा बहरीनने दिला आहे. आणि हाच इशारा अत्यंत गंभीर आहे. कारण भारतातील लाखो लोक बहरीन, कुवेत, सौदी अरेबिया, इराक, इराण, ओमान या आखाती देशांमधे कामाला आहेत आणि तेथून ते कोट्यवधी रूपये भारतात पाठवतात. आज बहरीनचा एका दिनारची किंमत २८० भारतीय रुपये इतकी आहे. याचा अर्थ किती मोठ्या प्रमाणात आखाती देशातील पैसा भारतात येतो. आज याच पैशाच्या जोरावर मोदी महाशय भारताला आर्थिक महासत्ता बनवण्याची स्वप्न पाहत आहेत. अशावेळी या सर्व आखाती देशांनी भारतीय कामगार किंवा व्यापारी उद्योजकांना तेथून बाहेर काढले तर काय अवस्था होईल. गल्ली बोळात हिंदुत्वाचे नारे देणाऱ्यांना याची कल्पना आहे का? कशासाठी आपण इस्लामी राष्ट्रांचा रोष ओढवून घेतोय? आज पेट्रोलियम पदार्थाची आपल्याला मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागतेय आणि ही आयात आखाती देशांतून केली जात आहे. जर उद्या या आखाती देशांनी भारताला पेट्रोल-डिझेल देणे बंद केले तर हिंदुत्वाचे नारे देऊन मुस्लिमांचा द्वेष करणाऱ्यांच्या गाड्या पाण्यावर चालणार आहेत का? याचा खरे तर मोदी सरकारने विचार करायला हवा. कारण जगातील ८४ मुस्लिम देशांपैकी पाकिस्तान आणि तुर्की सोडल्यास सर्वच देशांशी भारताचे चांगले संबंध आहेत. या सर्व देशांमध्ये अनिवासी भारतीय नागरिक गुण्या गोविंदाने रहात आहेत. त्यांचा जीव का धोक्यात घालत आहात. माणसाला रोजी-रोटी, जात किंवा धर्म देत नाही तर जगण्यासाठी त्याला कष्ट करावे लागतात आणि हे कष्ट करताना त्याला अर्थातच सर्व जाती धर्माच्या लोकांची मदत घ्यावी लागते. आणि धर्माच्या वाचून कोणाचे काहीच अडत नाही हे वास्तव सर्वच जाती-धर्मातील कट्टरपंथीय लोकांनी लक्षात ठेवायला हवे. खास करून पंतप्रधान पदासारख्या सर्वोच्च पदावर बसलेल्या माणसाने जात, धर्म, देव, पंथ आणि आस्था या सरख्या गोष्टी बाजूला ठेवून काम करायला हवे. पण कर्नाटक प्रचारात मोदींनी बजरंग बलीला अक्षरशः खांद्यावर घेतले होते. त्यामुळे पंतप्रधान नेमके कोणाचे? भारतीय जनतेचे की हिंदूंचे असा प्रश्न पडला होता. पंतप्रधान मोदींच्या याच कृतीमुळे देशातील हिंदुत्ववादी लोकांना बळ मिळत आहेत. त्यामुळे ते सनातन हिंदू धर्म आणि मनुस्मृतीचे खुलेआम समर्थन करीत आहेत. घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृती जाळून धर्मांतर केले होते. पण जे लोक आज बाबासाहेबांच्या संविधानाच्या आधारे देशाचा गढा चालवत आहेत तेच लोक सनातन आणि मनु स्मृतीचे समर्थन करीत आहेत. आणि हीच परिस्थिती जर कायम राहिली तर या देशात दलीत, मुस्लिम ख्रिश्चन शीख यांना जगणे मुश्कील होईल, तेंव्हा हे सर्व थांबवायचं असेल तर प्रत्येक जाती धर्माच्या लोकांनी धर्म निरपेक्षता जपण्यासाठी आणि देशातील सर्वधर्मीय बंधुभाव कायम राखण्यासाठी एकजूट होऊन कायदेशीर मार्गाने हिंदुत्ववाद्यांना विरोध करायला हवा आणि या लढाईत जाती धर्माच्या पलीकडे पाहणारे आणि बंधुभाव जोपासणारे आमचे हिंदू बांधव सुद्धा सहभागी होतील. कारण इस्लाम खत्रे में हैं असा नारा देऊन निरपराध लोकांची कत्तल करणारे जिहादी जितके खतरनाक आहेत, तितकेच हिंदुत्वाचा नारा देऊन इतर धर्मीयांचा द्वेष करणारे हिंदुत्ववादी सुद्धा खतरनाक आहेत आणि हे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी या दोघांच्या विरोधात लढायची तयारी ठेवावी लागेल.




आंदोलनाच्या माध्यमातून शेतकऱ्याच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी जे स्व.शरद जोशी साहेबांनी तत्त्वज्ञान, धोरणे व विचारसरणी मांडली, ती आज तरी जगाच्या पाठीवर न विसरणारी किमया आहे. परंतु ही किमया साध्य करण्यासाठी राजकारणाची जोड हवी आहे. कारण शेतकऱ्यांची आर्थिक धोरणे हे संसद मध्ये कायद्याच्या चाकोरीत फसलेली आहे, आणि ती चाकोरी तोडण्यासाठी राजकीय क्षेत्राची गरज आहे. कारण प्रत्येक व्यवस्थेचा मूलभूत अधिकार जरी जनतेला दिला असेल तरी, कायदे दुरुस्त करणे ही बाब आमदार खासदारांवर आधारीत आहे. ती बाब जनतेच्या लक्षात येण्यासाठी बराच काळ जात असतो. शेतकऱ्यांची आर्थिक समस्या, त्यांना लूटलेली व्यवस्था आणि त्यांच्यावर होत असलेलं अधिराज्य ही बाब सामान्य माणसाच्या कल्पनेच्या पलीकडील आहे. सामान्य शेतकऱ्याला जर या देशाचा आर्थिक धोरण समजलं असतं तर त्यांनी शेती कशाला केली असती? आणि त्याला ते समजू नये यासाठी तर त्याला जास्तीत जास्त धार्मिक व्यवस्थेत गुंतवल्या जात आहे. शेतकऱ्यांचे शोषण होऊन या देशात औद्योगिक क्रांती व्हावी हे तर मुळात धोरणच राबविले जात आहे. आणि ती बाब आजच्या राजकीय पक्षांना काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, बीजेपी यांना ती तोडायची नाही.ही अशीच चालत असलेल्या व्यवस्थेवर तर त्यांना राज्य करायचे आहे. नुसतं छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत तुकाराम महाराज यांची नाव घेऊनच बोंबा ठोकायचे असून, राज्य करायचे आहे. आणि हा संपूर्ण समाज भीम जयंती, शिवजयंती, रामनवमी, हनुमान जयंती, भागवत सप्ताह, अशा अनेक धार्मिक क्षेत्रात गुंतून ठेवायचा आहे. मग शेतकरी सुखी करणे शेतकऱ्यांची बाजू उचलणे व शेतकऱ्यांना न्याय देणे ही बाब साधारण आजच्या राजकारणात दुरापास्त दिसत आहे. चिखलफेक करून घाणेरडे कपडे घालण्यापेक्षा, राजकारणाची व्यवस्था, तत्त्वज्ञाना प्रमाणे स्वच्छ करणे ही बाब अतिशय गंभीर आहे पण ते काही फार कठीण सुद्धा नाही. जनतेनी आणि निवडून आलेल्या नेत्यांनी जर या बाबीची पूर्तता केली तर ते शक्य सुद्धा होऊ शकते. ज्यां महापुरुषांनी तत्त्वज्ञानाचे धडे मांडले ते समाज सुधारक म्हणून गणल्या गेलेत. ते राजकारणात अपयशी झालेत. तत्त्वज्ञान हे गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी मांडल्या जाते, आणि राजकारण हे गुलामी स्वीकारण्यासाठी मांडल्या जाते. राजकारणाची भाषा सामान्य व्यक्तींना समजण्यासाठी अतिशय सोपी आणि सरळ असते. आणि तत्वज्ञानाची भाषा कठोर, गंभीर, संघर्षवादी, आणि मनाला हेलकावे देणारी असते. मात्र राजकारण करताना फवारे उडविले जाते, तत्त्वज्ञानात मात्र ध्येयनिष्टता असते. आणि ती ध्येयनिष्ठा साकार होण्यासाठी बराच काळ, वाट पाहावी लागेलं.

देशपातळीवर राज्य पातळीवर, ज्या घोषणा होतात, ते फक्त समाजात सोडलेले फुगे असतात आणि हे फुगे सोडल्याशिवाय राजनीति होऊ शकत नाही, हे पण तेवढेच खरे आहे. कारण तत्त्वज्ञान समजून घेणारी देशात, राज्यात, शहरात आणि गावात माणसे किती असू शकतात, बुद्धीच्या माध्यमातून, तत्त्वज्ञान समजून घेताना लोकसंख्येचा आणि मतदारांचा विचार केला तर, तत्त्वज्ञान समजून घेणारी माणसं एक टक्का सुद्धा नाहीत . मग राजकारण एक टक्का लोकांच्या भरोशावर होणार काय? मग सत्ता हातात कशी येईल हा राजकीय पक्षांचा प्रश्न असतो. म्हणून काही योजना राबविल्या जातात, काही साकार होतात आणि काही योजनांचे फक्त फटाके फुटतात. काहीच योजना ह्या समाजाच्या उपयोगी अस्तित्वात येण्यासारखे असतात. राजकारण करण्या साठी सर्व व्यापक विचाराची घडामोड असावी लागते, केवळ एक तत्त्वज्ञान घेऊन राजकारण करणे दूरा पास्त आहे. फक्त जातीच्या भरोशावर केलेले राजकारण थोडेफार राजकारणाच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. कारण या देशातील आर्थिक धोरणाची बाजू ही सामान्य माणसाला कळत नाही, त्यामुळे ही विसंगती आहे. तेलंगणा राज्य सरकार सुद्धा फटाके फोडत असेल, तर त्यात नवल काहीच नाही. प्रत्येकच राज्यात थोड्याफार चुका असू शकतात. सर्व यंत्रणा शेवटच्या क्षणापर्यत राबविणे ही फार कठीण बाब आहे. त्यासाठी पूर्ण मंत्रिमंडळ आणि योजना राबविणारे अधिकारी त्या व्यवस्थेसी प्रामाणिक असायला पाहिजे. तेव्हाच ती पूर्तता होते. कोणते राज्याचा एक मुख्यमंत्री या विशाल महाकाय व्यवस्थेत कुठे ना कुठे कमी पडतो. त्यासाठीच तर योजना राबविणारी व्यवस्था कार्यशील असणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवायचे असेल तर नुसतं तत्त्वज्ञान मांडून आतापर्यत चाळीस वर्षात सोडवल्या गेले नाहीत, तर कृतीतून दबाव तयार करावा लागला त्याचा हा परिणाम आहे. आणि कोणताही दबाव हा कायम टिकवला जात नाही. कायम दबाव टिकून राहण्यासाठी राजकारणाची जोड लागते आणि राजकारणासाठी काही अंशी तरी खर खोटं योजना राबवून राजकारणात जिंकण्याची ती तयारी करावी लागते. तीच आज ची पद्धत आहे. शंभर टक्के तत्त्वज्ञान उगाडून कधीही राजकारण होत नाही व ते पुढेही होणार नाही. तरी पण या व्यवस्थेत ८० टक्के प्रामाणिक पणा असावा ही जनतेची इच्छा असते. शेतकरी प्रश्न सोडविणे ही आता राजकीय बाब बनली आहे आणि त्यासाठी जी वाट मिळत असेल त्या वाटेने सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांनी जाणे हे गरजेचं आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, बीजेपी व आंध्रातील चंद्राबाबू नायडू सरकार यांच्याशी संघर्ष करून तेलंगणा मॉडेल चंद्रशेखरराव यांनी तयार केले. ते कदाचित काही अंशी यशस्वी असेल, काही अंशी ते कमी सुद्धा पडले असतील किंवा त्यांनी हवेत फुगारे सुद्धा सोडले असतील, तर तो प्रत्येकाच्या राजनीतीचा भाग आहे. आजच्या परिस्थितीत राजनीति करून शेतकऱ्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्यासाठी, संसदमध्ये पोहोचण्यासाठी, काही तत्त्वज्ञान मांडून व काही फुगारे सोडूनच राजनीति होईल. तत्त्वज्ञानाचा गाभा समजून मतदान करणारी मंडळी तयार होण्यासाठी अजून बराच काळ शिल्लक आहे, अन् त के. चंद्रशेखर राव यांचा भारत राष्ट्र समिती पक्ष सुद्धा जर समाजासमोर येत असेल तर त्यात नवल असे काही नाही! कारण योग्य तत्त्वज्ञान व देशातील आर्थिक धोरणे समजून घेणारी, जनता अजून तरी पूर्णपणे साक्षर नाही. त्यासाठी काही अंशी फटाके फोडूनच राजनीती करावी लागेल. मात्र त्यासाठी योग्य पर्याय म्हणून त्या पद्धतीचे आमदार, खासदार जनतेला निवडून द्यावी लागतील, तरच या देशात समृद्धी नांदेल व योग्य दिशेने वाटचाल होईल.

**- धनंजय पाटील काकडे**
**अध्यक्ष : शेतकरी, वारकरी कष्टकरी महासंघ**

# संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातंर्गत कार्यरत असलेल्या संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत चर्मकार समाजातील (चांभार, मोची, ढोर व होलार) व्यक्तींचा त्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी, त्यांचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकास होण्यासाठी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत विविध योजना राबविल्या जातात. या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन महामंडळांचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे. दरम्यान संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत विशेष घटक व बीज भांडवल योजनेतंर्गतचे अनुदान योजना व बीज भांडवल योजनेचे यापुर्वीचे जुने कर्जप्रस्ताव रद्द, बाद करण्यात येतील. कर्ज मागणी घटक व बीज स्वहस्ताक्षरात, टंकलिखीत अथवा महामंडळाच्या विहीत नमुन्यातील झेरॉक्स प्रतीत अर्ज स्विकारण्यात येतील. महामंडळ राबवित असलेल्या विविध योजनांची माहिती जिल्हा कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेली आहे.महामंडळ राबवित असलेल्या कुठल्याही शासकीय योजनेचा पती अथवा पत्नी यांनी लाभ घेतलेला असल्यास किंवा अर्जदार हा कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार असल्यास कर्जप्रस्ताव अपात्र, रद्द करण्यात येईल. अर्जदार यांनी आवश्यक कागदपत्रासह जिल्हा कार्यालयात व्यक्तीश: अर्ज दाखल करणे अनिवार्य असून कर्जप्रस्ताव मध्यस्थामार्फत स्विकारले जाणार नाही. अर्जदारांकडून सर्व परिपूर्ण कागदपत्रे असलेले कर्ज प्रस्तावच स्विकारले जातील.अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांवर अर्जदाराची स्वाक्षरी आवश्यक असून अर्जदाराने दाखल केलेली कागदपत्रे खोटी आढळून आल्यास त्यास जबाबदार धरुन त्याच्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल. मध्यस्थ हे जर कामामध्ये हस्तक्षेप करीत असतील तर त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करुन शासकीय कामात आढथळा केल्याचा गुन्हा दाखल करण्यात येईल. कर्जप्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर लाभार्थी निवड समितीच्या बैठकीमध्ये मान्यता घेवून नंतरच कर्ज प्रस्ताव मंजुरीसाठी बँकेस, महामंडळाच्या प्रधान कार्यालयास पाठविण्यात येतील. प्राप्त कर्जप्रस्ताव बँकेस पाठवितांना एका उद्दिष्टांस दोन पट या पध्दतीने कर्जप्रस्तावांची ज्येष्ठतेनुसार बँकेकडे शिफारस करण्यात येईल. जातीचा दाखला, चालू वर्षाचा उत्पन्नाचा दाखला, रेशनकार्ड झेरॉक्स किंवा रहिवासी दाखला, कोटेशन (जीएसटीसह), आवश्यकतेनुसार प्रकल्प अहवाल, मतदान ओळखपत्र, आधारकार्ड अहवाल, वाहनाकरिता लायसन्स किंवा परतावा किंवा बॅच बिल्ला, जागेचा पुरावा लाईट बिल किंवा टॅक्स पावती आणि व्यवसायाचे नाहरकत प्रमाणपत्र. ज्या लाभार्थींनी यापूर्वी एन.एस.एफ.डी.सी. कर्ज योजनेअतंर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यालयात दाखल केलेले असून ज्याची लाभार्थी निवड समिती झालेली आहे व जे परिपूर्ण कर्जप्रस्ताव जिल्हा कार्यालयामार्फत प्रधान कार्यालयास मंजुरीसाठी शिफारस करण्यात आलेली आहेत, अशा लाभार्थींची यादी महामंडळाच्या नोटीस बोर्डावर लावलेली असून संबंधित अर्जदारांनी महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात संपर्क करावा. तसेच लाभार्थ्यांनी उद्योग आधार प्रमाणपत्र, लाभार्थ्याचा विनंती अर्ज, कागदपत्रे खरी असल्याबाबत व ज्या जागी व्यवसाय चालू त्याच जागेचा प्रमाणित केलेले छायाचित्र, चालू वर्षाचा उत्पन्नाचा दाखला, रहिवाशी दाखला, अर्जदाराचे विहित नमुन्यातील शपथपत्र इत्यादी कागदपत्रे तात्काळ दाखल करावीत. दोन सक्षम जामीनदारांपैकी नोकरदार असेल तर त्याच्या कार्यालयाचे लाभार्थ्याने वसुलीचा भरणा केला नाही तर जामीनदाराच्या पगारातून कपात करुन भरणा करण्यात येईल, असे कार्यालयाचे हमीपत्र, जर लाभार्थ्याचा जामीनदार सरकारी नोकरदार असेल व तो सेवानिवृत्त झालेला असेल त्याच्या ऐवजी ज्या कर्मचाऱ्याची सेवा पाच ते सहा वर्षे बाकी आहे, असा जामीनदार घेणे आवश्यक आहे. जिल्हा व्यवस्थापक यांचा स्थळपाहणी अहवाल व शिफारस, लाभार्थ्याचा सिबील क्रेडिट स्कोअर, अर्जदाराचे वारसदाराच्या स्वाक्षरीसह नामांकन शपथपत्र, यापूर्वी कर्जाच्या अर्जाबरोबर सादर केलेल्या इतर कागदपत्रांची खातरजमा उदा. जातीचा दाखला, रेशनकार्ड, रहिवाशी दाखला, निवडणूक आयोग ओळखपत्र इ. लाभार्थ्याचा आधारकार्ड क्रमांक तसेच आधार संलग्न (Link) बँक खाते क्रमांक जी.एस.टी. क्रमांकासह व्यवसायाचे दरपत्रक सादर करावे, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

# जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या स्थलांतरित इमारतीचे उद्घाटन!

जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून स्वामी विवेकानंद रुग्णालय आणि संवेदना प्रकल्प हरंगूळ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या स्थलांतरित इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमात दिव्यांगांना साधन साहित्याचे वाटपही करण्यात आले. सकाळी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने अवयवदान जनजागृती अभियानाच्या निमित्ताने रॅली काढण्यात आली. या रॅलीचा शुभारंभ खा. सुधाकर श्रृंगारे आणि माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला.सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये झालेल्या मुख्य कार्यक्रमास पदमश्री डॉ. अशोक काका कुकडे, जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल,अधिष्ठाता डॉ. समीर जोशी, संवेदना प्रकल्पाचे सुरेश दादा पाटील, उपअधिष्ठाता डॉ. अजित नागावकर, डॉ. उमेश लाड, डॉ. गंगाधर अनमोड, डॉ. अजय ओव्हाळ, डॉ.उदय मोहिते, डॉ. शैलेंद्र चव्हाण, डॉ.महादेव बनसोडे, डॉ. नीलिमा देशपांडे, बसवराज पैके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.महाराष्ट्र शासनाने वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाअंतर्गत रुग्णसेवेसाठी व विविध रोगांच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी विविध अभियान सुरु केले आहेत. त्यामध्ये जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधुन दि.०७ एप्रिल,२०२३ पासून अवयवदान जनजागृती हे राज्यस्तरीय अभियान वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीष महाजन यांच्या संकल्पनेतून हाती घेण्यात आलेले आहे.त्याअनुषंगाने या महाविद्यालयात अवयवदान जनजागृती अभियाना करिता विविध शासकीय, निमशासकीय कार्यालयामध्ये जनजागृती करण्यासाठी ८ पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. जनजागृती रॅलीमध्ये संस्थेतील डॉ. सचिन जाधव वैद्यकीय अधिक्षक, डॉ. गंगाधर अनमोड प्राध्यापक शल्यचिकित्साशास्त्र, डॉ. शैलेंद्र चौहाण, बधिरीकरणशास्त्र विभाग, डॉ. अजय ओव्हाळ प्राध्यापक त्वचा व गुप्तरोग विभाग, डॉ. बालाजी कोंबडे प्राध्यापक क्ष-किरण विभाग, डॉ. शिवप्रसाद मुंदडा विभागप्रमुख बालरोग विभाग, डॉ. अजित नागांवकर विभागप्रमुख जनऔषधवैद्यकशास्त्र विभाग व विविध विभागाचे प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, अवयवदान जनजागृती रॅलीचे संयोजक डॉ. दिपक कोकणे, इतर अधिकारी व कर्मचारी, तसेच मोठया संख्येने पदवीपूर्व विद्यार्थी, पदव्युत्तर विद्यार्थी, परिचर्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या रॅलीचा प्रारंभ महाविद्यालयाच्या इमारतीपासून सुरु होऊन मिनी मार्केट ते गांधी चौक, गांधी चौक ते अतिविशेषोपचार रुग्णालय येथे समारोप करण्यात आला.दरम्यान यावेळी अवयव दान जनजागृतीपर कार्यक्रम करण्यात आला. त्यावेळी आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी आणि इतर मान्यवरांनी अवयवदान करण्याचा निर्धार केला असुन त्यांनी स्वत: संमतीपत्र भरुन अधिष्ठाता यांच्याकडे सुपूर्द केले व नागरिकांनी अवयवदानासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहनही यावेळी केले. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र लातुर यांच्या संयुक्त विद्यमाने आज रेटीनोपॅथी ऑफ प्रिमॅच्युरिटी या उपक्रमाचे उदघाटन, दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम साधनांचे वितरण व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, लातुर स्थलांतरीत केंद्राचे उदघाटन पदमभुषण डॉ. अशोकराव कुकडे यांच्या अध्यक्ष्यतेखाली करण्यात आले. या वेळी खा. सुधाकर शृंगारे, माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी.,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल,विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. समीर जोशी, डॉ. सुरेश पाटील कार्यवाही संवेदना प्रकल्प, डॉ. राजेश पाटील अध्यक्ष संवेदना प्रकल्प, अनिल अंधोरीकर अध्यक्ष, विवेकानंद वैद्यकीय प्रतिष्ठातन व संस्थेतील अधिकारी, व कर्मचारी मोठया संखेने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमामध्ये जिल्हा दिव्यांग केंद्रामध्ये उपलब्ध असलेल्या सोयी-सुविधांची माहिती देण्यात आली व जिल्हयातील सर्व दिव्यांग व्यक्तींनी जिल्हा दिव्यांग केंद्रामध्ये दिव्यांगाना मोफत कृत्रिम अवयवांचे व उपकरणांचे मोफत वाटप करण्यात येत असुन त्याचा लाभ घेण्यात यावा असे आवाहन सर्व मान्यवरांनी केले. या संस्थेच्या रुग्णालयामध्ये जन्मजात कर्णबधिर व कर्णबधिर झालेल्या रुग्णांची श्रवणशक्ती परत आणण्यासाठी उजउक्ळ्ए-ठ खचझङ-छ्ढ ही शस्त्रक्रिया विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामध्ये येणार असून जिल्हयातील सर्व जन्मजात कर्णबधिर व कर्णबधिर झालेल्या रुग्णांनी या शस्त्रक्रियांचा लाभ घ्यावा असे आवाहन असे डॉ. समीर जोशी अधिष्ठाता, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय लातुर यांनी यावेळी केले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# पालघरमध्ये क्रीडा शिक्षक प्रशिक्षण शिबिर संपन्न

## जिल्ह्यातील १०० शिक्षकांनी घेतले प्रशिक्षण



**पालघर/प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांनी आयोजित केलेल्या प्रशिक्षण शिबिरात खोखो कबड्डी थलेटिक्स जिमनॅस्टिक हँडबॉल बास्केटबॉल सारख्या खेळाचे प्रशिक्षण मागील ८ दिवस आयोजित केले होते. १०० पेक्षा जास्त क्रीडा शिक्षक या प्रशिक्षणात सहभागी झाले होते.या प्रशिक्षण शिबिरात निलेश गुप्ता पुरुष गटात प्रथम प्रशिक्षणार्थी तर प्रियांका पाटील महिलांमध्ये सर्वोत्कृष्ट म्हणून निवड करण्यात आली. या वेळी जिल्हा परिषदेच्या उपमुख्याधीकारी संघरत्ना खिलारे,जिल्हा क्रीडा अधिकारी सुहास व्हनमाने, अमृत बिराडे, वामन मसलखांब तसेच राष्ट्रीय पंच बाबासाहेब गुंजाळ पत्रकार प्रमोद पाटील उपस्थित होते. १ मे पासून सुरू झालेल्या या प्रशिक्षणास जिल्ह्यात उस्फुर्त प्रतिसाद मिळाला होता. सुमारे १४० शिक्षकांनी सहभाग नोंदवला होता. त्यातील १०० शिक्षक सहभागी झाले होते. खोखो खेळाचे प्रशिक्षण जगदीश दवणे यांनी दिले. कबड्डी खेळाचे प्रशिक्षण मयूर पवार व आशिष पाटील यांनी दिले. अजित कुलकर्णी यांनी मैदानी तसेच फिटनेस बाबतचे प्रशिक्षण दिले. राष्ट्रीय पंच बाबासाहेब गुंजाळ यांनी थलेटिक्स बाबतचे प्रशिक्षण दिले होते. आर्चरी खेळाच प्रशिक्षण विनय सावे व त्यांच्या टीम ने दिले. बास्केबॉल जलतरण बाबत प्रशिक्षण या ८ दिवसात दिले गेले.या ८ दिवसात रोजच्या प्रशिक्षणातून सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थी म्हणून पुरुष म्हणून विरार येथील नॅशनल स्कूल चे निलेश गुप्ता यांना पुरस्कार मिळाला. तर महिलांमध्ये प्रियांका पाटील यांना पुरस्कार मिळाला. आठ दिवसाच्या या शिबिरास पार पाडण्यासाठी आशिष पाटील, पूजा पाटील, डॉ निलेश गायकवाड, विक्रमसिंह राजपूत, सुरेश पारखे यांनी मेहनत घेतल्याने जिल्हा क्रीडा अधिकारी सुहास व्हनमाने यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. जिल्ह्यातील सर्व क्रीडा केंद्र प्रमुख यांनी सहकार्य केल्याने हे पहिले शिबिर व्यवस्थित पार पडले. हे शिबिर आयोजित करण्यात महत्वाचे योगदान असलेल्या क्रीडाप्रेमीचा या प्रसंगी सन्मान करण्यात आला. जिल्ह्यातील शाळे मधील क्रीडा शिक्षकांना योग्य मार्गदर्शन करण्यात आले आहे. या मुळे नवीन बदललेल्या नियमांमुळे खेळाडूंना प्रोत्साहन देण्यात त्यांना मदत होईल. जिल्ह्यात ग्रामीण भागात राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार होण्यास मदत होईल. असे शिबिर या पुढे कायम घेण्यात येईल असा विश्वास जिल्हा क्रीडा अधिकारी सुहास व्हनमाने यांनी व्यक्त केला. सहभागी शिक्षक दांडेकर महाविद्यालयाचे प्राध्यापक किरण थोरात यांनी सांगितले की आम्हाला अनेक वर्षानंतर पुन्हा एकदा नव्याने सर्व खेळाचे नियम आणि प्रशिक्षण मिळाले. त्याचा फायदा नक्कीच या पुढे आम्हाला होईल. असे मार्गदर्शन या पुढेही मिळत राहिल्यास त्याचा फायदा नक्कीच होईल.

# कनिष्ठ लिपिक लता बाबुराव चौदंते सेवानिवृत्त!

**लातूर/प्रतिनिधी**

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील कार्यालयीन कनिष्ठ लिपिक लता बाबुराव चौदंते ह्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या त्याबद्दल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.दिनेश मौने यांच्या हस्ते त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा.संजय पवार, उपप्राचार्य प्रा.बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा.शिवशरण हावळे, स्टाफ सेक्रेटरी डॉ.बाळासाहेब गोडबोले, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदर्गे आणि अक्षय चौदंते यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्रभारी प्राचार्य डॉ.दिनेश मौने म्हणाले की, प्रा.बाबुराव चौदंते यांनी महाविद्यालयांमध्ये अर्थशास्त्र विषयाचे अध्यापन केले. ते विद्यार्थी प्रिय प्राध्यापक होते. त्यांच्या अकाली निधनाने श्रीमती लता चौदंते यांच्यावर कौटुंबिक जबाबदारी आली आणि त्यांनी ती जबाबदारी यशस्वीरित्या पूर्ण करून आपल्या मुलांवर संस्कार केले त्यामुळे आज त्यांचे संपूर्ण कुटुंब समृद्ध असल्याचे सांगून पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे म्हणाले की, प्रा.बाबुराव चौदंते यांच्या निधनामुळे चौदंते कुटुंबावर मोठा आघात झाला परंतु त्याला लता चौदंते मॅडमच्या इतर नातेवाईकांनी मोठा आधार दिला. तसेच प्रा.बाबुराव चौदंते यांचा आदर्श मॅडमनी आयुष्यभर जोपासला त्यामुळे आज त्या कुटुंबामध्ये यशस्वी गृहिणी तर कार्यालयामध्ये यशस्वी कर्मचारी म्हणून सर्वाच्या परिचयाच्या आहे असे सांगून त्यांनी गुरु-शिष्याच्या विविध अनुभवाची माहिती यावेळी दिली. या निरोप समारंभ सत्काराला उत्तर देताना लता चौदंते म्हणाल्या की, श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेतील सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी माझ्या अडचणीच्या काळामध्ये मला सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानते. यावेळी पर्यवेक्षक प्रा.एस.आर.हावळे, प्रा.वनिता पाटील, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, रत्नेश्वर स्वामी, सुनील मोरे यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी महात्मा बसवेश्वर एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी तर्फे त्यांचा प्रा.नितीन वाणी आणि डॉ.शीतल येरुळे यांच्या हस्ते धनादेश देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी लता चौदंते यांचे नातेवाईक आई इंदुमती मोरे, उदयकुमार खरात, रजनी खरात, शीलरत्न सूर्यवंशी, सुनीता सूर्यवंशी, सुनील मोरे, संगीता सूर्यवंशी, अनिल मोरे, नीतू मोरे आणि अतिश सूर्यवंशी यांचीही उपस्थिती होती.

# भाताणे-भालिवली येथील रस्त्याच्या कामाचे आमदार राजेश पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन



**पालघर/एच.लोखंडे**

आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाने युवा आमदार क्षितिज ठाकूर यांच्या सहकार्याने व जनतेच्या हितासाठी आमदार राजेश पाटील यांच्या सौजन्याने व प्रयत्नाने मंजूर करण्यात आलेल्या अंदाजे दिड कोटी रुपये निधीच्या मधून विकास कामाचे भालीवली भाताणे या महत्त्वाच्या रस्त्याच्या जांभूळपाडा भाताणे यादरम्यानच्या टप्प्याचे भूमिपूजन आज आमदार राजेश पाटीलयांच्या उपस्थितीत मान्यवर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी बळीराम जाधव माजी खासदार पालघर, अशोक पाटील सभापती, माजी नगरसेविका रमाताई किणी माजी नगरसेवका, सुगंधा जाधव माजी उपसभापती, कल्याणी तरे माजी पंचायत समिती सदस्या, माजी जिल्हा परिषद सदस्या रंजना सायरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रणय कासार, माजी संचालक सदानंद पाटील, माजी सरपंच धरशिल पाटील, उपसरपंच हेमराज कासार, माजी सरपंच बाळाराम परेड, ग्रा. प.सदस्य योगेश कूडू, ग्रां. प सदस्या धनश्री जाधव, अस्मिता मालवी, बहुजन विकास आघाडीचे जेष्ठ कार्यकर्ते सुभाष कासार, सुदाम कुडू, संजय पाटील, जयदीप कासार, कपिल जाधव, वैभव जाधव, रुपेश, रवींद्र कासार, जगदीश पाटील, अशोक कूडू, सदानंद पाटील. बहुजन विकास आघाडीचे नवसई अध्यक्ष मयूर कुडू, सलीम शेख यांच्या समवेत स्थानिक गावकरी, कार्यकर्ते आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यातील गट विकास अधिकारी यांचे रोजगार हमी योजना विसंगत धोरणा विरोधात कामबंद आंदोलन!

**देवणी/प्रतिनीधी**

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुराला काम पाहिजे असल्यास नमुना चार ग्रामपंचायतला सादर केल्यावर ग्रामसेवक तो आपल्या स्वाक्षरीने पंचायत समिती कार्यालयास सादर करतो त्यानुसार ग्रामपंचायतला मस्टर उपलब्ध करून देण्यात येतात त्यावर दैनंदिन उपस्थिती रोजगार सेवक नोंदवून ग्रामसेवकाच्या स्वाक्षरीने अकुशल मजुरी मिळण्यासाठी पंचायत समितीला पाठविले जाते त्यानुसार मजूर अदा केली जाते. परंतु आता राज्य शासनाच्या मग्रारोहयो विभागाने निर्गमित केलेला पत्रानुसार ग्रामसेवकाची स्वाक्षरी आवश्यक नसल्याचे दिले आहे. त्यामुळे रोजगार सेवकाकडून सरळ गट विकास अधिकारी यांच्याकडे काम मागणी व मजुरी मागणी नोंदविली जाईल ज्यात ग्रामपंचायतीवर कोणतीही जबाबदारी नसल्याने मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्यास त्याची पूर्ण जबाबदारी गट विकास अधिकारी यांचे वर निश्चित होईल.

यावर तीव्र आक्षेप गटविकास अधिकारी संघटने नोंदवला असून यात सुधारणा करण्याबाबत शासनास विनंती केली आहे. ह्याविपरीत विभागामार्फत निर्गमितपत्रानुसार कामे झाल्यावर महिन्यात दोनवेळा गट विकास अधिकारी यांनी कामाची तपासणी करून ते योग्य आहे किंवा आयोग्य, मजूर उपस्थितीची शहानिशा करण्याबाबत पत्र निर्गमित केले आहे. एकदा काम होऊन निधी अदा झाल्यावर जर या तपासणीमध्ये गैरप्रकार आढळला तर स्वतः गट विकास अधिकारी यांनी स्वतः



ला जबाबदार ठरवायचे काय अशी विसंगतता दिसून येते. एरिया ऑफिसर ॲप नावाचे ॲप तपासणीसाठी उपलब्ध असताना सदर पत्राची काय गरज होती हा प्रश्न विचारला जात आहे. २५००० ग्रामसेवकना कामाचा अतिरिक्त ताण वाटतो ते काम ३५१ गटविकास अधिकाऱ्यांनी करावे असे गृहीत धरले आहे. सध्या राज्यात अनेक कामे हे ग्रामसभेने मंजूर केलेल्या आराखड्यात नसताना देखील राज्यस्तरावरून मंजुरीचे पत्र काढले जाते व त्यानंतर ते काम ग्रामसभेत मंजूर करून घ्या आराखड्यात समाविष्ट करून घ्या अशी उलटी प्रक्रिया करावी लागते. जी रोहयो कायद्याचे विसंगत असून ग्रामसभेच्या अधिकाराचे उल्लंघन असल्याचे दिसते. दरवर्षीचा आराखडा हा कायद्यानुसार डिसेंबरअखेर बनून त्यानुसार वर्षभर काम करावे असे नमूद असताना केव्हाही कोणत्याही कामाला मान्यता दिली जाते व त्यासाठी गट विकास अधिकारी यावर दबाव निर्माण होत आहे. ६०:४० प्रमाण कायद्यात नमूद असताना कुशल कामाचा प्रमाणापेक्षा जास्त मंजूर करण्यास तगादा लावला जातो. राज्य स्तरावर कुशल कामे मोठ्या प्रमाणात मंजूर झाल्यावर व्यक्तिगत कुशल कामेही मोठ्या प्रमाणात मंजूर केल्यास ६०:४० प्रमाण बिघडल्यास गट विकास अधिकारी कसे जबाबदार राहतील. रोजगार हमीचे सर्वच कामे ग्रामपंचायत यंत्रणे करणे अपेक्षित नसून तरतुदीनुसार एकूण ११ यंत्रणा आहेत व १७० प्रकारची काम ते करू शकतात असे असताना ग्रामपंचायतीकडून ८०% कामे करून घेण्याची वृत्ती वाढत आहे व गैरप्रकार आढळल्यास गुन्हा दाखल करण्याचे प्रकार होत असल्याने गट विकास अधिकारी यांच्यावरील ताण वाढत आहे. तसेच ८० टक्के काम करून देखील राज्यस्तरावरील पत्रात गटविकास अधिकारी कॅडरला असक्षम म्हटल्याने महाराष्ट्र विकास सेवा संघटनेने ११ एप्रिल पासून सुरू केलेले रोहयो काम बंद आंदोलन अधिक तीव्र केले आहे. संबंधित खात्याकडून सकारात्मक प्रतिसाद न मिळता अजून गट विकास अधिकारी यांचे नैतिक खच्चीकरण करणारे पत्र निर्गमित होत असल्याने महाराष्ट्र विकास सेवा संघटनेने आंदोलन तीव्र केल्याचे सांगितले आहे. ह्यात राज्यातील सर्व गट विकास अधिकारी, सहायक गट विकास अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक व प्रभारी गटविकास अधिकारी देखील सहभागी आहेत.

# मोटारसायकल चोरास अटक; १५ दुचाकींसह १० मोबाईल जप्त



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहरातील फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने मोटारसायकल चोरास अटक केली असून त्याच्याकडून १५ दुचाकी व १० मोबाईल असा सुमारे सहालाखांचा ऐवज जप्त केला असल्याची माहिती पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. अविनाश गोपाळ आसबे (वय २२, रा. लक्ष्मीनगर, दहिटणे, ता.उत्तर सोलापूर, जि. सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. सोलापूर शहरात दुचाकी व मोबाइल चोरीच्या घटना वाढल्याने चोरट्यांचा शोध घेत असताना एक तरुण नवीपेठ येथे गुन्ह्यातील मोटार सायकल व मोबाईल विक्री करण्याकरीता येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार शहानिशा करून त्या ठिकाणी जाऊन त्यास शिताफिने ताब्यात घेतले. त्याच्याकडे चोरीस गेलेली एक मोटार सायकल जप्त केली. तसेच त्याच्याजवळ असलेल्या छोट्या बॅगची तपासणी केली असता त्यात विविध कंपन्यांचे १० मोबाईल हँडसेट मिळाले. त्याबाबत त्याला विचारणा केली असता त्याने हे मोबाईल विविध ठिकाणावरून चोरी केल्याची कबुली दिली. चोरीच्या १० मोबाईल पैकी फौजदार चावडी हद्दीतून चोरीस गेलेला मुद्देमाल असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांची अधिक चौकशी केली असता त्याने सोलापूर व पुणे जिल्ह्यातून विविध ठिकाणांहून मोटार सायकल चोरी केल्याचे सांगून एका ठिकाणांहून १४ चोरीच्या मोटार सायकली काढून दिल्या. त्याने फौजदार चावडी, विजापूर नाका, सदरबझार, जोडभावी पेठ, हडपसर व समर्थ पोलीस ठाणे पुणे, अक्कलकोट उत्तर, मोहोळ आदी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरीस गेलेल्या मोटार सायकलीजप्त केल्या आहेत. ही सदरची कारवाई सोलापूर शहर पोलीस आयुक्त राजेंद्र माने, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सहायक पोलीस आयुक्त संतोष गायकवाड, पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील, विकास देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर धायगुडे, पोलीस अंमलदार दीपक डोके, चौगुले, धनंजय बाबर, आयाज बागलकोटे आदींनी केली.

## मिशन कर्मयोगीच्या प्रशिक्षणातून शासकीय योजना

# निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करावी -सुजाता सौनिक



**मुंबई/प्रतिनिधी**

शासन सर्वसामान्यांसाठी विविध निर्णय, योजना राबवित असते. मंत्रालयीन अधिकाऱ्यांनी कर्मयोगी भारतच्या मिशन कर्मयोगी प्रशिक्षणातून या शासकीय योजना, निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी केले. एल्फिंस्टन तांत्रिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने मंत्रालयीन सहसचिव, उपसचिव यांच्यासाठी आयोजित प्रशिक्षणाच्या पहिल्या सत्रात श्रीमती सौनिक बोलत होत्या. यावेळी कर्मयोगी भारतचे समन्वय अधिकारी विजय अहेर, प्रकल्प व्यवस्थापक राकेश वर्मा, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक दिगंबर दळवी, कर्मयोगीच्या प्रियंका अग्रवाल आदींसह मंत्रालयातील सहसचिव, उपसचिव उपस्थित होते. एल्फिंस्टन विद्यालयाचा इतिहास सांगून श्रीमती सौनिक म्हणाल्या की, शासकीय योजना, निर्णय, कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी अधिकाऱ्याला त्या योजनेची संपूर्ण माहिती हवी. आपले काम प्रामाणिकपणे गुणवत्तापूर्ण केल्यास वैयक्तिक जीवनातही लाभ होतो. काही अधिकाऱ्यांकडे माहिती भरपूर असते, मात्र ती कागदावर योग्य पद्धतीने उतरत नाही, यासाठी हे प्रशिक्षण उपयोगी आहे. प्रत्येक काम कळकळ, मेहनत, समजुतीने पार पाडा, असे आवाहनही त्यांनी केले. प्रारंभी समन्वय अधिकारी अहेर यांनी मिशन कर्मयोगीबाबत माहिती दिली. अधिकाऱ्यांनी कौशल्य, क्षमता, इच्छा या गोष्टी आत्मसात करायला हव्यात, असे त्यांनी सांगितले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने सादरीकरण करण्यात आले. उपसचिव मंजुषा कारंडे यांनी कौशल्य विकास विभागाबाबत तर श्री. दळवी यांनी व्यवसाय प्रशिक्षण व प्रशिक्षणाबाबतची माहिती दिली. यावेळी आयजीओटी (iGOT-Integrated Government online Training) या कर्मयोगीच्या प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन प्रशिक्षणाची तयारी करण्यात आली. सर्व अधिकाऱ्यांचे डिजीटल आयडी तयार करण्यात आले. त्या आयडीद्वारे लॉगीन करून अधिकाऱ्यांना शासकीय विविध प्रशिक्षणाची द्वारे खुली झाली. याद्वारे अधिकाऱ्यांना संवाद, अर्थविषयक, ताण-तणाव, योजनांची अंमलबजावणी, निर्णय तयार करतानाच्या येणाऱ्या अडचणीबाबतचे ऑनलाईन प्रशिक्षण घेता येणार आहे. प्रशिक्षणानंतर अधिकाऱ्यांच्या शंकांचे निरसन श्रीमती अग्रवाल यांनी केले.

# परभणी जिल्ह्यातील सोनपेठ घटनेतील मृत सफाई कामगारांच्या वारसांना प्रत्येकी १० लाख

**मुंबई/प्रतिनिधी**

परभणी जिल्ह्यातील सोनपेठ शहरानजीक भाऊचा तांडा येथे गुरूवार (दि.११) सेप्टिक टँकमधील मैला स्वच्छ करतांना पाच जणांचा मृत्यू झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या घटनेवर दु:ख व्यक्त केले असून मृतांच्या वारसांना राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या यासंदर्भातील योजनेतून प्रत्येकी १० लाख रुपये देण्याचे निर्देश दिले आहेत. या दुर्घटनेतील जखमी झालेल्या कामगारांवर आवश्यक ते सर्व वैद्यकीय उपचार शासनाच्या खर्चातून करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. गुरुवारी रात्री ९.०० वाजताच्या सुमारास भाऊचा तांडा येथील शेत वस्तीवरील एका घरातील सेप्टिक टँक मधील मैला सफाई करताना पाच जणांचा गुदमरून मृत्यू झाला होता. एका कामगारास गंभीर अवस्थेमध्ये अंबजोगाई येथील शासकीय रुग्णालयाय येथे दाखल करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांनी या घटनेची माहिती होताच त्वरित आवश्यक ती मदत देण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या.




# सारथी कार्यालय खारघर नवीमुंबईत सुरु

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी मराठा या लक्षित गटातील समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाकरिता छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेचे मुख्यालय पुणे येथे असून संस्थेचे मुंबई विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत ठाणे, रायगड, पालघर, मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्हयांचे कार्यक्षेत्र आहे. मुंबई विभागीय कार्यालय एमटीएनएल इमारत, रेनट्री मार्ग, सेक्टर-२१, खारघर ता.पनवेल जि.रायगड येथे सुरु करण्यात आले आहे. तरी कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी मराठा या लक्षित गटातील समाजबांधवांनी मुंबई विभागीय कार्यालयात भेट द्यावी व सारथी संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती व लाभ घ्यावा असे आवाहन सारथी संस्थेचे उपव्यवस्थापकीय संचालक तथा उपजिल्हाधिकारी संदीप पवार यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

15 TO 21 MAY 2023 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 5/13/2023 9:21 PM Page 1



पान १ वरून....

## पंतप्रधान मोदींचे हिंदुत्व उतरले नाही ...

तहान मांडून बसले होते. कर्नाटकातील सर्व उद्योजक आणि खान माफियांनी भाजपच्या प्रचारात प्रचंड पैसा टाकला होता. पण जनतेच्या नाराजी समोर त्यांच्या या काळ्या पैशाचा टिकाव लागला नाही. कारण राहुल गांधींची 'भारत जोडो यात्रा' आणि कर्नाटकात प्रदेशाध्यक्ष डी. शिवकुमार यांच्या नेतृत्व खाली सर्व कॉंग्रेस नेत्यांनी एकत्र येवून केलेला प्रचार त्याला राहुल गांधी, प्रियांका गांधी, सोनिया गांधी आणि पक्षाध्यक्ष खरगे यांच्या झंझावती प्रचारसभा आणि रोड शोची मिळालेली साथ यामुळे कॉंग्रेस भाजपशी निकराने लढली आणि जिंकली. सत्ताधारी भाजपला न मोदी वाचवू शकले न बजरंग बली वाचवू शकला. कर्नाटकात कॉंग्रेसने १३७, भाजपने ६४, जेडीएसने २० तर इतरांना ४ जागा मिळाल्या सीमा भागात मराठी जनतेने बोम्माई यांच्या पार्श्वभागावर लाथ मारून कान्नादिगांकडून झालेल्या अत्याचाराचा बदला घेतला. मात्र भाजपातून कॉंग्रेसमध्ये आलेले माजी मुख्यमंत्री जगदीश शेत्तर यांचा हुबळी मधून पराभव झाला. मात्र कनकपुरा मधून डिके शिवकुमार विजयी झाले. शिवगोमा मधून आपली जागा वाचवण्यात बोम्माईना यश आले असले तरी त्यांच्या मंत्रिमंडळातील अनेकांना पराभवाचा धक्का वरुणा मधून कॉंग्रेसचे मुख्यमंत्रीपदाचे दावेदार सिद्धरामय्या विजयी झाले. चिक्कोडी मधून कॉंग्रेसचे गणेश हुक्केरी अथणी मधून कॉंग्रेसचे लक्ष्मण सवडी विजयी झाले. कागवाड मधून कॉंग्रेसचे भार्मुगौदा कागेनी बाजी मारली. तर निपाणीतून भाजपच्या शशिकला जोल्ले विजयी झाल्या. दक्षिण बेळगावमधून भाजपचे अभय पाटील निवडून आले. तर सौडती मधून विश्वास वैद्य आघाडीवर होते. या निवडणुकीत म्हैसूर मधून कॉंग्रेसला सर्वाधिक जागा मिळाल्या तर कर्नाटकच्या तटवरती जिल्ह्यांनी भाजपची लाज राखली. या निवडणुकीत झालेला पराभव बोम्माई आणि येडीयुरप्पा यांनी स्वीकारला असून जनतेचा कौल आम्हाला मान्य असल्याचे सांगितले.

## राजन दास खरोखरच चुकला...

महिलेकडे नको ती मागणी करणे एका व्यक्तीला चांगलेच महागात पडले आहे. महिलेच्या पतीने अन्य दोघांच्या मदतीने व्यक्तीची हत्या केल्याची घटना मुंबईतील वरळी परिसरात घडली आहे. राजन दास उर्फ बंगाली असे मयत व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी वरळी पोलिसांनी तीन जणांविरोधात कलम ३०२ नुसार हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. सचिन कवंदर, सदा कवंदर आणि भावेश साळवे अशी तिघा आरोपींची नावे आहेत. मयताचे आरोपीच्या पत्नीकडे शारीरिक सुखाची मागणी केली होती. यामुळे महिलेच्या पतीचे त्याचा कायमचा काटा काढला. पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत. राजन दास हा आरोपीच्या पत्नीकडे शारीरिक सुखाची मागणी करत होता. त्या बदल्यात त्याने महिलेला ५०० रुपये देऊ केले. महिलेने ही बाब आपल्या पतीला सांगितली. हे ऐकताच पतीला संताप अनावर झाला. त्याने आपला भाऊ आणि भाचा यांना सोबत घेऊन राजनच्या घरी गेले आणि त्याला बेदम मारहाण केली. यात राजनचा मृत्यू झाला. हत्या केल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेल्याची माहिती पोलिसांनी दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत जखमी राजनला रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. तिन्ही आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या (आयपीसी) कलम ३०२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## ब्लॅकमेलर प्रेयसीचा खूप त्रास...

त्याच्या घरी सारखे येणे जाणे होते. नात्याने तो छायचा चुलत दीर लागत असल्याने ती त्याच्याबरोबर मनमोकळेपणाने बोलत असायची. ती ही दिसायला देखणी आणि सुंदर असल्याने नानाच्या मनात ती बसली होती भाऊ घरात नसला की तो वहिनी, वहिनी करीत तिच्याशी लाडीगोडी लावीत बोलत बसला होता.तो तिच्याशी जास्तच जवळीकता साधत असल्याचे तिच्या लक्षात आल्यावर ती ही त्याला लाईन देत भाऊजी म्हणून त्याच्या शेजारी बोलत बसायची. यातून जे व्हायचे तेच पुढे झाले. एकदा घरी कुणी नसताना ते दोघे बोलत बसले असताना नानाने तिची मांडी दाबली.तशी ती ही शाहरली. त्याच्या मनात काय आहे हे तिने ओळखले. तेव्हापासून तिने त्याच्यावर डाव टाकायला सुरूवात केली. नाना घरात आला की ती त्याला भावोजी म्हणत लाडी गोडी लावत होती. तिची भरगच्च जवानी त्याच्या मनात बसल्याने कधी एकदा हिला आपल्या अंगखाली घेऊन कुस्करतो असे त्याला झाले होते.तो संधीची वाट पाहत होता.तशी संधी ही त्याला चालून आली. दोन वर्षापूर्वी तिचा नवरा हा मेंढपाळ घेऊन दुसरीकडे गेला होता.घरात कुणी नसताना तो तिच्या जवळ गेला.तिला आपल्या मिठीत घेऊन तिला बेडवर आडवे केले. तिला ही तेच पाहिजे असल्याने तिने कसलाच विरोध त्याला केला नाही.आलेली संधी न दवडता नानाने तिला पाहिजे ते सुख दिले.ती ही त्याच्या त्या सुखाने बहरून गेली. तिच्या नवऱ्याकडून तिला जे आजपर्यंत मिळाले नाही ते सुख नानाने दिल्याने ती त्याच्या मिठीत सुखावली. त्यावेळेपासून त्या दोघांचे संबंध वाढीस लागले. घरी कुणी नसताना नाना घरात येऊन तिला आपल्या अंगाखाली घेऊन ते सुख देवू लागला. त्या दोघांच्या संबंधाची चर्चा विठ्ठलनगरात होऊ लागली, परिणामी ही चर्चा तिचा नवरा मधुकर याच्या कानावर आली. त्याने तिला या गोष्टीचा जाब विचारला असता उलट ती त्याच्या बरोबर भांडण काढत होती.त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवीत त्यालाच नावे ठेवीत होती. त्या दोघांचे भांडण वाढतच जात होते. ती काही ही त्याला बोलत होती.तो त्या दोघांच्या त्या संबंधाला विरोध करीत होता. पण त्या दोघांचे ते संबंध इतके पुढे गेले होते की, ती त्याला व तो तिला सोडू इच्छित नव्हते. मधुकरने नानाला आपल्या घरी येण्यास ही मज्जाव केला होता. आग दोन्ही कडे लागल्याने त्या दोघांना भेटण्याची आणि ते सुख ओरबाडण्याची सवय लागल्याने ते दोघे ही आता बाहेर लॉजवर भेटत होते. छायाला तर त्याच्याकडून ते सुख ओरबाडून घेण्याची चटकच लागली होती. अलिकडे तर नवऱ्याची आणि तिची भांडणे सारखी होत असल्याने ती ही वैतागलेली होती.नवरा तिला सोडून देण्याची भाषा करीत होता.तिच्या अशा बाहेरख्याली वागण्याने नात्यातील लोकात ही तिची अब्रु गेली होती. पण तिला कशाचीच फिकीर नव्हती. तिला फक्त नाना पाहिजे होते. त्याच्याकडून तिला शरीरसुख पाहिजे होते. म्हणून ती त्याच्या मागे लागली होती. तो बोलविल त्या ठिकाणी त्या हॉटेलवर जात होती. पण अलिकडे मात्र तिने त्याच्या मागे लग्नाचा तगादा लावला होता.लग्न करून घे. नाही तर मला दोन लाख रूपये दे अशी मागणी ती त्याच्याकडे करीत होती.तो ही विवाहित असल्याने त्याला ही बायको मुले होती. त्याचा ही संसार होता पण ही नको ती ब्याद आता गळ्यात पडू पाहत असल्याने तो ही तिच्या सततच्या मागणीने वैतागलेला होता. ती नवऱ्याची झाली नाही मग आपली कशी होणार असा विचार नाना करीत होता.ती त्याला सारखे फोन करून भेटायला बोलवित होती. त्याच्याकडे पैशाची मागणी करीत होता.पण त्याला ती फक्त त्या कामासाठी पाहिजे असल्याने तो काही तिला पैसे दयायला आणि लग्न करून घ्यायला ही तयार नव्हता.त्या दोघांत ही भांडण सुरू झाले होते. तिने तर त्याला धमकी दिली की, तु मला पैसे दिले नाहीस किंवा माझ्याशी लग्न करून घेतले नाहीस तर मी तुझ्या घरात येऊन बसेन. तिच्या या धमकीला तो घाबरला. कारण तिने आता नवऱ्याला सोडून त्याच्या संसारात विष कालविण्याचे ठरविले असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्याची तर इकडे आड तिकडे विहिर अशी अवस्था झाली. यातून मार्ग काढण्यासाठी म्हणून तो तिला फक्त मी तुझ्याशी लग्न करेन पण मला अजून अवधी दे असे सांगत होता.त्याच्या भूलथांपाना तू जरी भुलत असली तरी ती त्याला ज्या ज्यावेळी बाहेर लॉजवर जाऊन शरीर सुख देत होती त्या त्या वेळी ती त्याच्याकडून पैसे उकळीत होती. त्यामुळे तो ही तिच्यावर चिडत होता. त्याचे ही आता तिच्यापासून मन भरले असल्याने तिने फोन केला तर तो फोन ही उचलत नव्हता. तिला भेटायला ही जात नव्हता. आता तो भेटत नसल्याने नानाला चांगलीच अद्दल घडवायची हे तिने मनातून ठरविले होते. कारण ती त्याच्यासाठी आपला संसार मोडणार होती. नवरा मुले सोडणार होती. म्हणून ती त्याच्यामागे लग्नाचा तगादा लावीत होती. तो तिला भेटायचे टाळत असल्याने तिने त्याला गुरूवार दि.४ मे २०२३ रोजी फोन करून सांगितले की तु जर मला भेटायला आला नाहीस तर मी आता तुझ्या घरात येऊन बसेन. तिच्या या धमकीने तो जाम वैतागला. यातून काही तरी मार्ग काढायचा म्हणून तो गुरूवारी दुपारी भेटायला आला. तिला त्याच्याकडून ते सुख पाहिजे असल्याने तिने त्याला चल आपण लॉजवर जावून बोलू असे म्हटले. तो नाही होय करीत तिच्याबरोबर गेला. आटपाटी बाजार समितीपासून जवळच इंडेन गॅसच्या रस्त्यावर स्टार लॉज आहे. त्या ठिकाणी ते दोघे ही या अगोदर दोन तीन वेळा आले असल्याने यावेळी ही ते दोघे तेथे राहण्यासाठी आले.गुरूवारी संध्याकाळी त्यांनी त्या लॉजची रूम बुक केली. त्यावेळी लॉज मॅनेजरने नानाचे आधार कार्डवरून त्याचे व तिचे नाव आपल्या रजिस्ट्रला नोंदवून रूम दिली. रुमध्ये आल्यावर छाया मस्तीत होती, तिने त्याच्या गळयाभोवती हात टाकून त्याला मिठी मारली.ते दोघे ही दोन दिवस राहणार असल्याने मस्त मजा करणार होते.पण नानाच्या मनात काही तरी वेगळेच होते. रात्री जेवण करून झाल्यावर बेडवर ती त्याच्या मिठीत शिरली.त्याने ही दाबादाबीला सुरूवात केल्यावर ती ही कामातूर झाली. त्या दोघांनी रुममध्ये मस्तपैकी त्या गोष्टीचा आनंद घेतला. त्या रात्री त्याने तिच्यावर चढाई करीत तिला पाहिजे तसे सुख दिले. पहाटे पहाटे परत तिने त्याच्याकडे त्या सुखाची मागणी करीत त्याच्याशी छेडछाड करायला सुरूवात केली.त्याची तिच्याबरोबर आता झोपण्याची इच्छा नव्हती. तो तिला टाळत होता. अशातच तिने त्याच्याकडे परत लग्नाचा विषय काढला. लग्न जर करणार नसशील तर मला दोन लाख रूपये दे. अशी ती मागणी करीत होती. तिची ती आवास्थव मागणी ऐकून तो तिच्यावर चिडला. ते दोघे ही नग्नच होते. ते सुख त्याने तिच्याकडून घेतल्याने त्याचे ही मन भरले होते. तो तिला टाळत होता. ती त्याच्या मागे लग्नाचा ससेमिरा लावत होता. त्यामुळे तो तिच्यावर जाम चिडला.त्या दोघांचे भांडण सुरू झाले. तुला माझ्याकडून शरीर सुख पाहिजे पण लग्न करायला नको असे म्हणत ती त्याचेबरोबर वाद घालत होती.तो ही तिला रागाच्या भरात म्हणाला तु तुझ्या नवऱ्याची झाली नाहीस आणि माझी कशी होणार? यावर ती ही चिडली. रुममध्ये ती त्याच्याशी वाद घालत असताना त्याने आपले कपडे घालून मी जातो आता तु थांब इथेच असे म्हणत निघून जावू लागला. तिने ही कसेबसे आपली साडी नेसली.ती त्याला जावू देत नव्हती. त्या दोघांचे भांडण सुरू असताना तिने त्याच्या शर्टाला हात घालत घाणेरडी शिवी दिली.त्याने तिचा हात झटकून तिला बाजूला ढकलून दिले. ती जोरात जावून बेडच्या खाली पडली.तिच्या डोक्याच्या मागील बाजूस बेडचा कोना लागल्याने तिच्या डोक्याच्या मागील बाजूस मोठी जखम झाली. मोठे भोके पडल्याने त्यातून रक्तस्त्राव सुरू झाला अशा ही परिस्थीत ती त्याला अडवत होती. त्याने तिचा गळा जोरात आपल्या दोन्ही हातानी आवळून धरत रांडे मला आडवतीस काय? म्हणत आणखीन जोर लावला. त्याने तिचा आपल्या दोन्ही हातांनी जोरात गळा आवळून धरल्याने तिला काहीच हालचाल करता आली नाही. काही क्षणातच ती जागेवर निपचिप पडली.तिचा आपल्या हातून खून झाला आहे हे लक्षात आल्यावर नाना भानावर आला.आता काय करायचे म्हणत त्याने तिचा मृतदेह बेडच्या खाली ढकलून ठेवला. पहाटेच्या सुमारास त्याने रुमबाहेर येवून बाहेर कुणी नसल्याचा अंदाज घेतला आणि तेथून आपली दुचाकी गाडी घेऊन निघून गेला.जाताना त्याने रूमला बाहेरून कडी लावली होती. त्यामुळे कोणाला काही शंका येण्याची शक्यता ही नव्हती. शुक्रवारचा दिवसही असाच निघून गेला. त्यादिवशी दिवसभर हॉटेलच्या वेटरनी ही त्या रुमकडे लक्ष दिले नव्हते.कारण रुममध्ये जोडपे असल्यास लक्ष देण्याची गरज नव्हती. कारण त्याचा तो खाजगी विषय होता.शनिवार दि.६ मे रोजी सकाळी वेटर झाड लोट करीत असताना त्याला रूमच्या आतून दुर्गंधी येवू लागली. दरवाज्याला बाहेरून कडी असल्याने आत कुणी नसले याचा विचार करून झाड लोट करण्यासाठी रूमचा दरवाजा उघडला. बेडखालून दुर्गंधी येत असल्याने त्याने खाली डोकावून पाहिले असता त्याला बेडच्या खाली एका महिलेचा मृतदेह दिसला. तो मृतदेह फुगला होता.त्याने या घटनेची माहिती लॉजच्या मॅनेजरला दिली. मॅनेजरने ही आत येवून पाहिले. त्याने याघटनेची माहिती लगेच आटपाडी पोलीसांना दिली. स्टार लॉजच्या रुममध्ये एका विवाहित महिलेचा मृतदेह असल्याची माहिती मिळाल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाल. पोलीसांनी बेडखालून त्या महिलेचा मृतदेह बाहेर काढला.त्या महिलेच्या डोक्याच्या मागील बाजूस मोठी जखम झाल्याचे दिसत होते. तर गळयावर गळा आवळल्याच्या व्रण ही होते पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मयत महिलेची ओळख छाया देवडकर रा.आटपाडी विठ्ठलनगर अशी पटवली. पोलीसांनी छायाचा नवरा मधुकर देवडकर याला घटनास्थळी बोलावून घेतले. त्याने ही तिची ओळख पत्नी छाय देवडकर अशी पटवली. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनसाठी आटपाडी येथील सरकारी दवाखान्यात पाठवून दिला. छाया ही त्या लॉजवर कोणाबरोबर आली होती याचा तपास करीत असताना ती नाना देवडकर याच्याबरोबर त्या हॉटेलमध्ये आली असल्याचे त्या लॉजच्या रजिस्ट्रवरून दिसून आले. तसेच तिचे नानाशी अनैतिक सबंध असल्याची ही माहिती छायाच्या नवऱ्याने पोलीसांना दिली.त्यामुळे पोलीसांनी पळून गेलेल्या नानाचा शोध घ्यायला सुरूवात केल्यावर तो दोन तीन तासानंतर लगेच पोलीसांना सापडला. पोलीसांनी त्याला निबंवडे येथील पिंजार वस्तीवरील त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले. त्याच्याकडे या घटनेची चौकशी पोलीसांनी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का?आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली.या घटनेची लेखी फिर्याद मधुकर महादेव देवडकर याने आटपाडी पोलीसात दिल्याने पोलीसांनी छाया मधुकर देवडकर (वय २७) हिच्या खून प्रकरणी तिचा प्रियकर नानासो हणमंत देवडकर (वय ३३) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर हजर केले असता मा.कोर्टाने त्याला सात दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेचा पुढील तपास आटपाडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक एस व्ही वर्धन हे करीत आहेत. विवाहित महिला ही परपुरूषाच्या नादाला लागली तर ती त्याच्या प्रेमात भरकटत जाते आणि त्याच्या ही संसारात विष कालवते हेच या घटनेवरून दिसून येते.

## वालीव पोलिसांना ५ वर्षांनी ...

सदर वादाचा राग रघूच्या मनात होता आणि याच रागातून १४ सप्टेंबर २०१८ च्या रात्री रघु मंडल याने अनिलची गळा चिरून हत्या केली आणि फरार झाला. तेंव्हा पासून तामिळनाडू पोलीस त्याचा शोध घेत होते. पोलीस त्याच्या शोधासाठी बिहारलाही जावून आले. पण रघु काही सापडत नव्हता. दरम्यान ५ वर्षांनी तामिळनाडू पोलिसांना माहिती मिळाली कि रघु वसईमध्ये आहे. सदर माहिती मिळताच ११ मे २०२३ रोजी तामिळनाडू पोलीस वसईच्या वालीव पोलीस ठाण्यात येवून थडकले आणि त्यांना या घटनेची माहिती दिली. त्यानंतर वालीव पोलिसांच्या गुन्हा प्रकटीकरण शाखेच्या अधिकाऱ्यांनी आपल्या खबऱ्यांचे नेटवर्क सक्रीय केले आणि माहिती गोळा करायला सुरुवात केली. तेंव्हा रघु मंडल वसई पूर्व येथील एका बफिंग कारखान्यात काम करीत असल्याचे समजले. त्यानंतर वालीव पोलिसांनी रघुला अटक केली. सदरची कामगिरी श्रीमती पोर्णिमा चौघुले उपयुक्त परिमंडळ २, नालासोपारा विभागाचे सहाय्यक आयुक्त चंद्रकांत जाधव आणि वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे यांच्या मार्गदर्शना खाली पो.नि. राहुलकुमार पाटील गुन्हा प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतीश गांगुर्डे व पो.अमलदार अभिजित गढरी यांच्या पथकाने ओपार पडली.

## लघुशंकेचा झालेला वाद विकोपाला ...

शहर स्वच्छतेबद्दल स्वतःहून स्वतःवर बंधन घालून घेतले आहे. इंदोर महानगरपालिकेच्या माध्यमातून संपूर्ण महानगरात स्वच्छतेचे अभियान राबवले जाते. दिवसभर साचलेला, संकलित केलेला कचरा महानगरपालिकेची यंत्रणा संकलित करते व त्याची शास्त्रशुद्ध पद्धतीने विल्हेवाट लावते. आपल्या घराभोवती, आपल्या दुकानाभोवती, कारखान्याभोवती कुठेही कचरा पडू न देण्याचे बंधन संबंधितांवर आहे. बंधन न पाळणाऱ्यांवर नियमांतर्गत कारवाई होत असते. त्यात भेदभाव केला जात नाही, त्यामुळे इंदोर शहरातील कोणत्याही भागात, कोणत्याही रस्त्यावर आपण फेरफटका मारला तर आपल्याला कुठेही केरकचरा दिसत नाही. जर इंदोरसारख्या महानगरीतील नागरिक स्वतःहून स्वच्छतेला प्राधान्य देवून शहर स्वच्छतेसाठी प्रतिसाद देतात आणि संपूर्ण भारतातील स्वच्छ शहर म्हणून प्रथम क्रमांक मिळवतात, तर देशातील इतर शहरांनी व त्या शहरातील नागरिकांनी त्यांचे अनुकरण का करू नये? सध्या धुळे जिल्ह्यातील प्रत्येक गावात आणि शहरात स्वच्छता अभियान राबवले जाते. त्यात कचरा इतस्ततः न टाकता नगरपालिकेच्या किंवा महानगरपालिकेच्या कचरा संकलन यंत्रणेच्या स्वाधीन करा. उघड्या जागेवर लघुशंका व प्रातः विधी करू नका असे आवाहन केले जाते. त्याला सुवर्णनगरी म्हणून नावलौकिक मिळविलेले शिरपूर शहरही अपवाद नाही. या शिरपूर शहरातच 'मला उघड्यावर लघुशंका करण्यास रोखणारा तू कोण? असा प्रश्न विचारत जीव घेण्याचा अश्लाघ्य प्रकार घडला आणि संपूर्ण शिरपूरनगरीत संतापाची लाट उसळली. ईदगाह नगरात वास्तव्याला असलेला मनोज भगवान मराठे हा शिरपुरातील सार्वजनिक शौचालय परिसरातील मोकळ्या जागेत साधारणतः रात्री आठ वाजण्याच्या दरम्यान उभ्या उभ्या लघुशंका करत होता. 'सार्वजनिक शौचालयात लघुशंकेसाठी सोय असतांना तू मोकळ्या जागेत उघड्यावर लघुशंका करणे योग्य आहे का? असे म्हणत शिरपूरच्या मराठे गल्लीत राहणा-या रामभाऊ भगवान माळी याने हटकले. रामभाऊ माळी याच्या हटकण्याचा मनोज मराठे याला इतका राग आला की त्याने लघुशंका आटोपताच रामभाऊची गच्ची धरत अस्सल गावरानी शिवी हासडली. 'लघुशंका करायला मला अडवणारा तू कोण? तुझ्या बापाची जागा आहे का?' असे म्हणत रामभाऊ माळीला धक्काबुक्की केली. रामभाऊच्या अंगातही तरूण रक्त होते. मनोज मराठेच्या उपमर्दामुळे रामभाऊलाही संताप आला. 'माझ्या' बापाची जागा नाही, पण तुझ्याही बापाची जागा नाही. सार्वजनिक जागेत तेही उघडयावर परिसरात आया बहीणी वावरत असतांना आणि सार्वजनिक शौचालयात सोय असतांना उघड्यावर लघुशंका करतांना लाज वाटत नाही का? रामभाऊ माळी याच्या शाब्दिक हल्ल्याने मनोज अधिकच चिडला. रामभाऊ बेसावध असतांना मनोजने रामभाऊला टांग मारून जमिनीवर पाडला. समभाऊ ज्या रस्त्यावर खाली पडला, तो रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा होता. रामभाऊ खाली पडताच मनोजने त्याच्या डोक्यावरचे केस धरून त्याचे डोके सिमेंट कॉंक्रिटच्या रस्त्यावर ताकदीने आदळले, आपटले. सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्यावर डोके आपटल्याने रामभाऊच्या डोक्याला गंभीर जखम होवून त्यातून भळाभळा रक्त वाहू लागले. अचानकरित्या प्राणघातक हल्ला झाल्याने रामभाऊ वेदनेने कळवळला व जनावरासारखा ओरडू लागला. रामभाऊच्या ओरडण्याने परिसरातील लोक त्याच्या दिशेने मदतीसाठी धावून आले. ते पहाताच हल्लेखोर मनोजने घटनास्थळावरून धूम ठोकली. रामभाऊवर प्राणघातक हल्ला झाल्याचे कळताच रामभाऊचे नातेवाईक व मित्र घटनास्थळी धावून आले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या रामभाऊला त्याचा चुलत भाऊ नरेंद्र माळी व मित्र ज्ञानेश्वर बळीराम रोकडे यांनी उपचारार्थ शिरपूर येथील उपजिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. उपजिल्हा शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्राथमिक तपासणी करता रामभाऊला मृत घोषीत केले. रामभाऊ याच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यामुळे त्याची प्राणज्योत मालवल्याची वार्ता शिरपूर शहरात वाऱ्यासारखी पसरली, त्यामुळे रामभाऊच्या नातेवाईकांनी उपजिल्हा शासकीय रुग्णालयात धाव घेतली. संशयित आरोपी मनोज मराठे याला अटक करून त्याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल होत नाही तोपर्यत रामभाऊ माळी याचा मृतदेह ताब्यात घेणार नाही असा पवित्रा त्याच्या नातेवाईकांनी व हितचिंतकांनी घेतल्याने शिरपुरातील परिसरात तणाव निर्माण झाला होता. शिरपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आगरकर यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने घटनेचे गांभीर्य लक्षात घेता परिस्थिती संयमाने हाताळली. संशयित आरोपीला गजाआड करण्याचे आश्वासन आगरकरांनी रामभाऊ माळी यांच्या नातेवाईकांना व हितचिंतकांना दिले. दरम्यान रामभाऊ माळी याचा चुलत भाऊ ज्ञानेश्वर माळी याने मनोज मराठे याच्याविरोधात खुनाची फिर्याद शिरपूर शहर पोलीस स्टेशनला दाखल केली. त्या फिर्यादीच्या आधारे शिरपूर शहर पोलिसांनी मनोज मराठे यांच्या विरोधात भा.दं.वि. कलम ३०२, ३४ अन्वये खुनाचा गुन्हा दाखल केला. आपल्या नातेवाईकांकडे दडून बसलेल्या मनोज मराठेचा शोध घेवून त्याच्या हातात बेड्या ठोकण्यात आल्या. रामभाऊ माळी या तरुणाचा खून झाल्याने शिरपूर शहरात निर्माण झालेली तणावपूर्ण स्थिती संयमाने हाताळून शिरपूर शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवल्याबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड व अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांनी शिरपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आगरकर व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन केले.

पान ८ वरून....

## आरोग्यमंत्री सावंत यांना दणका...

जिल्हा आरोग्य विभागाची वाताहात झाली आहे. वैयक्तिक कारणावरून आतापर्यंत डॉक्टर जाधव यांना टारगेट करण्यात आले परंतु कोरोना महामारी काळात त्यांनी केलेली कामगिरी जिल्ह्यातील राजकारणी विसरले आहेत सोलापुरात कोरोना वाढल्यानंतर तत्कालीन आयुक्त पी शिवशंकर यांनी त्यांना महापालिकेची जबाबदारी दिली त्यानंतर ग्रामीण भागात कोरोना पसरला त्यामुळे पुन्हा त्यांना जिल्हा आरोग्य विभागाचे जबाबदारी देण्यात आली ोरोना महामाऱ्यावर नियंत्रण आणताना त्यांना त्यांच्या आई-वडील गमावावे लागले. परंतु त्यांची ही सर्व बाजू विसरून राजकारण्यानी त्यांना टार्गेट केले. याचाच फटका आरोग्य विभागाला बसला आहे. जाधव यांचे निलंबन मागे घेतल्यामुळे डॉक्टर मंडळींनी समाधान व्यक्त केले आहे.

### आता तरी डोळे उघडा...

कर्नाटक विधानसभा निवडणुकीचा निकाल शनिवारी जाहीर झाला आहे. यात सत्ताधाऱ्यांना मोठा दणका बसला आहे. महाराष्ट्र सरकारने आता याचा बोध घ्यावा असा सूर सरकारी कर्मचाऱ्यातून निघत आहे. अनेक अधिकारी बदली झाल्यानंतर पोस्टिंग न मिळाल्याने लटकले आहेत. त्रुटी पात्र प्राथमिक व माध्यमिक शाळांना टप्पा अनुदान जाहीर केले आहे. मात्र हे अनुदान देताना या शिक्षकांची ससेहोलपट व आर्थिक लूट केली जात आहे. याकडे सरकारचे लक्ष नसल्याबद्दल संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे आता तरी या सरकारला या गोष्टीत लक्ष घालणं गरजेचे झाले आहे.

## तर मराठवाड्याचे मागासलेपण कायमचा ...

लिंगायत समाजाचे पुनर्वैभव मिळवण्यासाठी पुन्हा एकदा एकदा समाजातील सर्वच घटकांनी आपापसातील मतभेद, हेवेदावे विसरून एकत्रित येणे काळाची गरज आहे. क्षेत्र कोणतेही असो, सर्वांगीण प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रित येणे गरजेचे आहे. राज्यात एवढ्या मोठ्या संख्येने असणाऱ्या लिंगायत समाजाची आज राजकीय क्षेत्रात लक्षणीय अशी उदासीनता आहे.

आपल्या समाजातही समाजाला दिशा देऊ शकणारे चांगले नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने आहेत. मात्र त्यांना दुर्दैवाने आपले नेतृत्व गुण, नेतृत्व क्षमता दाखवून देण्याची संधी मिळू दिली जात नाही. यामागच्या कारणांचा शोध घेणे खूप गरजेचे आहे. तरच आगामी काळात आपला समाज आपले अस्तित्व राखून ठेवू शकेल, यावर सर्वांनी गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे, असेही आमदार डॉ. कोरे म्हणाले. राज्यातील शिंदे- फडणवीस सरकारने महात्मा बसवेश्र्वर आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले असून लिंगायत युवक-व्यापाऱ्यांना उद्योग- धंद्यासाठी बिन व्याजी भांडवल प्राप्त होऊन यातून आर्थिक उन्नती साधता येईल. तसेच गरीब होतकरू विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी आर्थिक सहाय्यता महामंडळाकडून करण्यात येईल. मंगळवेढा येथे लवकर बसकल्याणच्या धर्तीवर महात्मा बसवेश्र्वरांचे राष्ट्रीय स्मारक उभा करून या स्मारकातून वचन साहित्य मानवीय जीवनावर सकारात्मक ऊर्जा देणारे ठरेल यात शंका नाही. मराठवाड्यातील शेती मध्ये शेतकरी सोन पिकवू शकतो. परंतु मराठवाड्याला शाश्र्वत पाण्याचा स्रोत नसल्याकारणाने शेतकरी हतबल झालेला आहे.

कृष्णा उपखोर्यातील व तापी खोऱ्यातील ५० टक्के समुद्राला वाहुन जाणारे पाणी वंचित मराठवाड्यासाठी वळविण्याचे वेगाने प्रयत्न होत आहेत. असे झाल्यास येथील शेतकरी सोने पिकवल्याशिवाय राहणार नाही, असेही ते म्हणाले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन प्रा. राजेश विभूते यांनी तर आभार प्रदर्शन नरेश पेद्दे यांनी केले. या कार्यक्रमास लिंगायत समाजातील डॉक्टर, इंजिनिअर, उद्योजक, व्यापारी, वकील, शिक्षक, शेतकरी, शैक्षणिक कार्य करणारे संस्थाचालक उपस्थित होते.

## कवी पुरूषोत्तम जोशी यांच्या ...

संग्रह सर्वागंसुदर झाला आहे व साहित्याच्या कसोटीवर ठामपणे चांगल्यापध्दतीने उतरला आहे आणि कवी जोशी हे या साहित्य प्रवासामध्ये यामध्ये पुर्णपणे यशस्वी झालेले आहेत असे मला वाटते. तसेच यानंतर कवी जोशी यांनी आपले मनोगत थोडक्यात व्यक्त केले व या ललित लेख संग्रह व काव्यसंग्रहाच्या प्रवासाबददल थोडक्यात माहिती दिली आणि स्वताची भूमिका कथन केली. लेखन हा कवीचा आत्मविष्कार असतो व ते एक भावनाचे प्रकटीकरण असते.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शिला शेटे यांनी केले तर आभारप्रदर्शन कवी पुरूषोत्तम जोशी यांनी केले. कुमारी स्वरा नेरीकर हिच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाल साहित्यीक, मित्रपरीवार व पारिवारीक सदस्य प बीएसएनएल चे कर्मचारी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ...

योजनांचा लाभ देण्याचे उद्दिष्ट निश्र्चित करण्यात आले आहे. या अभियानाची माहिती देणारी भित्तीपत्रिका, घडीपत्रिका लातूर जिल्हा परिषदेने तयार केली असून त्याचे प्रकाशन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले. तसेच मनरेगा योजनेवर आधारित रवींद्र इंगोले लिखित 'माझा गाव माझी जबादारी, मी समृद्ध तर गाव समृद्ध' या माहितीपुस्तिकेचे प्रकाशनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

## चारटांगी येथील रस्ता व नाली ...

प्रयत्न नगर परिषद अहमदपुर यांच्याकडुन होत आहे.सदरील जागेमध्ये २५ ते ३० घरासाठी रस्ता न सोडता नगर परिषदेच्या वतीने होत असलेल्या अन्यायकारक कृत्य विरुध्द स्थानिक नागरीकांच्या वतीने लोकशाही मार्गाने विविध प्रकारच्या आंदोलने करण्यात येईल जर आम्हाला न्याय नाही भेटल्यास आम्ही सर्व आमरण म उपोषण व आत्मदहन करनार असा इशारा दिनांक १० मे रोजी उपजिल्हाअधिकारी यांच्या मार्फत जिल्हाधिकारी यांना एका निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# सोलापूरच्या आरटीओ निरीक्षक गीता शेजवाल नागपुरात अडकल्या ॲन्टीकरप्शनच्या जाळ्यात

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

मूळच्या सोलापूर असलेल्या आरटीओ खात्यातील मोटार वाहन निरीक्षक गीता शेजवाळ या लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या जाळ्यात अडकल्या आहेत. विशेष धक्कादायक बाब म्हणजे त्यांचे पती याच खात्यात असून दोन महिन्यापूर्वी तेही लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या जाळ्यात अडकले आहेत.

जबलपूर महामार्गावरील कांद्री आरटीओ चेकपोस्टवर यवतमाळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लावलेल्या सापळ्यात ट्रकचालकाकडून चारशे रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी मोटार वाहन निरीक्षक गीता भास्कर शेजवाळ, दलाल मुकुंद सोनकुसरे, राजेश भातखोरे अशा तिघांविरूद्ध रामटेक पोलीस ठाण्यात शुक्रवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरटीओ मोटार वाहन निरीक्षक शेजवाळ यांची कांद्री चेकपोस्टवर ड्युटी होती. त्यांनी चेकपोस्टवरून जाणाऱ्या मालवाहू वाहनांकडून जाणाऱ्या वाहन चालकांकडून पैसे घेण्यासाठी सोनकुसरे व भातखोरे या दलालांची नियुक्ती केली होती. गुरूवारी तक्रारदाराचा ट्रक कांद्री चेकपोस्टवर आला. हा ट्रक चेकपोस्टवरून पास करण्यासाठी तेथील दलाल सोनकुसरे व भातखोरे यांनी चालकाला चारशे रुपयाची लाच मागितली. ट्रक चालकाने एसीबी अमरावती परीक्षेत्राचे पोलीस अधीक्षक मारूती जगताप, अपर अधीक्षक अरुण सावंत यांना संपर्क करून तक्रार केली. त्यावरून सापळा लावण्यात आला. पोलिसांचा छापा पडल्याचे लक्षात आल्यावर जागेवरच पर्स व इतर साहित्य टाकून शेजवाल यांनी पळ काढला. त्यांचा शोध सुरू असल्याचे सावंत यांनी सांगितले. या कारवाईनंतर सोलापुरातील शेजवाल यांच्या घराची झडीती घेण्यात आली आहे.

ट्रकचालकाने केलेल्या तक्रारीनुसार एसीबीने कांद्री आरटीओ चेकपोस्टवर ट्रॅप लावला. चेकपोस्टवरील इमारतीतच सोनकुसरे व भातखोरे या दोघा दलालांनी ठिय्या मारला होता. चेकपोस्टवर ट्रक आला की ते पैसे मागायचे. ट्रकचालकाने आढेवेढे घेतले की लगेच हे दोघे बाजूच्या कक्षात बसलेल्या मोटार वाहन निरीक्षक गीता शेजवाळ यांना बोलावून घ्यायचे. शेजवाळ दमदाटी करून ट्रकचालकांना एन्ट्री देण्यास भाग पाडत असल्याची खबर मिळाली. एसीबीनेच डमी ट्रक पाठविला. सोनकुसरे व भातखोरे या दोघांनी लाचेची मागणी केली. चालकाने पैसे देण्यास नकार दिल्यावर दलालांनी शेजवाळ यांना तेथे बोलावून घेतले. ट्रक पुढे नेण्यासाठी तडजोडीने चारशे रूपये देण्याचे ठरले. ट्रकचालकाने चारशे रुपये दिल्यावर एसीबीने छापा मारून शेजवाल यांना ताब्यात घेतले. मोटार वाहन निरीक्षक शेजवाळ यांचे पती अभिजीत मांजरे हेही याच ठिकाणी मोटार वाहन निरीक्षक म्हणून कार्यरत होते. मांजरे यांचीही कांद्री चेकपोस्टवर ड्युटी होती. फेब्रुवारीमध्ये ट्रक चालकाकडून अशाचप्रकारे एन्ट्री घेताना एसीबीने त्यांना रंगेहाथ पकडले आहे. विशेष म्हणजे एन्ट्री वसुलीसाठी मांजरे यांनीही दोन दलाल नेमले होते. ही घटना ताजी असतानाच पत्नीही अशाच सापळ्यात अडकली आहे. मोटार वाहन निरीक्षक शेजवाळ यांची कारकीर्द वादग्रस्त आहे. यापूर्वी त्यांनी सोलापूर, धाराशीव येथेही काम केले आहे. धाराशिव येथे असताना स्कुल बस बोगस फिटनेस प्रमाणपत्र घोटाळ्यातही त्यांचे नाव आले होते. निलंबित झाल्यावर त्यांना नागपूर मुख्यालय देण्यात आले होते. पुर्नस्थापित झाल्यावरही आरटीओतील प्रकरणात त्या पुन्हा चर्चेत आल्या आहेत. काही महिन्यापूर्वी नागपुरात आरटीओंच्या बदल्यांचे प्रकरण घडले होते. यातही त्यांच्या संभाषणाची क्लिप व्हायरल झाली होती.

## सातवली येथे तरण तलावासह खेळ खेळण्यासाठी, मंगल कार्यासाठी बहुउपयोगी वास्तुचे भूमिपूजन!



**वसई/प्रतिनिधी**

आमदार हितेंद्र ठाकुर यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार क्षितिज ठाकूर यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या वसई पुर्वेकडील सातवली येथील वसई पूर्व भागातील जनतेच्या हितासाठी बहुउपयोगी वास्तुचे भूमिपूजन तुंगारेश्वर रोड वसई पूर्व येथे तरण तलाव (स्विमिंग पुल) व विविध खेळासाठी सुसज्ज अशी ईमारत व मंगल कार्यासाठी सुद्धा उपयोग पडणारी या बहुउपयोगी वास्तुचे आमदार राजेश पाटील यांच्या हस्ते मान्यवर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. सदर भूमिपूजन प्रसंगी नारायण मानकर माजी महापौर, माजी महापौर रूपेश जाधव, सहाय्यक आयुक्त मानकर, माजी नगरसेवक सुनील आचोळकर, कन्हैया भोईर, रमेश घोरकना, विजया भोईर, आशाताई धुवसाडा, शकुंतला शेळके, देवयानी धुमाळ, सर्व माजी नगरसेविका, माजी सरपंच राजेश भगत, बविआ सातवली अध्यक्ष नारायण कुराण, वालीव प्रवक्ते रणधीर कांबळे, गोपीनाथ गोर्डे, पदाधिकारी व कार्यकर्ते, महिला कार्यकर्त्या, स्थानिक जनता मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## प्रकल्प बाधित शेतकरी, जमीन मालक यांच्या समस्या सोडविण्या संदर्भात जिल्हाधिकारीसह बैठकीचे आयोजन

**पालघर/प्रतिनिधी**



पालघर जिल्ह्यातील मुंबई अहमदाबाद अतिजलद रेल्वे, (बुलेट ट्रेन) रिलायन्स गॅस पाईपलाईन बाधीत शेतकरी, जमीन मालक, नागरिक व त्यांचे प्रतिनिधी यांच्या न्याय हक्कासाठी. त्यांच्या समवेत जिल्हाधिकारी कार्यालयात पालघर येथे बैठक आयोजित करण्यात येण्यासाठी खासदार राजेंद्र गावीत यांनी दिनांक ३ मे २०२३ रोजी जिल्हाधिकारी पालघर यांना लेखी (पत्र) दिलेले निवेदन. त्या अनुषंगाने दिनांक १२ मे २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय पालघर, रूम नंबर २०१, समिती सभागृह दालनात, दुपारी ३ च्या वेळेत बुलेट ट्रेन प्रकल्प बाधित व रिलायन्स प्रकल्प बाधित शेतकरी, जमीन मालक, नागरिक यांच्या, मागील अंदाजे दोनदा महिन्या पासून करण्यात येणारा पाठपुरावा व काही स्थानिक भूमिपुत्रांवर झालेल्या, अन्यायाला वाचा फोडण्यासाठी मिळत असलेले सहकार्य व पुढील वाटचाल यशस्वी करण्यासाठी सदर बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर बैठकीतखासदार राजेंद्र गावीत सह गोविंद बोडके जिल्हाधिकारी पालघर, कुणाला सुरेश पाटील (D.D.C.M.C.Member) ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार तसेच सदर विभागातील सक्षम अधिकारी वर्ग उपस्थित राहणार असल्याने, त्यावेळी तेथे उपस्थित बाधित शेतकरी, जमीन मालक, नागरिक यांचे प्रलंबित असणारे प्रश्न सोडविण्या साठी यशस्वी प्रयत्न करण्यात येतील. तरी प्रकल्प बाधित यांची उपस्थिती लक्षणीय आहे.

# जुने सोन्याची दागिने देऊन, नवीन पध्दतीचे सोन्याची दागिने बनवून घ्या सांगत सोनार फरार

**सफाळे/एच.लोखंडे**




लग्न सराईचा सिझन असल्याने, अनेकांना आपल्या मुलगा अथवा मुलींच्या लग्नासाठी दागदागिने बनविण्याची घाई असते. या संधीचा फायदा घेत. सफाळे पुर्व पो. उंबरपाडा. ता. जि. पालघर येथील, गणेश ज्वेलर्सचे (सफाळे पुर्व रेल्वे फाटक समोर) मालक १) कान्हाराम दलाराम चौधरी सज्ञान रा. विरार वेस्ट ता. वसई जि. पालघर. २) दिनेश शांतीलाल ढोलकिया सज्ञान रा. बोळींग ता. वसई जि. पालघर. यांनी आपल्या गणेश ज्वेलर्सच्या दुकानात, लग्न सराईत निमित्ताने सोने खरेदी विक्री साठी येणाऱ्या ग्राहक यांना जुन्या पध्दतीचे सोन्याची दागिने त्यांना देऊन नवीन पध्दतीचे (फॅशन) दागिने बनवून देतो सांगत, एका पेक्षा जास्त ग्राहकांना लाखो किंवा करोडो रूपयांचा गंडा घातल्याचा पोलीस तपासा अंती आढळून येत असल्याचे दिसून येणार आहे. सदर फसवणुकीच्या संदर्भात श्रीमती. मनिषा धनाजी पाटील वय वर्षे ४३ व्यवसाय शेती रा. कांद्रेभुरे पो. टेंभीखोडावे ता. जि. पालघर यांनी दिलेल्या लेखी तक्रारी नुकसान, जानेवारी २०२३ ते २७ एप्रिल २०२३ या काळा दरम्यान, यांनी आपले जुन्या सोन्याची परंतु वापरात असलेली गंठण अंदाजे वजन ०६ तोळे ०७ ग्राम (अंदाजे किंमत ३,२५,०००/- रूपये ) रोख रक्कम २,००,०००/- रूपये असा एकुण ५,२५,०००/- रूपये किमतीचे एवज नवीन दागिने बनविण्यासाठी गणेश ज्वेलर्सचे मालक, कान्हाराम चौधरी व हितेश ढोलकिया यांच्या हवाली केले होते. त्यानंतर सदर गणेश ज्वेलर्सचे मालक यांच्या कडून योग्य प्रतिसाद न मिळता सदर दुकान बंद आढळून येत असल्याने दिनांक १० मे २०२३ रोजी, सफाळे पोलीस ठाणे. ता. जि. पालघर येथे रितसर तक्रारदार श्रीमंती मनिषा धनाजी पाटील यांनी गुन्हा रजि. क्रमांक ४६/२०२३ प्रमाणे व भारतीय दंड विधान संहिता कलम ४०६, ४०१, ४२०, ३४ अन्वये गुन्हा दाखल झालेला आहे. सदर गुन्ह्यांचे स्वरूप पाहता, बाळासाहेब पाटील पोलीस अधीक्षक पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली, श्रीमती निता पाडवी पालघर विभागीय पोलीस अधिकारी यांच्या निरीक्षणाखाली, सफाळे पोलीस ठाणे, प्रभारी पोलीस अधिकारी अमोल गवळी स. पो. निरीक्षक यांच्या सहकार्याने एम. आर. बेलकर पो. उपनिरीक्षक तपासणी अधिकारी पुढील तपास करीत आहेत. सदर घटना स्थळास अमोल गवळी साहेब यांनी भेट दिली असून, सदर गणेश ज्वेलर्स दुकान धारक मालकांच्या जाळ्यात अनेक ग्राहक फसलेले असून, सदर फसवणूक हि लाखो रुपयांची नाही तर करोडो रूपयांची हि असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण अजून अनेक फसवणूक झालेले ग्राहक सफाळे पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळत आहे.

## रोटरी क्लब ऑफ मुंबई दहिसरतर्फे सोनशीव गावात जलवाहिनी!



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील सोनशिव गावातील अवचित पाड्यातील ५०० ग्रामस्थांना रोटरी क्लब ऑफ मुंबई दहिसरने पंचतत्व प्रकल्प अंतर्गत जलवाहिनीचे काम पूर्ण केले आहे. मंगळवारी (दि. ९मे) जलवाहिनी प्रकल्पाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे सी.एस.आर. भागीदार, लीप इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक सुनू मॅथ्यू यांच्या शुभहस्ते पार पडले.

सुमारे पंधरा लाख रुपये खर्चाच्या या प्रकल्पांतर्गत गावातील विहिरीवरुन सौरपंपाद्वारे पाणी उपसा करुन चार जलकुंडाद्वारे सोनशीव गावातील ५०० ग्रामस्थांना मोफत पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. दिगंत स्वराज फाउंडेशनच्या सहकार्याने प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ मुंबई दहिसरचे अध्यक्ष शरद जैन, प्रकल्प प्रमुख राजेंद्र उन्नीकृष्णन, मौलिक शहा, माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर श्रीरंग प्रभू, क्लबचे सदस्य मौलिक शहा, पंकज देसाई, दुर्गेश स्थळेकर, भरत वासू, राजकुमार चड्ढा, सदानंद नाडकर्णी, प्रकाश कामठे या सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. या सर्वांबरोबरच दया सुवर्णा, वाडा क्लबचे संस्थापकीय अध्यक्ष शशांक ठाकरे, सरपंच संदीप डोंबरे आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## शिवणी बु ग्रामपंचायतमध्ये बनावट शिपाईला अभय देणाऱ्या गटविकास अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करा!

### अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समितीने उपोषणाचा दिला इशारा

**औसा/शिवाजी मोरे**

लातूर जिल्ह्यातील शिवणी (बु) ग्रामपंचायतमध्ये बनावट शिपाई विजय खराडे यांची नियुक्ती करताना ग्रामपंचायत कार्यालय शिवणी (बु) ता.औसा जि.लातूर ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदीचे पालन न करता बनावट नियुक्ती केल्याचे चौकशी अंतिम सिद्ध झाले आहे. सरपंच शोभा धोंडीराम जाधव व निरुडे एस.व्ही. ग्रामसेवक हे जबाबदार आहेत असे चौकशी अंतिम उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांनी लेखी आदेश पारित केले त्या आदेशाचा पालन करून शिवणी (बु.) सरपंच व ग्रामसेवक व शिपाई यांच्याविरुद्ध पोलीस मार्फत गुन्हा नोंद करणे व ग्रामसेवक यांना निलंबित करणे खोटी नियुक्तीचा विजय खराडे यांना सेवेतून बडतर्फ करून घेतलेली पगार व्याजासह वसूल करावे असे अर्ज अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समितीचे संस्थापक अध्यक्ष सौदागर महमदरफी, औसा तालुकाध्यक्ष शिवाजी मोरे, पत्रकार वामन अंकुश, तानाजी भंडे, कासीम, इम्रान जमीनदार यांनी पुराव्यासह गट विकास अधिकारी यांना ईमेलद्वारे व प्रतेक्ष भेटून अर्ज करूनही सदर प्रकरणात गटविकास अधिकारी यांनी आरोपीशी संगणमत करून व मोठी आर्थिक देवाण-घेवाण करून स्वतःच्या फायद्यासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवून आदेशाचे पालन केले नाही त्यामुळे अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समितीच्या वतीने विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांची भेट घेऊन खोटी नियुत्ती धारक शिपाई विजय खराडे व सरपंच शोभा जाधव व ग्रामसेवक निरुडे एस.व्ही. यांच्याविरुद्ध पोलिसामार्फत गुन्हा नोंद करुन खराडे यांची सेवा समाप्त करुन आज पर्यंत घेतलेली पगार व्याजासह वसूल करावे व ग्रामसेवक यांना तात्काळ निलंबित करावे व सरपंच पदावरून अपात्र करावे व सदर प्रकरणात आरोपींना अभय देणाऱ्या निष्क्रिय गटविकास अधिकारी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करावे अशी तक्रार १०/४/२०२३ रोजी अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समितीचे संस्थापक अध्यक्ष सौदागर महमदरफी, प्रदेश कार्याध्यक्ष माधव मारकवाड, औरंगाबाद जिल्हा सचिव फिरोज पठाण, तानाजी भंडे, व्यंकट कदम, कासिम जमीनदार यांनी तक्रार देऊन विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद येथे आमरण उपोषण करणार असे निवेदनात नमूद केले आहे.

# उत्कृष्ठ पेसा ग्रामपंचायतीची निवड करण्यासाठी १८ मे पर्यत अर्ज सादर करावे

**पालघर/प्रतिनिधी**

जव्हार एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा या तालुक्यातील मागील ३ वर्षात पेसा निधीची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या उत्कृष्ठ पेसा ग्रामपंचायतीची निवड करण्यासाठी पेसा ग्रामपंचायतीमधुन प्रकल्प स्तरावर १० ग्रामपंचायतींची निवड करण्यासाठी विवरण पत्रासह १८ मे पर्यत अर्ज सादर करावे. विवरण पत्र प्रकल्प कार्यालयात नि : शुल्क उपलब्ध आहे. अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सुचना पुढील प्रमाणे : अर्ज प्रकल्प कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील, अर्जावर ग्रामसेवक व सरपंच यांची स्वाक्षरी असणे बंधनकारक राहील, ग्रामपंचायत पेसा क्षेत्रातील असणे आवश्यक आहे, अर्जासोबत विवरण पत्र पुर्ण भरणे आवश्यक आहे अन्यथा अर्ज बाद करण्यात येईल, प्रकल्प स्तरावरुन निवड समितीमार्फत निवड झालेल्या १० ग्रामपंचायतींची नावे विभागीय स्तरावर, अपर आयुक्त स्तरावर सादर करण्यात येतील व तेथे निवड समितीमार्फत निवड झालेल्या पेसा ग्रामपंचायतीला १०.०० लक्ष रुपयाचे प्रोत्साहनपर निधी, प्रशस्तीपत्र आणि पदक प्रदाण करण्यात येईल, तसेच विभागीय स्तरावरुन निवड झालेल्या पेसा ग्रामपंचायतींची नावे राज्य स्तरावर सादर करण्यात येतील व तेथे निवड समितीमार्फत निवड करण्यात येणाऱ्या पेसा ग्रामपंचायतीकडुन रु.१५.०० लक्षाचा आराखडा मागविण्यात येवुन सदर आराखडयास राज्यस्तरीय समितीव्दारा मंजुरी प्रदान करण्यात येईल. असे जव्हार एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी आयुष सिंह यांनी कळविले आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### व्यंगचित्रकार चंद्रशेखर भालेराव यांचा आंतरराष्ट्रीय व्यंगचित्र महोत्सवात सहभाग

अहमदपूर : येथील व्यंगचित्रकार चंद्रशेखर भालेराव यांनी कार्टूनीस्ट कॅम्बाइन व युवा संवाद सामाजिक संस्था यांच्या वतीने आयोजित पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिरात सूरू असलेल्या आंतरराष्ट्रीय व्यंगचित्र महोत्सवात आपली व्यंगचित्रे प्रदर्शीत करून सहभाग नोंदवला.या महोत्सवाचे व व्यंगचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष तथा सुप्रसिध्द व्यंगचित्रकार राज ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.या व्यंगचित्रं प्रदर्शनात महाराष्ट्रतील नामवंत व्यंगचित्रकार संजय मिस्त्री धनराज गरड चारुहास पंडित प्रशांत कुलकर्णी प्रभाकर वाईरकर योगेंद्र भगत प्रभाकर झळके विश्र्वास सुर्यवंशी लहू काळे अतुल पुरंदरे किशोर शितोळे गजानन घोंगडे यांच्यासह चंद्रशेखर भालेराव यांच्या व्यंगचित्रांचा समावेश आहे.राज ठाकरेंनी यावेळी विरोधी पक्षनेते अजित पवार यांचे व्यंगचित्र रेखाटून चालू घडामोडींचे दर्शन घडवले.सहभागी व्यंगचित्रकरांची व्यंगचित्रे पाहून त्यांनी सर्वांचे कौतूक ही केले.तीन दिवसीय सूरु असलेल्या आंतरराष्ट्रीय व्यंगचित्र महोत्सवात परिसंवाद, प्रात्यक्षिक व मार्गदर्शन आयोजीत करण्यात आले होते. या व्यंगचित्रं प्रदर्शनात महाराष्ट्रासह इतर राज्यातील एकूण ३०० पेक्षा अधिक व्यंगचित्रकारांचा सहभाग होता.

### थकीत मुद्दल, व्याज एकरक्कमी भरुन लाभ घ्यावा

पालघर : शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ मर्या. मुंबई यांच्या जिल्हा कार्यालय पालघर मार्फत विविध कर्ज योजनेंतर्गत जिल्ह्यातील इतर मागस प्रवर्गातील लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराकरिता अल्प व्याज दराने कर्ज वितरीत करण्यात आले आहे. जिल्ह्यातील थकीत कर्ज रक्कम असलेल्या लाभार्थ्यांना जाहिर आवाहन करण्यात येते की, महामंडळाकडून घेतलेल्या कर्जाची मुदत संपलेल्या लाभार्थीना महामंडळाकडून घेतलेल्या कर्जावर संपूर्ण थकीत व्याज रक्कमेवर लाभार्थ्यांना ५०% सवलत देण्यात येणार आहे. त्याचा लाभ घेऊन सर्व संबंधित लाभार्थ्यांनी थकीत मुद्दल व व्याज एकरकमी परतावा (One Time Settlement) योजनेचा दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत लाभ घेऊन कर्ज खाती बंद करुन कर्जमुक्त व्हावे तसेच कायदेशीर कार्यवाही टाळावी. याबाबत शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक, आर. एम. मेश्राम, यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ जिल्हा पालघर यांनी केले आहे.

### १६ मे रोजी आदिवासी कलाकार मेळावा

पालघर : डहाणू एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अंतर्गत असणाऱ्या आदिवासी कलाकारांनी तयार केलेल्या वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी या उद्देशाने भारतीय जनजातीय सहकारी विपणन विकास संघ (TRIFED) यांच्या मार्फत येत्या १६ मे रोजी आदिवासी कलाकार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सदर मेळाव्यामध्ये खरेदी समितीकडून निवडण्यात आलेल्या आदिवासी कलेच्या वैशिष्ट्यपूर्ण वस्तूंची TRIBES INDI यांच्यामार्फत खरेदी करण्यात येणार आहे . तरी सदर मेळाव्यामध्ये सहभागी होण्यास इच्छुक असणाऱ्या कलाकारांनी दि. १४.०५.२०२३ पर्यंत. डहाणू, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, येथे नावनोंदणी करावी. नावनोंदणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे : कलाकार अनुसूचित जमातीचा असावा, कलाकार अनुसूचित जमातीचा असल्याचा जातीचा दाखला व बँक पासबुक झेरॉक्स सोबत असणे आवश्यक आहे, एका कुटुंबातील एकच सदस्याला सहभागी होता येईल, तसेच एका बचत गटाचा एक प्रतिनिधी सहभाग घेऊ शकेल, एका बाजूचा प्रवास खर्च व जेवण संस्थेकडून पुरविण्यात येईल, कलाकारांनी मेळाव्यास येताना तयार केलेल्या आदिवासी कलेच्या वस्तू सोबत आणाव्यात. असे आवाहन डहाणू प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी संजिता महापात्र यांनी केले.

### स्वच्छ छत व घर डेंग्युमुक्त परीसर मोहीम

लातूर : पुढील माहे जून महिन्यात पावसाळ्यास सुरुवात होणार आहे. पावसाळ्यामध्ये पावसाचे पाणी विवीध ठिकाणी साचून डेंग्यु आजारासाठी कारणीभूत असणाऱ्या एडीस एजिसी डासची पैदास वाढण्याची शक्यता असते. मान्सूनच्या सुरुवातीच्या काळात छतावरील अडगळीच्या साहित्यात पावसाचे पाणी साचून राहिल्याने अचानक एडीस एजिप्सीची पैदास व कंटेनर इंडेक्स वाढत असल्याचे यापूर्वी आढळून आलेले आहे. तरी मान्सूनपूर्व उपाय योजनेअंतर्गत घरोघरी जावून घराच्या, इमारतीच्या छतावर टायर फुटलेले भांडे, पत्रे, रिकामी वापरात नसलेली टाकी, फेकून दिलेल्या बाटल्या, करवंट्या इत्यादी विवीध वापरात नसलेले साहीत्य उघड्यावर ठेवण्यात आलेले आहे का याची तपासणी करण्यासाठी स्वच्छ छत व घर... डेंग्युमुक्त परीसर ही विशेष मोहीम चालू करण्यात आली आहे. तरी नागरिकांनी आपल्या घरी येणारे मनपाचे आरोग्य कर्मचारी व आशा स्वयंसेविका यांना सहकार्य करावे व आपल्या घराच्या, दुकानाच्या, कार्यालयाच्या इमारतच्या छतावर तसेच आवारात निरुपयोगी साहित्य पडलेले आहे का याची त्वरीत पाहणी करून असे साहित्य उघड्यावर पडलेले असल्यास ते छताखाली व्यवस्थित झाकून ठेवावे किंवा ते मनपाच्या घंटागाडीकडे द्यावे किंवा त्याची योग्य ती विल्हेवाट लावावी जेणेकरून पाऊस पडल्यानंतर त्यामध्ये पावसाचे पाणी साचून त्यात डासोत्पत्ती होणार नाही, असे आवाहन लातूर पालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

### अपघातात अज्ञात व्यक्तीचा मृत्यू



वाडा: उजौनी आखाडा मार्गे जव्हारकडे जाणाऱ्या रोडवर अज्ञात वाहनाची ठोकर लागुन अपघात होउन एक इसम जखमी झाला होता. त्याला तात्काळ वाडा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता येथील डॉक्टरांनी त्यास तपासुन तो दाखल होण्यापूर्वीच मायात झाला असल्याचे सांगितले. दरम्यान अज्ञात मोटारवाहन चालकावर वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा केले करण्यात आला आहे. अज्ञात मयत इस्माचे नाव माहित नसून अंदाजे वय ३५ ते ४० वयोगटातील आहे. उंची ५ फूट ४ इंच, काळे केस, उभट चेहरा, अंगात मळकटलेला जॅकेट,पिवळा टी शर्ट, काळ्या रंगाची पॅन्ट, प्लास्टिकची चप्पल अशा वर्णनाचा मयत इसमाला कोणी ओळखत असेल तर वाडा पोलीस ठाणे येथे संपर्क करण्याचे आवाहन तपास अधिकारी अनिल गोंजारी यांनी केले आहे.

# व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हाभरात धरणे आंदोलन

## विविध मागण्यांचे दिले जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**लातूर/प्रतिनिधी**

पत्रकार आणि वर्तमानपत्रांबाबतच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी व्हॉईस ऑफ मीडिया या संघटनेच्या वतीने लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासह जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील तहसील कार्यालयासमोर गुरुवारी धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांना विविध मागण्यांचे निवेदन देवून पत्रकारांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यात आले. समाजातील सर्व घटकांचे प्रश्न मांडून पत्रकार त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम करतात. पण, पत्रकारांचेच अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. ते सोडवण्यासाठी लातूर शहरासह जिल्ह्यातील शेकडो पत्रकार गुरुवारी रस्त्यावर उतरले होते. जिल्हाधिकारी कार्यालयासह सर्व तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून पत्रकारांनी आपल्या मनोगतातून अनेक महत्वपूर्ण मागण्या प्रशासनासमोर मांडल्या तसेच आपल्या भावनांना मनोगतातून वाटही करुन दिली. पत्रकारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी महामंडळ स्थापन करुन त्याला भरीव निधी द्यावा, पत्रकारितेत ५ वर्ष पूर्ण केलेल्या पत्रकारांना सरसकट अधिस्वीकृती पत्रिका देण्यात यावी, वृत्तपत्रांना सध्या जाहिरातीवर लागु असलेला जीएसटी रद्द करावा, पत्रकारांच्या घरांसाठी म्हणून विशेष बाब म्हणून शासकीय भूखंड देण्याचा निर्णय घ्यावा, कोरोना महामारीत जीव गमावलेला पत्रकारांना फ्रंट लाईन वर्करचा दर्जा देऊन त्यानुसार मयत पत्रकारांच्या कुटुंबांचे पुनर्वसन करावे, शासनाचे सध्याचे जाहिरात धोरण क वर्ग दैनिके (लघु दैनिक) यांना मारक आहे. लघु दैनिकांनाही मध्यम (ब वर्ग) दैनिकांइतक्याच जाहिराती देण्यात याव्यात, साप्ताहिकांनाही त्या प्रमाणात जाहिराती द्याव्यात अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या. यावेळी जिल्हाध्यक्ष बालाजी फड, सरचिटणीस संगम कोटलवार, शहाजी पवार, सुशांत सांगवे, डॉ. सितम सोनवणे, बाळासाहेब जाधव, सचिन चांडक, वामन पाठक, विनोद चव्हाण, विष्णू अष्टेकर, आनंद माने, श्रीराम जाधव, योगिराज पिसाळ, काकासाहेब घुटे, प्रभाकर शिरुरे, दिलिप मुनाळे, धोंडीराम ढगे, रंगनाथ सगर, दिपक आलापूरे, वैभव पुरी, यशवंत पवार आदिंची उपस्थिती होती.

## देवणीत व्हाईस ऑफ मीडियाचे तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथे व्हाईस ऑफ मीडिया शाखा देवणीच्या वतीने तहसील कार्यालयाच्या समोर पत्रकारांच्या विविध मागण्यांकरिता धरणे आंदोलन करून निवेदन तहसील प्रशासनाचे महसूल सहाय्यक प्रसाद जाधव यांना देण्यात आले. तहसील प्रशासनास दिलेल्या निवेदनातून पत्रकारा करिता विविध शासन स्तरावर मागण्या करण्यात आले आहेत. यामध्ये पत्रकारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी महामंडळ स्थापन करुन त्याला भरीव निधी द्यावा, पत्रकारितेत ५ वर्ष पुर्ण केलेल्या पत्रकारांना सरसकट अधिस्वीकृती पत्रिका देण्यात यावी, वृत्तपत्रांना सध्या जाहिरातीवर लागु असलेला जीएसटी रद्द करावा, पत्रकारांच्या घरांसाठी म्हणून विशेष बाब म्हणून शासकीय भूखंड देण्याचा निर्णय घ्यावा, कोरोनात जीव गमावलेला पत्रकारांना फ्रंट लाईन वर्कर चा दर्जा देऊन त्यानुसार मयत पत्रकारांच्या कुटुंबांचे पुनर्वसन करावे, शासनाचे सध्याचे जाहिरात धोरण क वर्ग दैनिके (लघु दैनिक) यांना मारक आहे. लघु दैनिकांनाही मध्यम (ब वर्ग) दैनिकांइतक्याच जाहिराती देण्यात याव्यात. साप्ताहिकांनाही त्या प्रमाणात जाहिराती द्याव्यात आदी मागण्या करण्यात आले आहेत. या धरणे आंदोलनाचे नेतृत्व व्हॉईसऑफ मीडियाचे देवणी तालुका अध्यक्ष प्रा. रेवण मळभगे, रमेश कोतवाल, बालाजी कवठाळे, जाकीर बागवान, राहुल बालूरे, प्रमोद लासोने, गिरीधर गायकवाड, बालाजी टाळीकोटे, शकील मणियार, नरेश बिरादार, दत्ता पाटील, महेश कणजे, हसन शेख, जयेश ढगे, नरसिंग सूर्यवंशी, लक्ष्मण रणदिवे, कृष्णा पिंजरे आदींसह इतर पत्रकार बांधव उपस्थित होते.

## आरोग्यमंत्री सावंत यांना दणका; सोलापूर जिल्हा आरोग्य अधिकारी जाधवांचे निलंबन रद्द

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



कर्नाटक विधानसभा निवडणुकीचा भाजपला धक्का बसलेला असतानाच आता राज्याचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या निकालाला एक धक्का बसला आहे. सोलापूर जिल्ह्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शीतलकुमार जाधव यांना निलंबित केलेला आदेश रद्द करावा लागला आहे. याबाबत शासनाने आदेश जारी केले आहेत. या आदेशात नमूद केलेल्यानुसार ज्याअर्थी डॉ. शितलकुमार जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर याना आदेश क्रमांक विभावो १३२२/प्र.क्र.७६/सेवा-४, दि. २८.१२.२०२२ अन्वये निलंबीत करण्यात आले होते व निलंबन कालावधीत त्यांचे मुख्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली येथे ठेवण्यात आले होते. आरोग्यमंत्र्याच्या या निर्णयाविरुद्ध डॉक्टर जाधव यांनी मॅटमध्ये धाव घेतली होती. मॅटच्या आदेशाचे सरकारला दखल घ्यावी लागली आहे. त्यानंतर शासन आदेश क्रमांक विभाची १३२२/प्र.क्र.७६/ सेवा-४, दि. २१.०४.२०२३ अन्वये त्यांचे मुख्यालयात सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, कुष्टरोग कार्यालय, सोलापूर असा बदल करण्यात आला होता. त्याअर्थी, आता राज्यपाल महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७२ च्या नियम ४ च्या पोटनियम (५) च्या खंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून याद्वारे उक्त निलंबन रद्द करीत आहे. डॉ. शितलकुमार जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांना पुनःस्थापनेनंतर सहायक संचालक, (कुष्ठरोग) अधिकारी, धुळे या रिक्त पदावर पदस्थापना देण्यात येत आहे. आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी किरकोळ कारणावरून डॉ. जाधव यांना निलंबित केले होते. यानंतर सोलापूर ...पान ६ वर

## तर मराठवाड्याचे मागासलेपण कायमचा दूर होईल -आ.डॉ.विनय कोरे




**लातूर/प्रतिनिधी**

पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पडणाऱ्या पावसापैकी किमान १५० टीएमसी हुन अधिक पाणी सह्याद्रीच्या पर्वत रांगातून समुद्राला जाऊन मिळते. हे वाहून जाणारे पाणी जर कायम दुष्काळ - अवर्षणाच्या गर्तेत असणाऱ्या मराठवाड्याकडे वळवले गेले तर मराठवाडाही जलसमृद्ध होईल आणि या परिसराचे मागासलेपण कायमचे दूर होईल, असे मौलिक विचार जनसुराज्य शक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष, सहकार महर्षी आ. डॉ. विनय कोरे यांनी व्यक्त केले. लातूर येथे जनसुराज्य शक्ती पक्षाचे मराठवाडा अध्यक्ष माधवराव पाटील टाकळीकर यांची कन्या चि. सौ. कां. ऋतुजा व कुमार उटगे यांचे चिरंजीव प्रतिक यांच्या विवाह सोहळ्याच्या अनुषंगाने आ. डॉ. विनय कोरे लातूर दौऱ्यावर आले होते. त्यावेळी लिंगायत समन्वय समितीच्या वतीने नरेश चंद्रशेखर पेद्दे यांच्या जुना औसा रोड वरील निवासस्थानी आ. विनय कोरे यांच्या सत्काराचेआयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते आपले विचार व्यक्त करीत होते. राज्यातील विद्यमान सरकारकडून महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ मंजूर करून घेण्यासाठी आ. कोरे यांचे योगदान अत्यंत महत्वाचे राहिले आहे. त्यानिमित्ताने बाबासाहेब कोरे, माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, विश्वनाथ निगुडगे, मनोहरमामा पाटील, जि. प. सदस्य महेश पाटील, प्रा. राजेश विभुते, इरण्णा पावले, रितेश पाटील, दयानंद पेद्दे, डॉ. ओमप्रकाश भोसले, ॲड. अविनाश भोसीकर यांच्या उपस्थितीत हा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी आपले विचार व्यक्त करताना आ. डॉ. विनय कोरे म्हणाले की, लिंगायत समाजाचे राष्ट्राच्या उन्नती मध्ये मोठे योगदान राहीलेले आहे. कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगाना व महाराष्ट्राच्या जडणघडणीत लिंगायत समाजाने महत्वाची भूमिका साकारली आहे ही बाब कोणीही नाकारू शकत नाही. महाराष्ट्राच्या प्रत्येक खेड्यापाड्यातून छोट्या - छोट्या उद्योगातुन आपल्या कार्य कर्तृत्वाने ,शांत संयमी उद्यमशील, प्रखर राष्ट्रभक्त म्हणून लिंगायत समाजाने इतर समाजाला सोबत घेऊन जाणीव व आपली ओळख निर्माण केली होती. आज आम्ही सर्वच क्षेत्रात मागे पडलो आहोत. कधीकाळी व्यापारात वर्चस्व असलेला हा समाज आजमितीस कुठे आहे? यावर चिंतन झाले पाहीजे. समाज बांधवांनी संघटीत होऊन महात्मा बसवेश्वरांच्या आचार-विचार, वचन साहित्याचा पुनर्विचार केला पाहीजे. ...पान ६ वर

## कवी पुरूषोत्तम जोशी यांच्या कवितासंग्रह व ललित लेख संग्रहाचे प्रकाशन उत्साहात संपन्न




**लातूर/प्रतिनिधी**

येथील कवी श्री.पुरूषोत्तम जोशी यांच्या तुझ्या आठवणीच्या कविता व तु आयुष्य आणि काही संदर्भ हया कवितासंग्रहाचे व ललित लेख संग्रहाचे प्रकाशन भालचंद्र ब्लड बॅकेच्या सभागृहात प्रसिध्द कवी समीक्षक देवीदास फुलारी व विरभद्र मिरेवाड लेखक, समीक्षक यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार प्रदिपजी नणंदकर तर प्रमुख पाहुणे डॉ.जयद्रथ जाधव अध्यक्ष लातूर मसापा, पत्रकार अरूण समुद्रे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात दिपप्रज्वलन व श्रीगणेश पूजनाने झाली. प्रास्ताविक डॉ.जयद्रथ जाधव यांनी अतिशय समर्पक व साहित्यीक भाषेमध्ये केले व कवी पुरूषोत्तम जोशी यांची कविता ही आत्मनिष्ठ व मनस्वी तसेच आकर्षक आहे व तिला वास्तवाचे प्रखर भान असलेली आहे. यावेळी त्यांनी कवी व लेखक जोशी यांचा परिचय करून दिला.पत्रकार अरूण समुद्रे म्हणाले की हा कवी माझा महाविद्यालयीन मित्र असुन अनेक दिवसापासुन चिंतन व मनन करून लिखाण करत आहे हे मला पुर्वी पासुनच माहित आहे.फक्त आता पुस्तक रूपाने त्याने आपल्यासमोर मांडले आहे. समीक्षक विचारवंत विरभद्र मिरेवाड नायगाव यांनी ललित लेख संग्रहावर सविस्तर विवेचन केले.त्यावेळी ते म्हणाले की, स्वप्न माणसाला झोपु देत नाहीत आणि सतत काही तरी कल्पना देत असतात आणि त्यानुसार कवी लेखक हे शब्दबध्द करत असतो आणि त्यापध्दतीने पुरूषोत्तम जोशी यांनी आपले विचार अतिशय सुंदर शैलीत ललित लेखनाच्या रूपाने मांडले आहेत आयुष्यातल्या प्रेम भावना वेगवेगळया अनुभवांच्या रूपाने शब्दबध्द केलेल्या आहेत तसेच वेगवेगळे वैचारिक संघर्ष या ललित लेख संग्रहात व्यक्त केलेल्या आहेत. त्यामुळे हा ललित लेख संग्रह अतिशय सुंदर आणि समर्पक असा झालेला आहे. देवीदास फुलारी म्हणाले की, कवी पुरूषोत्तम जोशी यांनी आपल्या तुझ्या आठवणीच्या कविता या कविता संग्रहात आयुष्यात आलेल्या अनाम सखी व त्यांचे रूदण आणि त्यामुळे आलेले भावनिक कल्लोळ अतिशय समर्पक शब्दात व्यक्त केलेले आहे.या कवितेला साहित्यीक जाण आहे व वैचारिक भान आहे त्यामुळे हा ...पान ६ वर

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मनरेगा पुस्तिका ‘शासन आपल्या दारी’ अभियानाच्या भित्तीपत्रिकेचे प्रकाशन



**लातूर/प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेपर्यंत शासनाच्या योजना पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात ‘शासन आपल्या दारी’ अभियान राबविले जाणार आहे. या अभियानाच्या जनजागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या भित्तीपत्रिका, घडीपत्रिका आणि मनरेगा योजनेच्या पुस्तिकेचे प्रकाशन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते विमानतळावरील कक्षात करण्यात आले. लातूरचे पालकमंत्री गिरीश महाजन, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, वन मंत्री सुधीर मुनगंटीवार, बंदरे आणि खनिकर्म मंत्री दादाजी भुसे यांच्यासह जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यावेळी उपस्थित होते. राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या लोक कल्याणकारी योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी ‘शासन आपल्या दारी’ हे अभियान जिल्ह्यात राबविले जाणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यातील किमान ७५ हजार लाभार्थ्यांना शासकीय ...पान ६ वर

## वाडा तालुक्यातील पत्रकार संजय लांडगे यांच्या सत्कार



**वाडा/प्रतिनिधी**

जनसंवाद अभियान अंतर्गत कामगारांना सुरक्षा विषयक मार्गदर्शन व रोजगार नाव नोंदणी मेळाव्याचे वाडा तालुक्यातील गांध्रे येथे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात पालघर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी कामगारांना मार्गदर्शन केले. या दरम्यान पत्रकारिता क्षेत्रात उत्तम कामगिरी केल्या बद्दल पत्रकार संजय लांडगे यांचे वाडा पोलीस दलाच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पत्रकार प्रितेश पटेल, शेखर पवार उपस्थित होते. त्यांचाही इथोचित सत्कार करण्यात आला.

## चारटांगी येथील रस्ता व नाली बांधण्याची मागणी

**अहमदपूर/फिरोज शेख**

शहरातील चारटांगी येथील पुर्वीचा रस्ता व नाली बांधुन देण्यात येईल याची लेखी हमी देऊनच नगर परिषद अहमदपूर यांच्याकडून व्यापारी संकुल उभारण्यात यावे अशी मागणी स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. जर मागणी मान्य न झाल्यास उपोषण व आत्मदहनाचा इशाराही देण्यात आला आहे.

याविषयी सविस्तर माहीती अशी की, स्थानिकांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील कोर्ट रोड चारटांगी परिसरात नगर परषदेकडून व्यापारी संकुल उभारण्यात येत आहे, स्थानिक नागरिकांसाठी पूर्वी असलेला रस्ता व नाली साठी जागा न सोडता त्या जागेवर दुकाने बांधण्यात येत असल्याचे निवेदन यापूर्वी दिनांक १३ डिसेंबर २०२२ रोजी उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले होते परंतु आता आमच्या घरासमोर रस्ता न




सोडता दुकाने बांधण्याचे काम सुरू आहे. अहमदपुर शहरा मधील निजाम कालीन विहीर चारटांगी येथे आहे व चारटांगी येथील सर्व नागरिकांचे घराचे दरवाजे विहीरीच्या बाजुने आहेत येथील सर्व नागरिकांचे येणे जाणे त्याच रस्त्याने आहे. विहीरीपासून ते अंबाजोगाई रोड पर्यंत नाली व रस्त्याचे काम करुन मिळावे अशी मागणी स्थानिक नागरीकांकडुन अनेक वर्षापासुन होत आहे. नगर परिषदेचे तत्कालिन मुख्याधिकारी त्र्यबक कांबळे यांनी उपविभागीय अधिकारी, व तहसिलदार, अहमदपुर यांच्या समक्ष सदरील सिमेंट कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करुन देण्याची तोंडी हमी दिली होती. परंतु सदरील जागेवर नगर परिषद अहमदपुर यांच्याकडुन व्यापारी संकुलाचे शेड उभा करण्याचे काम चालु आहे तरी आम्ही संबंधित व्यापारी, स्थानीकांनी संकुलाचा नकाशा पाहिला त्या ठिकाणी आमच्यासाठी रस्ता न सोडता व्यापारी संकुल उभा करण्याचे ...पान ६ वर

## जिल्हा समन्वयक पदी सरपंच साक्षी साठे यांची नियुक्ती

**वाडा/प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य सरपंच परिषदेच्या राज्य पदाधिकाऱ्यांची बैठक शिर्डी येथे पार पडली. या राज्यस्तरीय बैठकीत ग्रुप ग्रामपंचायत आबिटघरच्या सरपंच साक्षी संतोष साठे यांनी वाडा तालुक्यातील आबिटघर व सोबतच्या १७ गावांमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या उद्धवासाठी केलेला पाठपुरावा याची दखल घेऊन त्यांची पालघर जिल्हा सरपंच परिषद समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली. हिवरे बाजारचे आदर्श सरपंच तथा राष्ट्रपती पुरस्कार विजेते पद्मश्री पोपटराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या या सरपंच परिषदेचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, सचिव विकास जाधव, राज्य प्रसिध्दीप्रमुख संजय जगदाळे यांच्या हस्ते नियुक्त पत्र देण्यात आले. माझे पती संतोष विष्णू साठे यांच्या राजकीय व सामाजिक वाटचालीची सकारात्मक उदाहरणे माझ्या समोर असून त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून तोंडात साखर, डोक्यावर बर्फ आणि पायाला भिंगरी लावून मी काम करेन व संपूर्ण पालघर जिल्हात सरपंच परिषदेचे विचार आणि कार्य पुढे नेईन असा निर्धार साक्षी साठे यांनी याप्रसंगी व्यक्त केला.